# THE BOOK WAS DRENCHED

UNIVERSAL LIBRARY
OU_192353
UNIVERSAL LIBRARY

OUP—552—7-7-66—10,000

**OSMANIA UNIVERSITY LIBRARY**

Call No. M920 T46K Accession No. M2489

Author

Title थोरांचा परिचय PT2.

This book should be returned on or before the date last marked below.

# प्रस्तावना

'थोरांचा परिचय' या पुस्तकाचा पहिला भाग १९३० सालीं प्रसिद्ध झाला व त्यानंतर त्याच्या आणखी दोन आवृत्त्या बाहेर पडल्या. यावरून हें पुस्तक विद्यार्थिवर्गात किती प्रिय आहे व सर्वसामान्य जनतेंतही अशा संग्रहात्मक पुस्तकांची किती अभिरुचि आहे याची यथार्थ कल्पना येईल. पहिल्या भागांत ज्या थोर व्यक्तींचीं चरित्रें आलीं नाहींत त्यांचा समावेश या दुसऱ्या भागांत केला आहे. जगात आजकाल नामवंत झालेल्या कर्तृत्ववान् थोर पुरुषांची या पुस्तकासाठीं विशेष हेतूनें निवड करण्यांत आली असून त्यांच्या कर्तृत्वाचे पैलू ठळकपणे वाचकांच्या डोळ्यांत भरावेत या दृष्टीनें प्रस्तुत चरित्रांची मांडणी केली आहे. ज्या वृत्तपत्रांचा, मासिकांचा व पुस्तकांचा या चरित्रमालेला उपयोग झाला त्या सर्वांचे आभार मानणे आवश्यक आहे. विद्यार्थी व प्रौढ वाचक या दोघांनाही हें पुस्तक सारखेंच उपयुक्त व वाचनीय वाटेल अशी आशा आहे.

मकर–संक्रांत<br>शके १८६१

—प्रकाशक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | पंडित जवाहरलाल नेहरू .... .... | १ |
| २ | बाबू राजेंद्रप्रसाद .... .... .... | ६ |
| ३ | आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय .... .... | ९ |
| ४ | डॉ. सर महंमद इक्बल .... .... | ११ |
| ५ | बाबू सुभाषचंद्र बोस .... .... .... | १३ |
| ६ | श्री. सयाजीराव गायकवाड .... .... | १७ |
| ७ | खान अब्दुल गफारखान .... .... | २० |
| ८ | चिंतामण विनायक वैद्य .... .... | २४ |
| ९ | डॉ. सर राधाकृष्णन् .... .... | २७ |
| १० | नरसिंह चिंतामण केळकर .... .... | ३० |
| ११ | कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर .... .... | ३३ |
| १२ | शिवराम महादेव परांजपे .... .... | ३७ |
| १३ | मानवेंद्रनाथ रॉय .... .... .... | ४० |
| १४ | डॉ. सर चंद्रशेखर रामन् .... .... | ४३ |
| १५ | चक्रवर्ती राजगोपाळाचार्य .... .... | ४६ |
| १६ | विठ्ठलभाई पटेल .... .... .... | ४९ |
| १७ | डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर .... .... | ५२ |
| १८ | हरि नारायण आपटे .... .... .... | ५५ |
| १९ | बॅ. विनायक दामोदर सावरकर .... .... | ५९ |
| २० | भुलाभाई देसाई .... .... .... | ६४ |
| २१ | डॉ. सर तेजबहाद्दर सप्रू .... .... | ६८ |
| २२ | विश्वनाथ काशीनाथ राजवाडे .... .... | ७१ |

२३ नेव्हिल चेंबरलेन .... .... .... ७५
२४ प्रे. मेसॅरिक .... .... .... ७८
२५ रॅम्से मॅक्डोनल्ड .... .... .... ८२
२६ स्टॅन्ले बाल्डविन .... .... .... ८५
२७ टॉमस एडिसन .... .... .... ८८
२८ चिआंग-कै-शेक .... .... .... ९१
२९ बेनिटो मुसोलिनी .... .... .... ९४
३० प्रेसिडेंट रूझवेल्ट .... .... .... ९७
३१ डॉ. सन्यत्सेन .... .... .... १००
३२ केमाल पाशा .... .... .... १०३
३३ एडवर्ड दलादिये .... .... .... १०७
३४ ॲडॉल्फ हिटलर .... .... .... ११०
३५ जनरल हिंडेन्बुर्ग .... .... .... ११५
३६ लेनिन .... .... .... .... ११८
३७ लिऑन ट्रॉट्स्की .... .... .... १२२
३८ स्टॉलिन .... .... .... .... १२५
३९ डी व्हॅलेरा .... .... .... १२९
४० श्रीनिवास शास्त्री .... .... .... १३४
४१ ना. आगाखान .... .... .... १३७

**चुकीची दुरुस्ती** —पुस्तकात पान ११५ वर आलेल्या जनरल हिंडेन्बुर्ग यांच्या चरित्राचा क्रमांक चुकून ३६ पडला आहे त्याऐवजीं ३५ वाचावा. व त्याप्रमाणेंच पुढील दुरुस्त्या कराव्या

# १: पं. जवाहरलाल नेहरू

पं. जवाहरलाल नेहरू ही हिंदी राजकारणांतील चैतन्यमय,



स्फूर्तिप्रेरक व लखलखीत विद्युत्-शक्ति आहे, असें म्हटलें असतां त्यांच्या महत्त्वाचें व कर्तृत्वाचें यथार्थ वर्णन होईल. हिंदी तरुणांच्या आशा-आकांक्षा, त्यांचीं ध्येयें व त्यांची उत्साहशक्ति यांचें प्रत्यक्ष प्रतीक पं. जवाहरलाल हे आहेत. पंडितजींचें नांव आज महात्मा गांधींच्या खालोखाल सर्वतोमुखीं झालेलें आहे. हिंदुस्थानाबाहेरही ते हिंदी स्वातंत्र्य-युद्धांतील आघाडीचे वीर म्हणून गणले जातात. हिंदी तरुणांच्या आकांक्षा आज जवाहरलाल यांच्या मुखांतून नेहमीं बाहेर पडत असल्यामुळें, पन्नाशीच्या घरांत ते आले असूनही पंडितजींची गणना अजूनही नवजवानांतच होते. हिंदी

राष्ट्राचा इतिहास घडविणारी लोकोत्तर व्यक्ति म्हणून भावी इतिहासकार पं. जवाहरलाल यांचा निर्देश हिंदी राष्ट्राच्या इतिहासांत केल्याशिवाय रहाणार नाहीत.

पं. जवाहरलाल नेहरू यांचा जन्म उच्च काश्मिरी ब्राह्मण-कुळांत ता. १४ नोव्हेंबर १८८९ रोजीं झाला. त्यांच्या जन्मसमयीं त्यांचे वडील पं. मोतीलाल नेहरू यांची नामांकित कायदेपंडित म्हणून अलाहाबादला ख्याति झालेली होती. पं. जवाहरलाल १२ वर्षांचे होईपर्यंत त्यांना योग्य शिक्षण घरच्या घरीच देण्यांत आले. लेखन, वाचन, घोड्यावर बसणे. पोहणें, फुटबॉल, टेनिस वगैरेंत त्यांनीं लवकरच प्रगति केली. मॅट्रिक झाल्यावर १९०४ सालीं पं. मोतीलालजींनीं जवाहरलालना उच्च शिक्षणासाठीं विलायतेस पाठ-विण्याचें ठरविलें. पण त्यांना एकट्याला पाठविण्याचें जिवावर आल्यामुळें ते सहकुटुंब स्वतःच इंग्लंडला गेले व इंग्लंडच्या सुप्रसिद्ध हॅरो येथील विद्यालयांत त्यांनीं पं. जवाहरचें नांव दाखल केले. याच हॅरो शाळेंतून इंग्लंडच्या अनेक राजकारणधुरंधरांचें शिक्षण झालेलें आहे.

हॅरो शाळेंतून मॅट्रिक झाल्यावर केंब्रिज विद्यापीठाच्या सुप्रसिद्ध ट्रिनिटी कॉलेजांत पं. जवाहरलाल गेले व रसायनशास्त्र, वनस्पति-विज्ञान इत्यादि विषय घेऊन ते बी. ए. झाले. पुढें तेथेंच त्यांनीं सन्मानासह एम्.ए. ची पदवी संपादन केली आणि बॅरिस्टरही झाले.

हिंदुस्थानांत परत आल्यावर पं. जवाहरलाल नेहरूंनी आपल्या पित्याच्या देखरेखीखालीं अलाहाबादच्या हायकोर्टांत बॅरिस्टरी करण्यास सुरवात केली व थोड्याच दिवसांत उत्तम वकील म्हणून नांवलौकिक संपादन केला. १९१६ सालीं दिल्ली येथें कमला कौल यांच्याशीं त्यांचा विवाह मोठ्या थाटामाटानें झाला. पुढच्याच वर्षी त्यांची एकुलती एक कन्या इंदिरा इचा जन्म झाला.

विलायतेंत शिक्षण घेत असतांही पं. जवाहरलाल हिंदुस्थानांतील राजकीय घडामोडींचा सूक्ष्म अभ्यास करीत होते. १९१२ सालीं पाटणा येथें भरलेल्या कॉंग्रेसला ते प्रथमच हजर राहिले. त्या वेळीं आपण या कॉंग्रेसचे अध्यक्ष होऊं अशी त्यांना कल्पना तरी आली असेल काय? १९१४सालीं ना. गोखले यांच्या विनंतीवरून दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी बांधवांच्या मदतीसाठीं पं. जवाहरलालनीं ५० हजार रुपये जमवून पाठविले होते. ॲनी बेझंट यांच्या होमरूल चळवळीमध्येही त्यांनीं उत्तम काम केलें. १९१९ सालीच त्यांनी ग्रामसेवेची दीक्षा घेतली व औंध प्रांतांतल्या शेतकऱ्यांच्या संघटनेचें कार्य हातीं घेतलें. म्हणजे असहकारितेचें युगपर्व सुरू होण्यापूर्वीच पं. नेहरू ' किसानसेवक ' बनले होते.

याच सुमारास महात्मा गांधींनी मांडलेला असहकारितेचा ठराव नागपूर कॉंग्रेसनें मान्य करतांच देशांत सर्वत्र असहकारितेचें आंदोलन सुरू झालें. लागलीच पं. जवाहरलाल नेहरूंनीही आपला बॅरिस्टरचा धंदा सोडून दिला व ते चळवळींत सामील झाले. १९२१ सालीं त्यांना ६ महिने सक्तमजुरीची पहिली शिक्षा झाली. तुरुंगांतून सुटून येतांच पं. जवाहरलाल दुप्पट उत्साहाने कॉंग्रेसच्या कार्याला लागले व थोड्याच दिवसांत कॉंग्रेसशीं एकरूप झाले १९२२ सालीं परदेशी कापडावरील बहिष्काराच्या चळवळींत त्यांना पुन्हां १॥ वर्षाची शिक्षा झाली, पण ते नऊ महिन्यांतच बंधमुक्त झाले. नाभा संस्थानांत कायदेभंग केल्यावरून त्यांना २॥ वर्षाची शिक्षा झाली, पण कांहीं कारणामुळें त्यांची ही शिक्षा रद्द करण्यांत आली.

१९२२ सालीं अलाहाबाद म्युनिसिपालिटींत ते अध्यक्ष म्हणून निवडून आले. १९२५ पर्यंत त्यांनीं हें काम मोठ्या हुषारीनें व

निर्भीडपणें पार पाडलें. त्यांची अध्यक्षीय कारकीर्द चांगलीच गाजली.

१९२७ सालच्या फेब्रुवारींत जिनीव्हा येथें भरलेल्या साम्राज्य-विरोधी परिषदेंत हिंदी कॉंग्रेसचे प्रतिनिधि या नात्यानें पं. जवाहरलाल हजर राहिले. तेथें एकदां अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली होती. पुढें सोव्हिएट रशियाच्या खास निमंत्रणावरून १९२७ च्या नोव्हेंबरांत होणाऱ्या रशियन प्रजासत्ताकाच्या दहाव्या वाढ-दिवसाला हजर रहाण्यासाठीं पं. नेहरू सहकुटुंब मास्कोला गेले. रशियांत ठिकठिकाणीं हिंडून त्यांनीं तेथील समाजवादी राज्य-पद्धतीचें उत्तम प्रकारें निरीक्षण केलें. रशियांतील समाजवादाच्या यशस्वी प्रयोगाचा पं. जवाहरलाल यांच्यावर इतका परिणाम झाला कीं हिंदुस्थानांत परत आल्यावर ते स्वतःला समाजवादी म्हणवूं लागले. त्यांच्या सार्वजनिक जीवनावर समाजसत्तावादाचा छाप पडल्याचें दिसून येऊं लागलें.

रशियाच्या सफरीमुळें पंडितजींच्या जविनांत भयंकर क्रांति झाली व त्यांना नवी दृष्टि प्राप्त झाली. हिंदी राजकारणांत नवें मन्वं-तर सुरू झाल्याशिवाय गत्यंतर नाहीं अशी त्यांची ठाम समजूत झाली व लागलींच त्यांनीं स्वयंसेवकांच्या संघटनेचें कार्य हातीं घेऊन सबंध हिंदुस्थानांत चांगली चळवळ केली. त्यांच्याच प्रयत्ना-मुळें हिंदी युवकवर्गांत राजकीय जागृति झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं.

१९२७ सालीं मद्रास कॉंग्रेसमध्यें त्यांनीं संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडला व तेव्हांपासून ज्वलज्जहाल स्वातंत्र्यवादी म्हणून त्यांची सर्वत्र कीर्ति झाली. ते कॉंग्रेसचे मुख्य चिटणीस त्याच वर्षी निवडले गेले आणि दोन वर्षांनीं १९२९ सालीं लाहोर येथें भरलेल्या कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाचा राजमुकुट त्यांच्या डोक्यावर ठेवण्यांत

आला. ना. गोखले यांच्यानंतर प. जवाहरलाल हेच काँग्रेसचे सर्वांत तरुण अध्यक्ष होत. ट्रेड युनियन काँग्रेसमध्येंही त्यांनीं बरेंच महत्त्वाचें कार्य केलें.

१९३०–३२ च्या सत्याग्रह–युद्धांत इतर पुढाऱ्यांप्रमाणें पं. नेहरू यांनींही महत्त्वाचा भाग घेतला. या सत्याग्रहपर्वणींत त्यांना तीनचार वेळ खडतर कारागृहवास सहन करावा लागला. १९३४ सालीं बंधमुक्त झाल्यावर बिहार भूकंपग्रस्तांची सेवा करण्यासाठीं ते तिकडे गेले. पण कलकत्ता येथें राजद्रोही भाषण केल्याच्या आरोपावरून १९३४ च्या फेब्रुवारींत त्यांना दोन वर्षांची शिक्षा झाली. तुरुंगांत असतांना कमला नेहरूंची प्रकृति भयंकर बिघडल्या-मुळें तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घेण्यासाठीं त्या स्वित्सर्लंडांत गेल्या पण तेथेंही त्यांना गुण आला नाहीं. त्यांची प्रकृति उत्तरोत्तर बिघडत चालल्यामुळें अखेर पं. जवाहरलाल यांची ५॥ महिन्यांची शिक्षा सरकारनें माफ केली व ते विमानानें लॉसेनला गेले. तेथें लवकरच कमला नेहरूंचा अंत झाला. पुन्हां १९३६ व १९३७ या सालीं लागोपाठ दोन वेळां पं. नेहरू लखनौ व फैजपूर येथील राष्ट्रीय सभांचे अध्यक्ष झाले.

त्यानंतर ते पुन्हां इंग्लंड, स्पेन, फ्रान्स इत्यादि देशांत हिंडून परत आले. सिलोन व चीन या देशांनाही त्यांनीं नुकतीच भेट दिली. पंडित नेहरूंच्या या विश्वपर्यटणामुळें त्यांची दृष्टि इतकी व्यापक झाली आहे कीं प्रत्येक हिंदी प्रश्नाकडे ते आंतरराष्ट्रीय चष्म्यांतून पहातात. आज हिंदी राष्ट्राचे जे आधारस्तंभ पुढारी आहेत त्यांत महात्मा गांधींच्या खालोखाल पं. नेहरूंचा दर्जा आहे. सांपत्तिक व राजकारणाच्या बाबतींत पं. नेहरूंकडे आपल्या वडि-लांचा वारसा आलेला असला तरी आपल्या कर्तृत्वावरच त्यांनीं आजच्या हिंदी राजकारणांत महनीय स्थान संपादन केलें आहे, यांत शंका नाहीं.

---

# २: बाबू राजेंद्र प्रसाद



" देशसेवेपलीकडे माझी दुसरी कोणतीच महत्त्वाकांक्षा नाहीं. माझ्या आयुष्यांत जर कोणतें सर्वोच्च व एकमेव ध्येय असेल तर देशसेवा येवढेंच आहे. " या शब्दांत बाबू राजेंद्र प्रसाद यांच्या जीवनचरित्राचें रहस्य सांगतां येईल. ना. गोपाल कृष्ण गोखले यांनीं भारतसेवक समाजाला येऊन मिळण्यासाठीं त्यांना जेव्हां आमंत्रण केलें तेव्हां आपल्या ज्येष्ठ बंधूंना स्वतःचें मनोगत स्पष्टपणें

कळविण्यासाठीं त्यांनीं एक सविस्तर पत्र लिहिलें होतें. वर दिलेला उतारा या पत्रांतीलच असून त्यांत त्यांच्या जीवनध्येयाचें स्पष्ट दिग्दर्शन करण्यांत आलें आहे.

एका शब्दांत राजेंद्रबाबूंच्या चरित्राचें सार सांगावयाचें म्हटल्यास तें ' सेवा ' या शब्दांत सांगतां येईल. त्यांच्या चरित्राचें जरी अनेक पैलू असले तरी प्रत्येक पैलू सेवेच्या, सहानुभूतीच्या व प्रेमाच्या तेजाने झळकत आहे. त्यांच्या आयुष्यांतला कोणताही प्रसंग पहा, त्याला देशसेवेचें, लोकसेवेचें किंवा अनाथसेवेचें अधिष्ठान नाहीं असें आढळणार नाहीं. दीनदुःखितांची सेवा करावी, अनाथ-अपगांच्या मदतीला जावें व हर प्रकारें दुःखी कष्टी जीवांच्या उपयोगीं पडावें हे राजेंद्र बाबूंचें जीवितकार्य आहे, असें म्हटल्यास चालेल. चंपारण्य, बिहार भूकंप इत्यादि ठिकाणीं त्यांनीं जें कार्य केलें व त्यांची एकंदर मनोवृत्ति पाहिली तर त्यांना दीनवत्सल किंवा ' दीनबंधु ' म्हणणे अधिक उचित ठरेल. चंपारण्यांत महात्मा गांधींच्या बरोबर काम करीत असतां गांधीजींच्या विभूतिमत्त्वामुळें ते त्यांच्याकडे आकर्षिले गेले व तेव्हांपासून ते गांधीजींचे निष्ठावंत अनुयायी बनले आहेत आणि त्यांनी कॉंग्रेस कार्याला पूर्णपणें वाहून घेतले आहे.

बाबू राजेंद्र प्रसाद यांचा जन्म कायस्थ घराण्यांत ३ डिसेंबर १८८४ सालीं झाला. महात्मा गांधींच्या पूर्वजांप्रमाणें त्यांच्या पूर्वजांनींही कुठल्या ना कुठल्या संस्थानांत दिवाणगिरीचीं कामें केलीं आहेत. बाबूजींचें शिक्षण छपरा नांवाच्या एका खेडेगांवीच झालें, पण १९०२ सालीं ते कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या मॅट्रिकच्या परीक्षेला बसले तेव्हां वीस हजार विद्यार्थ्यांत पहिले आले. त्यांची ही असामान्य बुद्धिमत्ता त्यांच्या पुढील सर्व शिक्षणांत दिसून आली. मॅट्रिकपासून एम्. ए. एल्. एल् एम्. पर्यंत ते पहिल्या वर्गात पहिले आले व

त्यांनीं अनेक बक्षिसें व शिष्यवृत्त्या मिळविल्या. बी. ए. झाल्यावर १९०६सालीं बॅरिस्टर होण्यासाठीं त्यांनीं इंग्लंडची तयारी केली होती पण वडिलांच्या इच्छेसाठीं बेत रहित केला व कर्जाऊ घेतलेले पैसे परत दिले. एम्. ए. झाल्यावर कांहीं दिवस मुझफरपूरचें ब्राह्मण कॉलेज व कलकत्त्याचें सिटी कॉलेज या ठिकाणीं अध्यापन-कार्य केल्यावर १९११ सालीं त्यांनीं कलकत्ता हायकोर्टांत वकिलीला सुरवात केली. त्यापूर्वीं ना. गोखले यांजकडून भारत-सेवक-समाजाचें आमंत्रण आलें होतें. पण वडील बंधूंच्या इच्छेसाठीं त्यांनीं गोखल्यांना नकार दिला. १९१७ सालीं पाटणा येथें वाकिली करीत असतां त्यांच्या आयुष्यांत महात्मा गांधींचा प्रवेश झाला व तेव्हां-पासून त्यांचें आयुष्य म्हणजे देशसेवेचें खरेंखुरें कार्यक्षेत्र बनलें. असहकारितेच्या पहिल्या अमदानींतच त्यांनीं वकिलीला तिलांजली दिली व विधायक राजकारण, खादी, राष्ट्रीय शिक्षण इत्यादि कार्याला वाहून घेतलें. १९३० च्या सार्वत्रिक सत्याग्रहाच्या चळवळींत त्यांना तीन वेळां शिक्षा होऊन दोन वर्षें तुरुंगवास भोगावा लागला. या चळवळीच्या वेळीं कांहीं दिवस काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष म्हणून त्यांनीं काम केलें. १९३४ सालीं मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांची सर्वानुमतें निवड करण्यांत आली. काँग्रेसच्या अध्यक्षपदाचा मान १९३९ सालीं पुन्हां त्यांच्याकडे चालून आला.

विद्वत्ता, मुत्सद्देगिरी, राजकीय दूरदृष्टि, त्यागवृत्ति, निष्ठा, परोपकारबुद्धि इत्यादि गुणसमुच्चयामुळें बाबू राजेंद्रप्रसाद यांचें नांव थोर थोर हिंदी राष्ट्रपुरुषांच्या प्रभावळींत समाविष्ट होईल, हें सांगणें नकोच.

---

# ३: आचार्य प्रफुल्लचंद्र राय

हिंदुस्थानाला ललामभूत होऊन परदेशांतही ह्या राष्ट्राची कीर्ति



वाढविणारे जे थोर पुरुष हिंदुस्थानांत आहेत त्यांत सुप्रसिद्ध शास्त्रीय संशोधक आचार्य प्रफुल्लचंद्र राय यांची गणना होते. जगदीशचंद्र बोस किंवा चंद्रशेखर रमण यांच्याप्रमाणें ते संशोधक तर आहेतच पण त्याहीपेक्षां हिंदुस्थानच्या औद्योगिक पुनर्घटनेच्या कामीं आपली संशोधनबुद्धि खर्च करून नवीन उद्योगधंदे निर्माण करण्यांत त्यांनीं महत्त्वाचें राष्ट्रकार्य केलें आहे. ' बंगाल केमिकल् वर्क्स ' नांवाचा औषधें तयार करण्याचा कारखाना काढून त्यांनीं

हिंदी राष्ट्राच्या उद्योगधंद्याला एक नवीन व राष्ट्रोपयुक्त दिशा दाखविली आहे.

बंगालमध्यें खुलना जिल्ह्यांतील एका खेडगांवी आचार्य राय यांचा १८६१ सालीं जन्म झाला. त्यांचे वडील बाबू हरिश्चंद्र राय हे फारशी भाषेचे पंडित म्हणून सर्वत्र विख्यात होते. कलकत्ता कॉलेजचे शिक्षण संपल्यावर रसायनशास्त्राचा विशेष अभ्यास करण्यासाठीं ते विलायतेस गेले. एडिंबरोस ६ वर्षे अध्ययन करून त्यांनी डी. एस्सी. ही सर्वश्रेष्ठ पदवी संपादन केली व १८८८ सालीं हिंदुस्थानांत परत आले, व लागलींच कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत केमिस्ट्रीचे प्रोफेसर म्हणून त्यांची नेमणूक झाली. हे अध्यापनाचें कार्य त्यांनीं अखंडपणें ३० वर्षे केलें. अध्यापन चालू असतांही त्यांचें संशोधन चालूच होतें.

१८९२ सालीं त्यांनीं बंगाल केमिकल वर्क्स या औषधें तयार करण्याच्या कारखान्याची स्थापना केली. सुरवातीला त्यांच्याजवळ साडेसातशें रुपयापेक्षां अधिक भांडवल नव्हतें. पण आचार्य राय यांच्या परिश्रमाने व दीर्घोद्योगाने तीस वर्षांत या कारखान्याचा इतका उत्कर्ष झाला कीं हिंदुस्थानांत तिच्या एवढी मोठी व परदेशांत नांवाजलेली अशी कोणतीच रसशाळा नाहीं. या संस्थेचें आजचें भांडवल २९ लक्ष रुपये असून त्यांत २ हजार कामगार काम करीत आहेत. संस्थेचे एकंदर कार्यक्षेत्र १३५ एकर आहे. या कारखान्यात सर्व प्रकारचीं औषधें, दंतमंजनें, साबण, रसायनें वगैरे हजारों वस्तु तयार होतात व त्यांचा खप हिंदुस्थानाप्रमाणें परदेशांतही होतो.

या कारखान्याची आज जी अपूर्व प्रगति झाली आहे तिचें सर्व श्रेय आचार्य रॉय यांच्या उद्योगशीलता, दृढनिश्चय, कार्यनिष्ठा, कल्पकता वगैरे गुणांना दिलें पाहिजे. या कारखान्याशिवाय आचार्यांनी इतरही अनेक औद्योगिक संस्था काढल्या आहेत.

त्यांना प्रसिद्धीची मुळींच आवड नसून त्यांची रहाणी अगदी साधी आहे. ते आजन्म ब्रह्मचारी आहेत. शास्त्रीय व औद्योगिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं ते मनोभावें झटत असतात. त्यांनी आजपर्यंत विद्यार्थ्यांना हजारों रुपयांची मदत केली असून कलकत्ता विद्यापीठांत रसायनशास्त्राचें संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीं दोनशे रुपयांची शिष्यवृत्ति ठेवली आहे. पंजाब व मद्रास विद्यापीठानें त्यांची खास व्याख्यानमाला करविली होती. तिचा जो मोबदला मिळाला तो त्यांनीं शास्त्रीय संशोधनासाठीं त्या त्या विद्यापीठांना परत देऊन टाकला. यावरून त्यांची निष्काम विद्याभिरुचि दिसून येते.

अलीकडे खादी व ग्रामोद्योग या कार्याला त्यांनीं सर्वतोपरी वाहून घेतलें आहे. खादीच्या उत्पत्तीसाठीं त्यांनी आपल्या संपत्तीचा ट्रस्ट करून ठेवला आहे. आचार्य प्रफुल्लचंद्र राय यांच्यासारखे औद्योगिक दृष्टीचे शास्त्रज्ञ हिंदुस्थानांत जितके निर्माण होतील तितके हवे आहेत.

---

# ४: डॉ. सर महंमद इक्बल

"सारे जहांसे अच्छा हिंदोस्तान हमारा" हें उर्दू राष्ट्रगीत पुष्कळांना ठाऊक असेल, पण त्याचा कर्ता मात्र फारच थोड्यांना परिचित असण्याचा संभव आहे. 'वंदेमातरम्' या अखिल भारतीय राष्ट्रगीताप्रमाणे 'हिंदोस्तान हमारा' हें गीत सर्वत्र गाजलेलें नाहीं, तथापि त्यांत एकराष्ट्रीयत्वाची उत्कट भावना ओतप्रोत भरून राहि-लेली आहे हें कोणालाही दिसून येईल. या राष्ट्रगीताचे निर्माते डॉ.

सर महंमद इक्बल हे नामांकित कवि म्हणून जितके प्रसिद्ध



होतें तितकेच हिंदी स्वातंत्र्याचे भक्त म्हणून त्यांनीं नांव मिळविलें होतें. हिंदुस्थानच्या पारतंत्र्याबद्दल ते हळहळत, तसेंच जगांतील मुसलमानांचें एकीकरण करण्याची त्यांची लालसा होती. तथापि कविश्रेष्ठ म्हणूनच रवींद्रनाथ टागोर यांच्या बरोबरीनें त्यांचें नांव विश्वविख्यात झालें आहे, हें विशेष सांगण्यासारखें आहे. त्यांच्या सन्मानार्थ लंडन येथें 'इक्बल सोसायटी' स्थापन झालेली आहे.

डॉ. इक्बल हे पंजाबी मुसलमान होते. त्यांचा जन्म १८७५ सालीं झाला. शाळा—कॉलेजांत त्यांनीं अनेक बक्षिसें मिळविलीं व अनेक पदव्या संपादन केल्या. लाहोर विद्यापीठाचे एम्. ए. झाल्यावर कांहीं दिवस त्यांनीं तेथील ओरिएंटल कॉलेजांत इतिहासाचे प्रोफेसर म्हणून काम केलें. उच्च विद्याध्ययनासाठीं ते १९०५ सालीं विलायतेस गेले. केंब्रिजमध्यें त्यांनीं तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. जर्मनींतील म्युनिच युनिव्हर्सिटीनें त्यांच्या इराणच्या तत्त्वज्ञानावरील निबंधास पीएच्. डी. ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. इंग्लंडमध्यें असतांना ते बॅरिस्टरही झाले. १९०८ सालीं ते हिंदुस्थानांत परत आले व त्यांनीं लाहोरला वकिली करण्यास प्रारंभ केला. या

धंद्यांत त्यांनीं चांगलाच नांवलौकिक मिळविला. कांहीं दिवसांनीं सरकारनें त्यांना ' सर ' हा किताब दिला, पण या किताबापेक्षां ' कविवर्य ' हा किताब त्यांना अधिक प्रिय वाटे. सर इक्बल हे अभिजात कवि होते. उर्दू व इराणी कवींच्यापासून त्यांना स्फूर्ति मिळाली. एकदां एका जाहीर सभेंत ' नला-ए-यतिम ' ही करुण-रसपूर्ण कविता म्हणत असतां सारा समाज गहिंवरून गेला. कित्येकांचे डोळे अश्रुपूर्ण झाले, तथापि त्यांना ही कविता पुन्हां पुन्हां म्हणण्याचा आग्रह करण्यांत आला. यावरून त्यांच्या कवित्व-शक्तीची यथार्थ कल्पना येईल. त्यांनीं विविध विषयांवर काव्य-रचना केली आहे. त्यांचीं कित्येक काव्यें तर जगांतील थोर थोर कवींच्या बरोबरीनें अप्रातिम ठरतील. २१ एप्रिल १९३८ रोजीं ते मृत्यु पावले.

सर महंमद इक्बल यांच्यांत इस्लामप्रेमी जातिनिष्ठ वृत्ति जरी अखेरीअखेरीस दिसूं लागली होती तरी राष्ट्रीय कवि म्हणूनच त्यांचें नांव अधिक चिरंजीव होऊन राहील.

---

# ५: बाबू सुभाषचंद्र बोस

बंगाल ही अनेक नररत्नांची खाण आहे. राममोहन राय, रवींद्रनाथ टागोर, जगदीशचंद्र बोस इत्यादि विश्वविख्यात पुरुषां-प्रमाणें सुरेंद्रनाथ बानर्जी, अरविंद घोष, बिपिनचंद्र पाल, देशबंधु दास यांसारख्या थोर राष्ट्रभक्तांमुळें वंगभूमि पुण्यपावन झाली आहे. हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठीं आपलें सर्वस्व वहाण्यास ज्यांनीं माघार घेतली नाहीं अशा स्वातंत्र्यवीरांच्या मालिकेंत बाबू

सुभाषचंद्र बोस यांना अवश्य स्थान दिलें पाहिजे. उत्कट राष्ट्रभक्ति, अलौकिक त्याग, ध्येयनिष्ठा, स्वातंत्र्यलालसा इत्यादि गुणांमुळें




सुभाषबाबूंचें जीवनचरित्र आदर्श व अनुकरणीय झालें आहे. देशासाठीं आय्. सी. एस्. सारख्या वरिष्ठ सरकारी नोकरी-वर तिलांजली देऊन अंदमानांतल्या खडतर हालअपेष्टा आनंदानें भोगणारे बाबू सुभाषचंद्र बोस यांचें चरित्र स्फूर्तिदायक नाहीं असें कोण म्हणेल? त्यांच्या आयुष्यक्रमांत अनेक अद्भुतरम्य घडामोडी झालेल्या आहेत. आपल्या उज्ज्वल कर्तृत्वावर त्यांनीं

हिंदी पुढाऱ्यांत मानाचें स्थान संपादन केलें, इतकेंच नव्हे तर लागोपाठ दोन वेळां ते कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले.

बाबू सुभाषचंद्र बोस यांचा जन्म १८९७ च्या जानेवारींत झाला. त्यांचे वडील रायबहादुर जानकीनाथ कटकला सरकारी नोकर असून खूप श्रीमंत होते. सुभाषबाबूंचें हायस्कूल शिक्षण तेथेंच झालें. ते १९१३ सालीं मॅट्रिकच्या परीक्षेला बसले व सबंध युनिव्हर्सिटींत त्यांनीं दुसरा नंबर मिळविला. त्यांचें उच्च शिक्षण कलकत्त्यास झालें. तेथें त्यांना धार्मिक वाङ्मयाची इतकी गोडी लागली कीं इंटरच्या वर्गांत असतांना ब्रह्मज्ञान संपादन करण्यासाठीं त्यांनीं कॉलेज सोडलें. त्यावेळीं त्यांनीं गुरूच्या शोधार्थ काशी, हरिद्वार, मथुरा इत्यादि अनेक यात्रा केल्या, पण अखेर त्यांची ब्रह्मजिज्ञासा निष्फळ होऊन ते निराश हृदयानें परत आले व पुन्हां कॉलेजांत गेले. १९१७ सालीं ते पहिल्या वर्गांत बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाले.

बी. ए. झाल्यावर केवळ वडिलांच्या इच्छेमुळें ते आय्. सी. एस्. साठीं विलायतेस गेले. सरकारी नोकरींत शृंखलाबद्ध होण्याची त्यांची मुळींच इच्छा नव्हती. तथापि ते परीक्षेला बसले आणि १९२० सालीं आय्. सी. एस्. झाले. शिवाय केंब्रिज विद्यापीठाची बी. ए. ची पदवीही त्यांनीं संपादन केली.

सनदी नोकर म्हणून हिंदुस्थानांत आल्यावर १९२० सालची असहकारितेची चळवळ सुरू झालेली त्यांना दिसली. मातृभूमीची हांक ऐकून तिच्या उद्धारार्थ आपलें सर्वस्व वहाण्याचा त्यांनीं निर्धार केला व लागलींच सरकारी नोकरीवर लाथ मारून ते देशबंधु दास यांच्या नेतृत्वाखालीं देशसेवा करण्यास सिद्ध होऊन राहिले. सुभाषबाबूंच्या या प्रखर राष्ट्रभक्तीचें व बाणेदार त्यागवृत्तीचें सर्वांना कौतुक वाटल्यास नवल नाहीं. देशबंधु दासांच्या तालमींत

ते लवकरच तयार झाले. कांहीं दिवस राष्ट्रीय कॉलेजचे प्रिन्सिपॉल या नात्यानें शिक्षणकार्य केल्यावर स्वयंसेवकांच्या संघटनेकडे त्यांनीं आपलें लक्ष वळविलें. या कार्याचें फळ त्यांना लवकरच मिळालें. १९२१ च्या डिसेंबरांत त्यांना सहा महिन्यांची पहिली शिक्षा झाली. त्यानंतर कांहीं दिवस 'फॉरवर्ड' दैनिकाचे संपादक व कलकत्ता कार्पोरेशनचे चीफ ऑफिसर म्हणून काम केल्यावर बंगाल ऑर्डिनन्स कायद्यान्वयें त्यांना एप्रिल १९२४ मध्यें अटक करण्यांत आली व ब्रह्मदेशांत हद्दपार करण्यांत आलें.

ब्रह्मदेशांतील तुरुंगांत त्यांचें भयंकर हाल झाले. उष्ण हवेमुळें त्यांच्या शरीरावर अत्यंत अनिष्ट परिणाम झाला. त्यांचें वजन उतरलें, प्रकृति क्षीण होऊं लागली, इतकेंच नव्हें तर क्षयरोगाचीं चिन्हें दिसूं लागलीं. त्यांची ही भयंकर स्थिति पाहून सरकारला १९२७ सालीं त्यांची मुक्तता करणें भाग पडलें.

बंधमुक्ततेनंतर कांहीं दिवस विश्रांति घेतल्यावर सुभाषबाबूंनीं खादी व बहिष्कार हा विधायक कार्यक्रम हातीं घेऊन राष्ट्रसेवेला प्रारंभ केला. ते लवकरच बंगाल प्रांतिक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष व वर्किंग कमिटीचे सभासद झाले. पं. मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं जी स्वराज्यघटना-समिती नेमण्यांत आली होती त्या समितींत सुभाषबाबूंची नेमणूक झाली होती. कलकत्ता काँग्रेसच्या प्रसंगीं ते स्वयंसेवकदलाचे सेनानायक होते. १९२९ च्या लाहोर काँग्रेसमध्यें सुभाषबाबूंनीं प्रतिस्पर्धी राज्यघटनेचा ठराव मांडून आपली प्रखर राष्ट्रीय वृत्ति व्यक्त केली होती.

१९३०-३२ च्या चळवळींत त्यांच्यावर तीनचार वेळ कारागृहवासाचा प्रसंग आला. दुसऱ्या सत्याग्रहचळवळींत त्यांना 'स्टेट प्रिझनर' म्हणून बंदिवासांत ठेवण्यांत आलें होतें. मद्रास तुरुंगांत असतांना त्यांची प्रकृति पुन्हां बिघडली व प्रकृतिस्वास्थ्यासाठीं

त्यांना युरोपला जाण्याची सरकारने परवानगी दिली. १९३६ सालीं ते हिंदुस्थानांत आले पण मुंबईस पाऊल टाकतांच त्यांना अटक करण्यांत आली. ते सुमारें एक वर्ष तुरुंगांत होते. पुन्हां १९३७ सालीं ते युरोपला गेले. सुभाषबाबूंची ही चवथी युरोपयात्रा होय. या वेळीं लंडनला गेले असतां त्यांचा अपूर्व सन्मान झाला. सुभाषबाबू लंडनमध्यें असतांनाच हरिपुरा कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांची सर्वानुमतें निवड झाली. त्यानंतर पुढच्याच वर्षीं त्रिपुरीलाही तेच राष्ट्राध्यक्ष होते. ही दुसरी निवडणूक लोकशाही तत्त्वावर झाली हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. पं. जवाहरलाल नेहरूंप्रमाणें बाबू सुभाषचंद्र यांचेंही चरित्र स्फूर्तिप्रेरक वाटेल.

## ६: श्रीमंत सयाजीराव गायकवाड

राजसत्ता ही प्रचलित लोकशाहीच्या काळांत अत्यंत सदोष व टीकेचा विषय होऊन राहिली आहे.त्यामुळें राजा कितीही चांगला असला तरी तो प्रजेच्या सत्तेपुढें मान्यता पावत नाहीं.पण बडोद्याचे अधिपति श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांना हें वर्णन मुळींच लागू नाहीं. विशेषतः ज्या काळांत त्यांनीं खंबीरपणानें स्वाभिमान राखला त्या काळाचा विचार करतां जें लोकशाहीला करतां आलें नाहीं तें या राजानें करून दाखविलें यांतच सयाजीरावांचा गौरव व थोरपणा आहे. केवळ एक बडा संस्थानाधिपति म्हणून त्यांचे चरित्र येथें दिलें नाहीं, तर आजच्या लोकशाहीच्या काळाशीं व प्रजाजनांच्या आकांक्षांशीं समरस होणारा प्रजाहितदक्ष व कर्तृत्ववान संस्थानिक म्हणून सर्व हिंदी संस्थानिकांपुढे सयाजीरावांनीं जो आदर्श ठेवला आहे, त्यामुळें त्यांचें जीवन-चरित्र थोर पुरुषांच्या मालिकेंत समाविष्ट होण्याजोगें झालें आहे.

सयाजीरावांचा जन्म १८६३ सालीं नाशिक जिल्ह्यांत एका खेडेगांवीं झाला. ते जन्म-सिद्ध राजघराण्यांतील नव्हते, दत्तक म्हणून बडोदें संस्थानच्या गादीवर विराजमान झाले. ते गायकवाड घराण्यांतील होते एवढी गोष्ट खरी आणि त्यामुळेंच दत्तकाची निवड करण्यासाठीं त्यांच्या दोघां भावांसह त्यांना बडोदें येथें आणण्यांत आलें होतें. त्यांची हुषारी, चुणचुणीतपणा व तल्लख बुद्धिमत्ता या गुणांमुळें सयाजीरावांची ताबडतोब निवड करण्यांत



आली व ते १८७५ सालीं बडोद्याचे अधिपति म्हणून कायम झाले. सयाजीरावांचें पहिलें नांव गोपाळ असें होतें व ते आपल्या खेडेगांवीं गुरें राखण्याचें काम करीत असत. दैवयोगानें गुराख्याचा प्रजापालक झाला.

सयाजीरावांचें सर्व प्रकारचें शिक्षण उत्तम शिक्षकांच्या हाताखालीं झालें. गुजराथी, मराठी, इंग्रजी, संस्कृत इत्यादि भाषाविषयांत त्यांनीं प्रावीण्य संपादन केलें. राज्यकारभाराचें शिक्षण सर टी. माधवराव यांच्या हस्तें त्यांना मिळालें. अशा प्रकारें राज्यकारभाराची पूर्वतयारी झाल्यावर श्रीमंत सयाजीराव गायकवाड ह्यांनीं २८ डिसेंबर १८८१ रोजीं बडोदें संस्थानचीं राज्यसूत्रें हातीं घेतलीं. त्या वेळीं त्यांचें वय अवघें १८ वर्षांचें होतें. त्यांनीं जवळ जवळ ६० वर्षें राज्य केलें. त्यांच्या या दीर्घकालीन कारकीर्दींत

त्यांनीं आपल्या संस्थानची इतकी सुधारणा केली कीं हिंदी संस्थानांत बडोद्यासारखें आदर्श संस्थान व सयाजीरावांसारखा आदर्श संस्थानिक नाहीं अशी सर्वत्र ख्याति झाली. कारण प्रसंगविशेषीं त्यांनीं आपला स्वाभिमान बाणेदारपणें व्यक्त करावयास मागेंपुढें पाहिलें नाहीं.

आपल्या कारकीर्दीच्या सुरवातीला त्यांनीं बडोद्याला अगदीं अभिनव रूप दिलें. बडोद्याच्या इमारती, अजबखाने, बागबगीचे, रस्ते, आणि सार्वजनिक उपयोगी संस्था यांत त्यांचा विशिष्ट दृष्टिकोण होता. प्रत्येक गोष्टींत त्यांच्या विचाराची छाप जशी दिसून येई, त्याचप्रमाणें त्यांच्या उच्च संस्कृतीचीही छटा त्यांत उमटलेली दिसे. पाश्चात्य शहरांप्रमाणें आपलें शहर करावें, आपली शासन-संस्था त्या वळणावर न्यावी अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती. प्रजेला साक्षर करणें, प्रजेचें दारिद्र्य नाहींसें करण्यासाठीं उद्योग-धंद्यांच्या शिक्षणाची सोय करणें आणि परंपरागत सामाजिक जीवनाला कलाटणी देणें हीं कामें त्यांनी केली. त्यांच्या संस्थानांत त्यांनीं घटस्फोटाचा कायदा पास केला, अस्पृश्यांना मंदिरप्रवेशाची मोकळीक दिली, सगोत्र विवाह कायदेशीर मानला, वगैरे सामाजिक क्रांतिकारक वाटणाऱ्या गोष्टी त्यांनीं केल्या.

विद्वानांचा व गुणीजनांचा परामर्ष घेण्याच्या बाबतींत त्यांच्या इतकी गुणग्राहक बुद्धि इतरत्र फारच क्वचित् दृष्टीस पडेल. सयाजीराव महाराज स्वतः बहुश्रुत, व्यासंगी व विद्याभिरुचिसंपन्न असल्यामुळें विद्येची श्रेष्ठता व विद्वत्तेचें महत्त्व त्यांना यथार्थपणें कळलें होतें. बहुजनसमाजांत शिक्षणाचा प्रसार व्हावा व साक्षरांना वाचनाची गोडी लागावी म्हणून त्यांनीं आपल्या संस्थानांत ठिकठिकाणीं वाचनालयें स्थापन केलीं आहेत. खुद्द बडोद्यांतील वाचनालय प्रचंड असून अत्यंत नमुनेदार आहे.

सयाजीरावांची मनोवृत्ति उदार व गुणग्राहक असल्यामुळें आपल्या संस्थानाबाहेरील उपयुक्त व लोकहितैषी संस्थांना त्यांनीं मोठमोठ्या देणग्या दिल्या. बनारस हिंदु विद्यापीठाला त्यांनीं २ लाखांची देणगी दिली. याशिवाय इतरही अनेक संस्थांना त्यांनीं देणग्या दिल्या होत्या. या देणग्या स्वदेशांतच दिलेल्या नसून परदेशांतही दिलेल्या आहेत. त्यांच्याजवळ धर्मभेद किंवा जातिभेद नसल्यामुळें मुसलमान, ख्रिस्ती वगैरे धर्मीयांच्या धर्ममंदिरांनाही त्यांनी पुष्कळ मदत केली होती. त्यांना जें कार्य प्रामाणिकपणें चाललें आहे असें वाटे तेथें ते मदत करीत असत. धर्म व तत्त्वज्ञान या विषयांची त्यांना फार आवड असे व नवीं नवीं तत्त्वज्ञानविषयक पुस्तकें ते वाचीत असत. प्रकृतिस्वास्थासाठीं ते वारवार विलायतला जात. शेवटचीं कांहीं वर्षें तर त्यांचें वास्तव्य बहुतेक परदेशांतच असे.

श्रीमंत सयाजीराव गायकवाड हे खरेखुरे राजर्षि होते. त्यांच्यासारख्या थोर, प्रजाहितदक्ष व सुधारणाप्रिय संस्थानिकाचा आदर्श इतर संस्थानिकांनीं आपल्यापुढें अवश्य ठेवण्यासारखा आहे.

---

## ७: खान अब्दुल गफारखान

"मी केवळ शिपाई आहे, हुकूम बजावणें हें माझें काम; शिपाईगिरी करीत असतांच माझा देह पडावा एवढेंच माझें मागणें आहे." या शब्दांत अब्दुल गफारखान यांनी आपल्या आयुष्याचें रहस्य सांगितलें आहे. ते आज कॉंग्रेसचे पहिल्या दर्जाचे पुढारी असले तरी स्वतःला सेवक समजतात. १९३४ सालीं मुबई कॉंग्रेसचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याबद्दल त्यांना विनंती करण्यांत आली असतां

त्यांनीं वरील उद्गार काढले. सरहद्द प्रांतांत राष्ट्रीय जागृति करण्याचें सर्व ध्येय अब्दुल गफारखान यांनाच दिलें पाहिजे,

खान अब्दुल गफारखान यांचा जन्म इ. स. १८९० सालीं झाला. त्यांचे वडील बहेरामखान पेशावर जिल्ह्यांतील उतमानझाई गांवाचे खान होते. हें गांव पेशावरच्या पलीकडे वीसबावीस मैल असून तेथेंच जवळजवळ हिंदुस्थानची सरहद्द संपते. बहेरामखान यांचें जीवन अत्यंत सदाचारी व धर्मनिष्ठ होतें. त्यांच्या चारित्र्याचें प्रति-



बिंब त्यांच्या चिरंजीवांवर उत्कटपणें पडलें आहे. बहेरामखान यांनीं रौलट बिलाविरुद्ध सत्याग्रह केला होता व त्यांत त्यांना तीन महिने तुरुंगवासाची शिक्षा झाली होती. ते १९२६ सालीं आपल्या वयाच्या ९५ व्या वर्षीं मृत्यु पावले.

सरहद्दीचा मुलूख आधींच पहाडी व जंगली व त्यांत तेथील जनता अज्ञाणी व धर्मनिष्ठ, त्यामुळें खानबंधूंना शाळेंत जाणें कठीण होतें. मुलांनीं शाळेंत शिकण्याला मुल्लामौलवींचा व लोकमताचा विरोध होता. पण बहेरामखानांनीं गफारखानांना पेशावरच्या

एका मिशनरी शाळेंत घातलें. गफारखानांचे ज्येष्ठ बंधू डॉ. खान-साहेब ( सध्यांचे सरहद्द प्रांताचे मुख्य मंत्री ) हे सरकारी शाळेंत जात. ते पुढें मिशनरी कॉलेजांत गेले. तेथील शिक्षण संपल्यावर एक वर्ष मुंबईच्या मेडिकल कॉलेजांत त्यांनीं घालविलें आणि पुढें विलायतेस गेले. तेथून एम्. आर्. सी. एस्. ही सर्वोच्च पदवी व आंग्ल पत्नी घेऊन ते परत आले.

गफारखानांनाही थोरल्या बंधूप्रमाणें उच्च शिक्षण देऊन विलायतेस पाठविण्याचा त्यांच्या वडिलांचा विचार होता, पण कौटुंबिक अडचणीमुळें त्यांना मॅट्रिकही होतां आलें नाहीं. पुढें त्यांना लष्करांत प्रवेश करावा असें वाटूं लागलें व त्यांनीं अर्जही केला. त्यांची ६। फूट उंची, प्रचंड व मजबूत शरीरयष्टि व पठाणी जात यामुळें त्यांची ताबडतोब नेमणूक झाली. पण नोकरींत पदोपदीं अपमान होतो असें समजल्यावरून त्यांनीं नोकरीचा बेत रद्द केला व ते अलीगढला गेले.

अलीगढ येथें ते उर्दू शिकले. मौ. अबुल कलाम अझाद यांचें अल हिलाल नांवाचे प्रसिद्ध वर्तमानपत्र होते. तें वाचण्याची त्यांना फार गोडी वाटूं लागली व त्यामुळेंच प्रचलित राजकारणाकडे त्यांचें लक्ष वेधलें. पुढें रौलट बिलामुळे हिंदुस्थानांत जेव्हां सत्याग्रहाचा प्रचंड वणवा पेटला त्या वेळीं त्यांनीं त्यांत उडी घेतली, व ते तुरुं-गांत गेले. १९२० सालीं ते नागपूरच्या कॉंग्रेसला प्रतिनिधि म्हणून गेले होते. असहकारितेच्या ठरावाप्रमाणें त्यांनीं आपल्या प्रांतांत विधायक काम करण्यास सुरवात केली. त्यांनीं उतमानझाई येथें 'आझाद शाळा' नांवाची राष्ट्रीय शाळा स्थापन करून कॉंग्रेसचा संदेश खेडोपाडीं पोंचविण्याची तयारी चालविली. पण सरहद्द प्रांतांत कोणत्याही चळवळीला मनाई असल्यामुळे खानसाहेबांना दुसऱ्यांदा तुरुंगांत जावें लागलें. त्यांना तीन वर्षांची शिक्षा झाली.

या तुरुंगवासांत त्यांचे भयंकर हाल झाले. त्यांचें २२० पौंड वजन १६०वर आले. या अवधींत त्यांनीं 'गीता', 'ग्रंथसाहेब' व 'बायबल' यांचें वाचन केलें.

तुरुंगांतून सुटल्यावर त्यांनीं आपलें राष्ट्रीय शिक्षणाचें काम पुढें चालू केले. ते दरवर्षी कॉंग्रेसला जात व आपल्या प्रांतांत जागृति करीत. १९२९ सालीं त्यांनीं समाजसुधारणेसाठीं खुदाई खिदमतगार ( ईश्वराचे सेवक ) नांवाची संस्था काढली. पुढें ती व्यापक बनून पूर्ण राष्ट्रीय स्वरूपाची झाली. या संस्थेच्या द्वारें खानसाहेबांनीं सरहद्द प्रांतांत जें कार्य केलें त्यामुळेंच त्यांचें नांव हिंदी राष्ट्रीय पुढाऱ्यांत समाविष्ट झालें. १९३०–३२ च्या कायदेभंगाच्या चळवळींत १ लाख खुदाई खिदमतगारांनीं भाग घेऊन कारागृहवास पत्करला. खानसाहेबांनाही त्या अवधींत दोनदां शिक्षा झाली. १९३४ सालीं त्यांना हद्दपार करण्यांत आलें व १९३५ सालीं मुंबईस राजद्रोही भाषण केल्याच्या आरोपावरून पुन्हां दोन वर्षांची सजा झाली.

तुरुंगांतून आल्यावर हळूहळू खानसाहेबांची वृत्ति अधिक धार्मिक बनली. ते निरनिराळ्या तत्त्वज्ञानांचा अभ्यास करूं लागले. मौन, उपवास, नमाज, प्रार्थना इत्यादि कार्यक्रम नियमित सुरू झाले. महात्मा गांधींचा अनासक्तीचा आदर्श पुढें ठेवून ते कडक व्रताचरण करूं लागल्यामुळें त्यांचे ' सरहद्द गांधी ' असें नांव प्रचलित झालें. पठाणी संस्कृतींत जन्म घेतलेल्या ' सरहद्द गांधींनीं ' महात्मा गांधींप्रमाणें आपलें जीवन अहिंसामय केलें आहे.

---

# ८: चिंतामण विनायक वैद्य

असामान्य बुद्धिमत्ता, अनेक विषयांचा गाढ व्यासंग, सूक्ष्म



संशोधनबुद्धि, मूलग्राही पांडित्य,प्राचीन वाङ्मयाचें सखोल परिशीलन इत्यादि गुणांमुळें चिंतामण विनायक वैद्य यांचें नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत चिरस्थायी होऊन राहील यांत शंका नाहीं. त्यांनीं महाभारताचें इतकें सूक्ष्म व मार्मिक अध्ययन केलें होतें कीं महाभारताच्या बाबतींत त्यांचा अधिकार केवळ अद्वितीय होता. आणि म्हणूनच त्यांना लो. टिळकांनीं 'भारताचार्य' ही यथार्थ पदवी दिली होती. चिंतामणराव वैद्य कादंबरीकार, नाटककार, खगोलशास्त्रज्ञ, राजकीय पुढारी, इतिहाससंशोधक व इतिहासकार होते, तरी त्यांची विद्वत्ता ही सर्वांत

अग्रभागीं होती. त्यांच्या या सर्वश्रेष्ठ गुणाला अनुलक्षूनच पुण्याच्या टिळक-विद्यापीठानें त्यांना 'विद्वत्कुलशेखर' ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला.

चिंतामण विनायक ऊर्फ नानासाहेब वैद्य यांचा जन्म कल्याण येथें १८६१ सालीं झाला. त्यांचे वडील तेथें वकील होते, पण वडिलांच्या मागें नानासाहेबांवर कर्जाचा बोजा मात्र पडला. हें कर्ज नोकरी लागल्यावर त्यांनीं फेडलें. लहानपणापासूनच ते अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी होते. पण वर्षभर अभ्यास करण्याची त्यांना कधींच संवय नसे. वर्षांतील नऊ महिने तालीम व इतर व्यायाम करण्यांत ते घालवीत. मात्र परीक्षा जवळ आली कीं रात्रीचा दिवस करून अभ्यास करीत आणि पहिला नंबर मिळवीत. ते एम्. ए. एल्एल्. बी. होते. मुंबई विद्यापीठांत जेवढीं बक्षिसें व जेवढ्या शिष्यवृत्त्या होत्या तेवढ्या सर्व त्यांनीं मिळविल्या. त्यांच्या इतकीं बक्षिसें व शिष्यवृत्त्या मुंबई विश्वविद्यालयांत अजूनपर्यंत तरी कोणीं मिळविल्या नाहीत.

सर्व शिक्षण संपल्यावर कौटुंबिक अडचणींमुळें त्यांना नोकरी करणें भाग पडलें. प्रथम कोल्हापूरला सबजज्ज म्हणून ते गेले. तेथें कांहीं दिवस काम केल्यावर उज्जैनला प्रांताचे कमिशनर म्हणून त्यांची नेमणूक झाली. आणि नंतर तेथून ते ग्वालेरला गेले ग्वालेरला ते हायकोर्ट जज्ज होते. पण न्यायाधीशाचें काम त्यांच्या स्वभावधर्माला व विद्याप्रवृत्तीला रुचणारें नव्हतें. तथापि त्यांनीं दिलेले निवाडे हे महत्त्वाचे गणले जात. सुमारें १९०५ च्या सुमारास ते ग्वालेरच्या नोकरींतून सेवानिवृत्त झाले. त्या वेळीं त्यांच्यासाठीं एक खास दरबार भरविण्यांत आला होता व त्यांना नजराणाही देण्यांत आला. संस्थानी वातावरण त्यांना विशेषसें मानवलें नाहीं.

निवृत्त झाल्यावर त्यांची लो. टिळकांशीं गाठ पडली व लोक-

मान्यांनीं त्यांना प्रत्यक्ष राजकारणांत भाग घेण्यास सुचविलें. पण त्या वेळीं चिंतामणरावांना महाभारताचा व्यासंग करावयाचा असल्यामुळे ते राजकारणापासून अलिप्त राहिले. या काळांत त्यांनीं महाभारताची संक्षिप्त आवृत्ति तयार केली व महाभारताचें मंथन करून 'उपसंहार' लिहिण्याची पूर्वतयारी करून ठेवली. कांहीं दिवसांनीं ते होमरूल संघ, कॉंग्रेस वगैरेंतून भाग घेऊं लागले. १९०७ च्या सुरत कॉंग्रेसच्या वेळीं नानासाहेबांनीं टिळकांना बरीच मदत केली होती.

लो. टिळकांच्या मृत्यूनंतर ते महात्मा गांधींचे अनुयायी झाले. राष्ट्रीय शिक्षणाच्या कार्यांत त्यांनीं महत्त्वाचा भाग घेतला. टिळक विद्यापीठांत ते अध्यापनाचें कार्य करूं लागले. पुढें याच विद्यापीठाचे 'कुलगुरु' म्हणून त्यांची निवड झाली. लो. टिळक हयात असतांना १९१९ सालीं मुंबई कौन्सिलासाठीं उमेदवार म्हणून त्यांना उभें करण्याचें ठरलें होतें. पण महात्मा गांधींच्या असहकारितेच्या घोषणेमुळें त्यांनीं आपली उमेदवारी इतरांबरोबर परत घेतली. त्यानंतर ते कॉंग्रेसमध्यें विशेष निष्ठेनें काम करूं लागले. त्यांच्या विशिष्ट मनोरचनेमुळें त्यांना 'चळवळें' राजकारण पसत नव्हतें, तथापि राष्ट्रीय शिक्षणासारख्या विधायक कार्याकडे त्यांनीं आपलें सर्वस्व खर्च केलें.

पण राजकारणापेक्षां नानासाहेबांचें खरें कार्यक्षेत्र व पराक्रम-क्षेत्र निराळे होतें. विद्याव्यासंग, संशोधन वगैरेंची त्यांना मना-पासून गोडी होती व त्यांतच ते रमले आणि तेथेंच त्यांनीं आपलें नांव चिरंजीव करून ठेवलें. 'महाभारताचा उपसंहार,' 'मध्ययुगीन भारत' 'निबंध आणि भाषणें' हीं त्यांचीं पुस्तकें त्यांच्या विद्वत्तेची यथार्थ साक्ष देतील. त्यांच्यासारख्या विद्वज्जड संशोधकानें कादंबरीक्षेत्रांत शिरावें आणि 'दुर्दैवी रंगू' सारखी आदर्श

ऐतिहासिक कादंबरी लिहावी याचें कोणालाही आश्चर्य वाटेल. पृथ्वीराज–संयोगिता म्हणून एक नाटकही त्यांनीं लिहिलें आहे. त्यांची विद्वत्ता नुसत्या पुराणकालांतच रमणारी नव्हती, तिच्यावर आधुनिकतेचे उज्ज्वल संस्कार झाले होते. चिंतामणरावांचा ज्योतिषाचा गाढ व्यासंग होता. पंचांगसंशोधनाच्या वादांत ते प्रमुख होते. संगीत, सतारवादन, इत्यादिकांतही त्यांची गति होती.

चिंतामणरावांचा स्वभाव इतका मनमोकळा, प्रेमळ व प्रांजल होता कीं मोठ्या लोकांप्रमाणें लहान मुलांतही ते सारख्याच समरसतेनें मिसळत. त्यांचें मनमोकळें हास्य अत्यंत आकर्षक होतें. मृत्यूपूर्वीं कांहीं वर्षें त्यांची प्रकृति बरीच बिघडलेली होती. आर्थिक व कौटुंबिक अस्वास्थ्यामुळें त्यांचें मनःस्वास्थ्य नाहींसें झालें होतें. त्यामुळें त्यांचा शेवट फार करुणास्पद झाला. ते २० एप्रिल १९३८ रोजीं मृत्यु पावले.

# ९: डॉ. सर राधाकृष्णन्

१८९० सालीं अमेरिकेंत शिकागो शहरीं भरलेल्या विश्वधर्मपरिषदेंत स्वामी विवेकानंद यांनीं हिंदुधर्माचा ध्वज फडकविला व हिंदु संस्कृति किती श्रेष्ठ आहे याची जगाला जाणीव करून दिली. पाश्चात्य जगाला हिंदी तत्त्वज्ञानाचा परिचय करून देण्याचें विवेकानंदांचें कार्य त्यांच्या नंतर त्यांच्याइतक्याच



कर्तृत्वानें आजकाल जर कोणी चालवीत असेल तर डॉ. राधाकृष्णन् याच्याशिवाय दुसऱ्या कोणाचाही उल्लेख करतां येणार नाहीं. इतकें त्यांचे कार्य अद्वितीय आहे. ते सध्यां ऑक्सफर्ड विद्यापीठांत पौर्वात्य तत्त्वज्ञान व हिंदी संस्कृति या विषयांचे प्रोफेसर असून युरोप, आफ्रिका व अमेरिका या देशांत त्यांनीं हिंदुधर्मावर अनेक व्याख्यानें देऊन हिंदी संस्कृतीचें श्रेष्ठत्व त्यांना पटविले आहे. डॉ. राधाकृष्णन् यांची ही कामगिरी बहुमोल व राष्ट्रीय स्वरूपाची आहे यांत शंका नाहीं.

महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर, जवाहरलाल नेहरू इत्यादि ज्या चारदोन हिंदी व्यक्तींचीं नांवें सर्व जगभर विख्यात आहेत त्यांपैकीं डॉ. राधाकृष्णन् यांचें एक नांव आहे, एवढे सांगितले असतां त्यांच्या थोरपणाची यथार्थ कल्पना येईल. डॉ. सर सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा जन्म ५ सप्टेंबर १८८८ सालीं मद्रासजवळ एका खेड्यांत झाला. सर्वपल्ली हें त्यांच्या घराण्याचें मूळ गांव असून त्यांचें स्वतःचे नांव राधाकृष्णन आहे. सर्वपल्ली राधाकृष्णन् याचा अर्थ सर्वपल्लीचे राधाकृष्णन्. मद्रासकडील नांव लिहिण्याची ही विशिष्ट पद्धत आहे. त्यांचें प्राथमिक शिक्षण कर्मठ आईबापांच्या देखरेखीखालीं झालें व पुढील सर्व शिक्षण ख्रिस्ती शाळाकॉलेजांत झालें, त्यामुळें लहानपणापासूनच त्यांच्या मनावर या दोन धर्मांचे परस्परविरोधी संस्कार होत गेले. आणि त्याचा परिणाम म्हणून दोन्ही धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा त्यांनीं कृतनिश्चय केला.

१९०८ सालीं मद्रास विद्यापीठाचे एम्. ए. झाल्यावर मद्रास, कलकत्ता व म्हैसूर या विद्यापीठांत तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर म्हणून त्यांनीं काम केलें. या अवधींत म्हणजे १९२६ पर्यंत त्यांचें नांव या तीन विद्यापीठां-व्यतिरिक्त हिंदुस्थानांत सुद्धां कोणाला माहीत नव्हतें. पण त्या वर्षी कलकत्ता विद्यापीठानें त्यांना आपले प्रतिनिधि

म्हणून ब्रिटिश साम्राज्यांतील सर्व विद्यापीठांच्या परिषदेला व अमेरिकेंतील ‘ तत्त्वज्ञान–परिषदेला ’ पाठविलें, आणि तेव्हांपासूनच हिंदुस्थानाला व जगाला त्यांची ओळख होऊं लागली.

युरोपच्या या पहिल्या सफरीच्या वेळी ऑक्सफर्ड येथील मँचेस्टर कॉलेजमध्यें एक व्याख्यानमाला देण्याची त्यांना विनंती करण्यात आली. त्यांनीं या व्याख्यानांत ‘ हिंदु तत्त्वज्ञानाची मूलतत्त्वें ’ हा विषय इतक्या विद्वत्तापूर्ण रीतीनें मांडला कीं केवळ त्या व्याख्यान-मालेमुळेंच राधाकृष्णन् यांचे नांव युरोपअमेरिकेंत सर्वतोमुखी झालें. अमेरिकेंत हार्वर्ड येथील तत्त्वज्ञान–परिषदेत ‘ जगाच्या संस्कृतीचें भवितव्य ’ या नांवाचे त्यांचें जें व्याख्यान झाले त्यावरून त्यांची विद्वत्ता, तत्त्वज्ञान, धर्म व संस्कृति या विषयांवरचा त्यांचा थोर अधिकार, इत्यादि गुण जनतेच्या निदर्शनास आले.

डॉ. राधाकृष्णन् यांच्या पांडित्यामुळे हिंदुस्थानाबाहेर युरोपअमेरिकेंतल्या विद्यापीठांनीं तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर म्हणून त्यांची खास योजना केली होती. अमेरिकेंत शिकागो विद्यापीठांत ते १९२६ सालीं ‘ तुलनात्मक धर्म ’ या विषयाचे अध्यापक होते. तसेंच १९२९ सालीं ऑक्सफर्ड येथील मँचेस्टर कॉलेजांत प्रोफेसर व प्रिन्सिपॉल या दोन्ही नात्यांनीं तेथे अध्यापनाचे कार्य केलें. राष्ट्रसंघाच्या बौद्धिक सहकार्याच्या आंतरराष्ट्रीय समितीचे ते कांहीं वर्षें सभासद होते. हिंदी विद्यापीठांनींही त्यांना योग्य तो सन्मान दिला आहे. कलकत्ता विश्वविद्यालयाच्या सर्वांत श्रेष्ठ परी-क्षेच्या अभ्यासक्रमाचे अध्यक्ष व आंध्र विद्यापीठाचे व्हाइस-चॅन्सेलर म्हणून त्यांना नेमण्यांत आलें होतें. नुकतीच त्यांची हिंदुविश्व-विद्यालयाचे व्हाइस चॅन्सेलर म्हणून निवड झाली आहे. सध्यां ते ऑक्सफर्ड विद्यापीठांत तत्त्वज्ञान शाखेचे प्रमुख म्हणून काम करीत असतात. ही जागा या पूर्वी नव्हती व ती खास त्यांच्यामार्फत निर्माण करण्यांत आली आहे. ऑक्सफर्ड विद्यापीठासारख्या सर्वोच्च

विद्यापीठानें डॉ. राधाकृष्णन् यांच्यासारख्या परदेशी पदव्या न घेतलेल्या एका हिंदी गृहस्थास हा बहुमान दिला आहे, यावरून राधाकृष्णन् यांची योग्यता किती आहे तें कळून येईल.

डॉ. राधाकृष्णन् हे जसे उत्कृष्ट लेखक आहेत त्याप्रमाणें प्रभावी व अस्खलित वक्ते आहेत.त्यांचें इंग्रजी भाषेवरचें प्रभुत्व वाखाणण्यासारखें आहे. 'भारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञान' 'आपल्याला कोणता धर्म पाहिजे' व 'धर्म आणि तत्त्वज्ञान' इत्यादि विविध विषयांवर त्यांनीं दहाबारा पुस्तकें लिहिलीं असून महात्मा गांधींसंबंधीं नुकतेंच एक नवीन पुस्तक तयार केलें आहे. गांधींच्या कार्यक्रमावर त्यांची अलोट श्रद्धा आहे. गांधींचें सत्याग्रहाचें तत्त्वज्ञान त्यांना पूर्णपणें मान्य आहे. डॉ. राधाकृष्णन् यांच्या हातून स्वामी विवेकानंदाप्रमाणें भारतीय तत्त्वज्ञानाचा जगभर प्रसार होवो अशीच कोणाही हिंदी माणसाची अपेक्षा असणार.

# १०: नरसिंह चिंतामण केळकर



लो. टिळकांचे विश्वस्त सहकारी, महाराष्ट्रीय राजकारणांतील लो. टिळकांचे वारसदार, 'केसरी'चे अनेक वर्षें संपादक, महाराष्ट्राचे अष्टपैलू पुढारी इत्यादि विविध नात्यांनीं नरसिंह चिंतामण केळकर सर्वत्र महशूर झालेले असले तरी चतुरस्र बुद्धीचे विद्वान साहित्याचार्य म्हणूनच त्यांचें नांव अधिक चिरंजीव होईल यांत शंका नाहीं. केळकरांनीं आपल्या वयाच्या२४व्या वर्षी सार्वजनिक जीवनांत पदार्पण केलें

आणि संपादक, राजकारणी पुढारी, म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष, कौन्सिलचे सभासद, असहकारितावादी, लोकशाही स्वराज्यपक्षाचे अध्वर्यु, हिंदुसभावादी, साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष इत्यादि विविध स्थित्यंतरांनंतर ते १९३७ सालीं कार्यनिवृत्त झाले. न्यायमूर्ति रानडे यांच्यानंतर यांच्यासारखा सर्वांगीण बुद्धीचा व व्यापक दृष्टीचा सार्वजनिक पुढारी म्हणून केळकरांचा उल्लेख केला जातो आणि तो फारसा चुकीचा नाहीं. कारण केळकरांचें सार्वजनिक जीवन तितकेंच बहुविध, अनेकरंगी व सर्वस्पर्शी होतें.

नरसिंह चिंतामण केळकर यांचा जन्म २४ ऑगस्ट १८७२ सालीं झाला. त्यांच्या वडिलांची परिस्थिति अत्यंत हलाखीची असल्यामुळें त्यांचीं पहिलीं कांहीं वर्षें फार कष्टाचीं गेलीं. मिरज येथे त्यांचे प्राथमिक व हायस्कूल शिक्षण झाल्यावर ते फर्ग्युसन कॉलेजांत गेले. १८९१ सालीं डेक्कन कॉलेजांतून बी. ए. झाल्यावर त्यांनीं कांहीं दिवस शिक्षकाची नोकरी पत्करली व १८९४ सालीं एल्‌एल्. बी. होऊन साताऱ्याला वकिली थाटली. साताऱ्याला वकिलीचा व्यवसाय करीत असतां त्यांचें निरनिराळ्या उद्योगांकडे लक्ष असे. ते गांवांतल्या सार्वजनिक चळवळींत भाग घेऊं लागले होते, पुण्याच्या ‘ मराठा ’ वृत्तपत्रांत लेख पाठवूं लागले होते व एका इंग्रजी नाटकाचें मराठी रूपांतर करण्याचा उद्योग त्यांनीं हातीं घेतला होता. म्हणजे केळकरांचा ‘ केसरी ’त प्रवेश होण्यापूर्वी त्यांनीं आपण होऊनच सार्वजनिक कामाचे प्राथमिक धडे घेण्यास सुरवात केली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं.

याच वेळीं लो. टिळकांना ‘ केसरी ’–‘ मराठा ’ वृत्तपत्रांसाठीं एक होतकरू सहकारी व मदतनीस हवा होता. योगायोगानें केळकरांची शिफारस केली गेली व १७ मार्च १८९६ पासून केळकर केसरी कचेरींत रुजूं झाले. प्रारंभीं त्यांना टिळकांच्या

' लॉ क्लासांत 'ही काम करावें लागे, पण १८९७ सालीं टिळक तुरुंगात गेल्यावर केळकरांच्याकडे केसरी–मराठ्याचीं संपादकीय सूत्रें आलीं.

' केसरी 'चे संपादक झाल्यामुळें सुरवातीला पुढारीपणाला जरूर असणारी सामुग्री नसतांनाही केळकरांना पुढारी व्हावें लागलें व सार्वजनिक कामांत पडावें लागलें. कारण ' केसरी ' चा संपादक हा स्वयंसिद्ध पुढारी असतो अशी त्या वेळीं समजूत होती. १८९८ सालीं ते पुणें म्युनिसिपालिटींत गेले व १९१८ सालीं अध्यक्ष झाले. लो. टिळकांच्या होमरूल लीगचे चिटणीस व कॉंग्रेस वर्किंग कमिटीचे सभासद, या नात्यानें हिंदी राजकारणांत त्यांनीं बरीच कामगिरी केली. दिल्ली–कॉंग्रेसनें नेमलेल्या कॉंग्रेस शिष्टमंडळाचे सेक्रेटरी म्हणून ते १९१९ सालीं शिष्टमंडळाबरोबर विलायतेस गेले. टिळकांच्या हयातींत महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रांत त्यांचा चांगलाच बोलबाला झाला होता.

महात्मा गांधींचें असहकारिता युग सुरू झाल्यावर केळकरांनीं असहकारिता, राष्ट्रीय शिक्षण, कौन्सिल--बहिष्कार, खादी वगैरे कार्यक्रमांत मनःपूर्वक भाग घेण्यास प्रारंभ केला. पगडी टाकून त्यांनीं कांहीं काळ पांढरी स्वच्छ गांधी टोपी परिधान केली. पण पुढे बंगालचे पुढारी देशबंधू दास यांच्या स्वराज्यपक्षांत ते गेले आणि कौन्सिलवादी बनले. १९२३ व १९२६ सालीं ते लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत निवडून आले. असेंब्लींत असतांना ते स्वराज्यपक्षाचे उपाध्यक्ष झाले. पण १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळींत जप्त वाङ्मयाचें वाचन, बेकायदा मिठाची विक्री इत्यादि कार्यक्रमांत त्यांनीं उत्साहानें भाग घेतला, पण त्यांना अटक झाली नाहीं. त्यांनीं हिंदुमहासभा, लोकशाही स्वराज्यपक्ष, संस्थानी चळवळ इत्यादि चळवळींत विशेष लक्ष घातलें व ते अखिल–

भारतीय संस्थान-परिषद, जबलपूरची हिंदुमहासभा, इत्यादि परिषदांचे अध्यक्ष झाले. १९३३ सालीं दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठीं ते विलायतेस गेले होते.

पण केळकरांनीं इतक्या विविध चळवळी केल्या व विविध कार्यक्षेत्रांत संचार केला तरी साहित्य हा त्यांचा आत्मा आहे, वाङ्मय हा त्यांचा बहिश्चर प्राण आहे, हें विसरतां कामा नये. राजकारणाच्या धकाधकींत व 'केसरी'च्या धांवपळींत त्यांनीं नाटक, निबंध, इतिहास, वाङ्मय, राजकारण, कादंबरी, प्रवासवृत्त इत्यादि ललित वाङ्मयाच्या प्रत्येक शाखेला भूषणभूत होतील असे सुमारें ५० ग्रंथ लिहिले. केळकरांचें चिरस्थायी व विधायक कार्य कोणतें असेल तर 'केळकर--वाङ्मय' हें आहे.

---

# ११: कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

महाराष्ट्रांतील पहिल्या दर्जाचे वृत्तपत्रकार, लो. टिळकांचे कर्तृत्ववान् सहकारी, जहाल राष्ट्रीय पुढारी, नामांकित नाटककार, ओजस्वी-विचारसरणीचे कर्ते लेखकधुरंधर इत्यादि विविध नात्यांनीं कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांचें नांव अखिल महाराष्ट्रांत सुविख्यात झालें आहे. 'केसरी'चे संपादक असतांना त्यांनीं जी तेजस्वी कामगिरी केली त्यापेक्षांही त्यांची देशसेवा अधिक मोलाची आहे असें म्हटल्यास चालेल. त्यांनीं सर्वज्ञात अशी राष्ट्रसेवा पुष्कळच केली आहे, पण त्यांची अज्ञात देशसेवा त्यापेक्षांही मोठी आहे. शांतपणें गाजावाजा न करतां काम करण्याची त्यांना प्रथमपासूनच संवय असल्यामुळें त्यांची वृत्तपत्रकार या नात्यानें झालेली कामगिरीच तेवढी जनतेपुढें

आहे. ‘ केसरी, ’ ‘ लोकमान्य ’ व ‘ नवाकाळ ’ या वृत्तपत्रांच्या द्वारें लोकजागृतीचें व राष्ट्रीय वृत्तीच्या निर्मितीचें त्यांनीं जें कार्य केलें आहे तें केवळ अद्वितीय आहे.



कृ. प्र. खाडिलकर यांचें मूळ गांव देवगड तालुक्यांत असलें तरी त्यांचें घराणें आज कित्येक वर्षें सांगली संस्थानांतच स्थायिक झालेलें आहे. १८७२ च्या नोव्हेंबर महिन्यांत खाडिलकरांचा जन्म झाला. त्यांचे वडील सांगलीचे कारभारी होते व ते कृष्णाजीपंत एक वर्षाचे होण्यापूर्वीच निवर्तले. कृष्णाजीपंतांचें शिक्षण सांगलीस झालें व वयाच्या १७ व्या वर्षी ते मॅट्रिक झाले. फर्ग्युसन कॉलेजांतून

१८९२ सालीं बी. ए. झाल्यावर दोन वर्षे त्यांनीं सांगली हायस्कूल-मध्यें शिक्षकाचें काम केलें. १८९५ सालीं मुंबईस एल्एल्. बी. साठीं ते गेले, पण दोन वर्षें अभ्यास करूनही कायद्याची पदवी त्यांच्या पदरांत पडली नाहीं.

फर्ग्युसन कॉलेजांत असतांना खाडिलकरांचा लो. टिळकांशीं प्रथम परिचय झाला व तो पुढें कायम राहिल्यामुळें १८९७ सालीं टिळकांनीं खाडिलकरांना ' केसरी ' च्या संपादनकार्यांत सहाय्यक म्हणून बोलावून घेतलें. खाडिलकरांच्या पूर्वीं अवघें एकच वर्ष न. चिं. केळकर 'केसरींत' दाखल झाले होते. मुंबईच्या लॉ–कॉलेजांत असतांनाच खाडिलकरांचा केळकर व श्री. कृ. कोल्हटकर यांच्याशीं परिचय झाला होता. कोल्हटकरांचें पहिलें नाटक ज्या सुमारास रंगभूमीवर आलें त्याच सुमारास खाडिलकरांचें पहिलें नाट्यापत्य ' सवाई माधवरावांचा मृत्यु ' प्रसिद्ध झालें.

' केसरी 'त काम करूं लागल्यापासून खाडिलकरांना सार्वजनिक कार्यांत पडावें लागलें. त्यांना या कामाची पहिल्यापासूनच हौस असल्यामुळे १८९५ सालीं दुष्काळनिवारणाच्या कामांत त्यांनीं उत्साहाने भाग घेतला.

लो. टिळकांच्या गैरहजेरींत खाडिलकर कांहीं काळ ' केसरी'चे जाहीर संपादक होते. पण आपल्या सहकाऱ्यांशीं त्यांचें मनोमय न पटल्यामुळें १९०० सालीं त्यांनीं वकिलीच्या परीक्षेचा शेवटचा प्रयत्न केला व नवीन आयुष्याला प्रारंभ करण्याचें ठरविलें.

हिंदुस्थानचा प्रवास करतांना त्यांची नेपाळांतील एका इंजीनीयरशीं गांठ पडली व तेथील राजवाड्याला कौलें पुरविण्यासाठीं ते नेपाळांत गेले. त्यांनीं तेथें स्वदेशी कौलांचा कारखाना काढून सरकारची मागणी यशस्वी रीतीनें पुरी केली. पुढें कांहीं दिवस मुख्य संपादक, कांहीं दिवस सहसंपादक या नात्यानें १९२० पर्यंत

खाडिलकर केसरी कचेरींत होते. लो. टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांनीं केसरीचा सर्व संबंध सोडला.

त्यानंतर कांहीं दिवस ‘ लोकमान्य ’ या नव्या राष्ट्रीय दैनिकाचें संपादनकार्य केल्यावर त्यांनीं १९२३ सालीं मुंबईस स्वतःचें ‘ नवा काळ ’ दैनिक काढलें. महात्मा गांधींचा राजकारणांत उदय होतांच खाडिलकर असहकारितावादी बनले व राष्ट्रीय सभा व महात्मा गांधी यांच्या विचारसरणीचा पुरस्कार त्यांनीं आपल्या ‘ नव्या काळां’तून मोठ्या धडाडीनें चालविला. १९२९ सालीं राजद्रोहाबद्दल त्यांना एका वर्षाची शिक्षा झाली होती.

महाराष्ट्रांतील सर्वश्रेष्ठ नाटककार म्हणून त्यांची जी ख्याति आहे ती यथार्थ आहे. त्यांच्यापूर्वी अनेक नाटककार होऊन गेले, पण मराठी रंगभूमि जिंकून तिला उच्च दर्जाला पोचविण्याचें कार्य त्यांच्याच नाटकांनीं केलें आहे.त्यांचीं नाटकें वरवर पहाणाराला जरी निव्वळ नाटकें वाटलीं तरी वरचा पापुद्रा दूर केला म्हणजे आंत राजकीय परिस्थितीचें चित्र रेखाटलेलें दिसतें. ‘ कीचकवध ’ ‘ मेनका ’ ‘ सावित्री ’ इत्यादि त्यांचीं नाटकें या दृष्टीनें पहाण्या-सारखीं आहेत.

श्री. खाडिलकरांनीं परराष्ट्रीय राजकारणाकडे पहिल्यापासूनच आपलें लक्ष वळविलें व थोडयांच अवधींत त्यांत उत्कृष्ट प्रावीण्य संपादन केलें. युद्धविषयक लेख लिहिण्याच्या बाबतींत त्यांची अजूनही कोणाला बरोबरी करतां आली नाहीं. बोअर युद्ध, रुसो-जपानी युद्ध व युरोपचें गेलें महायुद्ध इत्यादि युद्धांवर लेख लिहून एकाद्या मुत्सद्द्याला व युद्धशास्त्रविशारदाला साजेल अशी कीर्ति त्यांनी संपादन केली आहे. लो. टिळक त्यांना आपले परराष्ट्रीय मंत्री म्हणत, तें यामुळेंच होय.

गेलीं चाळीस वर्षे खाडिलकर वृत्तपत्राच्या व्यवसायांत असल्या-मुळें त्यांना नाटककारापेक्षां वृत्तपत्रकार म्हणण्यानें त्यांचा अधिक गौरव होईल. महाराष्ट्रीय वृत्तपत्रांच्या इतिहासांत त्यांची ओजस्वी कामगिरी व दीर्घ तपस्या चिरस्थायी होऊन राहण्यासारखी आहे.

---

# १२: शिवराम महादेव परांजपे



महाराष्ट्रांतील स्वातंत्र्याच्या कल्पनेचे आद्य पुरस्कर्ते, विद्वान व कुशल लेखक, असामान्य वक्ते, निष्ठावंत राष्ट्रसेवक इत्यादि विविध नात्यांनीं शिवराम महादेव परांजपे यांचें नांव अलीकडच्या हिंदी राजकारणाच्या इतिहासांत चिरस्थायी होऊन राहील, यांत शंका नाहीं. देशाच्या स्वातंत्र्यासाठीं शिवरामपंतांच्या अंतः-करणांत जी तळमळ वसत होती ती जशीच्या तशीच त्यांच्या वाङ्मयांत प्रतिबिंबित झाली असल्यामुळें त्यांच्या चरित्राप्रमाणें त्यांचें वाङ्मयही ओजोगुणांनीं समृद्ध व चैतन्यमय झालें आहे. स्वतःची अशी उपहासपूर्ण व विरोधा-भासात्मक लेखनशैली प्रस्थापित करून त्यांनीं मराठी भाषेंत क्रांति घडवून आणली. त्यांचे लेख बाह्यतः काव्यपूर्ण व कथात्मक दिसले तरी अंतरंगाच्या दृष्टीनें ते तीक्ष्ण, भेदक व ज्वालाग्राही आहेत. वक्तृत्वगुणांत तर शिवरामपंतांनीं महाराष्ट्रांत अग्रस्थान संपादन केलें होतें असें म्हणण्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं.

शिवराम महादेव ऊर्फ अण्णासाहेब परांजपे यांचा जन्म १८६४ सालीं महाड येथे झाला. पहिल्यापासून अत्यंत बुद्धिमान व तेजस्वी विद्यार्थी म्हणून त्यांची ख्याति होती. महाडला इंग्रजी शिकण्याची सोय नसल्यामुळें त्यांच्या वडिलांनीं त्यांना रत्नागिरीच्या हायस्कूलमध्यें घातलें.

शिवरामपंतांचें बालपण अत्यंत हूडपणांत व उनाडक्या करण्यांत गेलें. शाळेला बुट्टी मारून भटकणें, झाडावर चढणें, पोहणें इत्यादि त्यांचे फार आवडते कार्यक्रम होते व त्यांत ते लवकरच निष्णात झाले. लहानपणीं पंतांचें 'बाळक्या' हें नांव प्रचलित होतें.

रत्नागिरी येथें असतांना विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या न्यू इंग्लिश स्कूलची कीर्ति शिवरामपंतांच्या कानांवर आली व एक दिवस आपल्या कांहीं मित्रांसमवेत त्यांनीं रत्नागिरीहून पलायन केलें व पुण्याला न्यू इंग्लिश स्कूलमध्यें ते दाखल झाले. ही घटना इतकी अनपेक्षित होती कीं घरच्या मंडळींना अत्यंत आश्चर्य वाटलें. पण पुढें या शाळेत शिवरामपंतांचा उनाडपणा जाऊन त्यांना अभ्यासाची विशेषतः संस्कृतची अधिक गोडी लागली. त्यांची ग्रहणशक्ति व बुद्धिमत्ता शिक्षकांनाही कळून चुकली व त्यांना एकदम पांचवींतून सातवींत बसविण्यांत आलें. १८८४ सालीं ते मॅट्रिक झाले व विशेष म्हणजे त्यांनीं जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति संपादन केली. पुण्याला आल्यावर शिवरामपंतांच्या विचारसरणींत व मनोधारणेंत क्रांति झाली. शास्त्रीबुवांच्या आदर्श व बाणेदार उदाहरणामुळें त्यांच्या आयुष्याला कलाटणी मिळाली व त्यांच्या आयुष्यांत देशभक्तीचें बीजारोपण झालें.

मॅट्रिक झाल्यावर एक वर्ष फर्ग्युसन कॉलेजांत काढल्यावर ते डेक्कनमध्यें गेले व तेथून १८९० सालीं बी. ए. व १८९२ सालीं एम्. ए. झाले. हायस्कूलमध्यें असतांनाच १४व्या वर्षी शिवरामपंतांचा

विवाह झाला व घरची परिस्थिति एकंदरीनें अनुकूल नसल्यामुळें त्यांना आपला शिक्षणक्रम बक्षिसें व शिष्यवृत्त्या यांवर पुरा करावा लागला. बी. ए. च्या परीक्षेंत त्यांनीं पहिला वर्ग मिळविला व एम्. ए. च्या परीक्षेत ' झाला वेदांत प्राइझ ' इत्यादि मोठालीं बक्षिसें व शिष्यवृत्त्या संपादन केल्या. एम्. ए. झाल्यावर सरकारी नोकरी करावयाची नाहीं अशा निश्चयामुळे ' महाराष्ट्र कॉलेजांत ' संस्कृतचे प्रोफेसर म्हणून ते काम करूं लागले. हें काम दोन वर्षेपर्यंत केल्यावर ते लो. टिळकांच्या प्रेरणेनें राष्ट्रीय चळवळींत पडले. लेख, व्याख्यानें, प्रवचनें, पुराणें इत्यादि लोकशिक्षणाचे मार्ग आक्रमीत असतां त्यांचें समाधान होत नव्हतें, म्हणून त्यांनीं १८९८ सालीं ' काळ ' पत्र काढलें.

या पत्रानें बारा वर्षे जळजळीत देशसेवा केली व १९१० सालीं जबर जामीनकीमुळें तें अस्तंगत झालें. ' केसरी 'च्या बरोबरीनें त्या वेळीं ' काळ ' पत्राचा खप होता. १९०८ सालीं शिवरामपंतांवर राजद्रोही लेख लिहिण्याबद्दल खटला भरण्यांत आला व त्यांत त्यांना १९ महिन्यांची शिक्षा झाली.

तुरुंगांतून सुटल्यावर त्यांची प्रकृति बरीच बिघडली व देशांत उत्पन्न झालेल्या शैथिल्यामुळें १९२० सालापर्यंत कोणतीच महत्त्वाची व सर्वव्यापी अशी चळवळ चालू नव्हती. तथापि शिवरामपंत स्वस्थ नव्हते. त्यांचें राजकीय जागृतीचें कार्य चालूंच होतें. या काळांत त्यांनीं पुष्कळशी साहित्यविषयक ग्रंथनिर्मिति केली.

१९२० च्या असहकारितेच्या चळवळींत ते मनःपूर्वक सामील झाले व चळवळीचा प्रसार करण्यासाठीं त्यांनीं 'स्वराज्य' नांवाचें नवें साप्ताहिक सुरू केलें. मुळशी सत्याग्रहाच्या चळवळींतही त्यांनीं सक्रिय भाग घेतला व वयाच्या५८व्या वर्षी दुसऱ्या कारागृहवासाला सज्ज झाले. या वेळीं त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. तुरुंगांत त्यांचे

फार हाल झाले, तरी सुटल्यावर नेहरू-रिपोर्टाचें प्रचारकार्य, सायमन-बहिष्कार, इत्यादि त्यांची लहानमोठीं कार्ये चालू राहिलीं. १९२८ सालीं पुण्यास भरलेल्या महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे ते स्वागताध्यक्ष होते. त्याच सालीं बेळगाव येथें भरलेल्या साहित्यसंमेलनाचें अध्यक्षपद त्यांनीं विभूषित केलें होतें.

शिवरामपंतांच्या राजकीय व साहित्यिक गुणांपेक्षां त्यांचे वक्तृत्व असामान्य होते. अलौकिक कोटींतलें होतें. सिसरो, डेमॉस्थेनिस यांसारख्या जगप्रसिद्ध वक्त्यांच्या प्रभावळींत शिवरामपंतांचा समावेश करण्यास हरकत नाहीं. रसिक साहित्यिक, अद्वितीय वक्ते व तेजस्वी देशभक्त या शब्दांत शिवरामपंतांचे यथार्थ वर्णन करतां येईल. ते २७ सप्टेंबर १९२९ रोजीं निधन पावले.

---

# १३: मानवेंद्रनाथ रॉय

भाई एम्. एन्. रॉय ऊर्फ मानवेंद्रनाथ रॉय हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रांतिकारक पुढारी असून हिंदुस्थानाबाहेर रशिया, चीन, मेक्सिको इत्यादि ठिकाणच्या क्रांतिमय चळवळींत त्यांनीं महत्त्वाचा भाग घेतला आहे. भाई रॉय हे समाजवादी तत्त्वज्ञानाचे कट्टे पुरस्कर्ते आहेत. हिंदी राजकारणांत त्यांनीं आपल्या विचारसरणीचा स्वतंत्र पंथ निर्माण केला आहे. त्यांचें जीवनचरित्र बरेंचसें गूढ व रहस्यमय आहे.

मानवेंद्रनाथ रॉय यांचें खरें नांव नरेंद्रनाथ भट्टाचार्य असें आहे. त्यांचा जन्म कलकत्त्याजवळच्या खेड्यांत एका ब्राह्मणकुटुंबांत इ. स. १८९० च्या सुमारास झाला. त्यांचे व्यवस्थित असें शिक्षण झालें नाहीं पण त्यांचें वाचन अफाट होतें. ऐन विशींतच त्यांच्या

कर्तृत्ववान जीवनास सुरवात झाली, त्यांच्या नांवाचा प्रथम उल्लेख सरकारी रिपोर्टांतच आढळून येतो आणि नरेंद्र भट्टाचार्यांनें विशी उलटण्याच्या आंतच बंगालमध्यें केवढा धुमाकूळ माजवला होता त्याची थोडीशी कल्पना येते. लागोपाठ दोनतीन दरवडयांच्या खटल्यांत त्यांना गोवण्यांत आलें होतें, पण प्रत्येक वेळीं ते सहीसलामत सुटले. महायुद्ध सुरू झाल्यानंतर नरेंद्र भट्टाचार्यांच्या चळवळींना अधिकच जोर चढला. १९१४ सालीं एका खटल्यांतून ते जामिनावर सुटले. सुटतांक्षणींच ते बंगालमधून निसटले व अनेक कठीण प्रसंग, जिवावरचीं संकटें इत्यादिकांतून मोठ्या शिकस्तीनें निभावून त्यांनीं सिंगापूर गांठलें व हाँगकाँगमध्यें प्रवेश केला. हाँगकाँगहून चीनजपानमार्गें ते अमेरिकेला जाऊन पोहोंचले.



अमेरिकेंत असतांना त्यांनीं समाजसत्तावाद व समाजशास्त्र यांच्या मूलतत्त्वांचें सखोल अध्ययन केलें. मेक्सिको येथें त्या वेळीं क्रांतिकारक चळवळींची लाट उसळली होती, आणि राजसत्ता नष्ट

करून लोकशाही स्थापन करण्यासाठीं त्या देशांतील जनतेचा प्रयत्न चालू होता. या चळवळींत त्यांनीं प्रामुख्यानें भाग घेतला व त्याच वेळीं त्यांनीं मानवेंद्रनाथ रॉय हें नांव धारण केलें. याच सुमारास त्यांच्या मतांत बदल झाला. मार्क्सवादाचा अभ्यास केल्यामुळें दहशतवादी मार्गाचा फोलपणा त्यांना कळून आला व सामुदायिक चळवळीच्या जोरावर आजची विषमतेवर उभारलेली समाजपद्धति नष्ट करणे हेंच खरें कार्य आहे, याची त्यांना जाणीव झाली. व्यक्तिगत अत्याचाराच्या मार्गावरील त्यांचा विश्वास नष्ट झाला, आणि आपली सर्व बुद्धि व शक्ति सामुदायिक लढयाचा पुरस्कार करण्यासाठीं खर्च करण्याचा त्यांचा निश्चय झाला. याचेंच प्रत्यक्ष फळ म्हणजे मेक्सिकोंतील त्यांचें कार्य होय. या कार्यामुळें जगामध्यें फैलावूं पहाणाऱ्या समाजवादी चळवळीशीं त्यांचा संबंध आला व नवीन नावाबरोबर नवीन आयुष्यक्रमाला सुरवात झाली. यानंतर ताबडतोब लेनिनच्या आमंत्रणावरून ते रशियांत गेले.

१९१७–१८ सालीं सोव्हिएट रशियांत नवीन समाजपद्धतीच्या पुनर्घटनेचें कार्य चालू होतें. त्यांत भाई रॉय यांनीं महत्त्वाचा भाग घेऊन लेनिनप्रभृति प्रमुख कम्युनिस्ट पुढाऱ्यांचा विश्वास संपादन केला. रशियन तुर्कस्थानमधील संघटनेचें बरेंचसें श्रेय त्यांना आहे. कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या स्थापनेंतही त्यांची पुष्कळच मदत झाली. या संस्थेच्या पूर्वेकडील केंद्राचे मुख्य म्हणून त्यांची नेमणूक करण्यांत आली व त्यांच्याच नेतृत्वाखालीं हिंदुस्थान व वसाहतींतील चळवळी १९२८ सालापर्यंत चालविल्या गेल्या. इतक्या थोड्या काळांत जगांतील चळवळींत उच्च स्थान पटकाविण्याचा मान मिळविणारे हे पहिलेच हिंदी गृहस्थ होत. यावरून त्यांच्या कर्तबगारीची यथार्थ कल्पना येते.

१९२७ सालीं चीनमधील राज्यक्रांतीचें पुढारीपण घेण्यासाठीं

कम्युनिस्ट इंटरनॅशनलतर्फे त्यांना चीनमध्यें पाठविण्यांत आलें. तेथें तीन वर्षें कार्य केल्यानंतर साम्राज्यशाहीविरुद्ध लढा चालविण्यासाठीं १९३० च्या डिसेंबरमध्यें त्यांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केला. त्यानंतरचे त्यांचें आयुष्य पुष्कळसें खडतर व संकटग्रस्त अशा अवस्थेंत गेलें. स्वतःच्या संरक्षणासाठी त्यांना अज्ञातवास पत्करावा लागला. डॉ. महंमूद या नांवानें ते मुंबईस वावरत होते व आपल्या तत्त्वज्ञानाचा प्रचार करीत होते. १९३१ साली कराची कॉंग्रेसला ते गुप्त वेषांत हजर होते. पुढें त्यांचा सुगावा लागून त्यांना २१ जुलै १९३१ रोजीं मुंबईस १२१ अ या कलमाखालीं पकडण्यांत आलें. १९२४ च्या कानपूर कम्युनिस्ट कटांत त्यांचें नांव गोवलें गेले होतें. तेव्हांपासून ते परदेशांतच होते. त्यांचा खटला चालून त्यांना ७ वर्षांची शिक्षा झाली. ते १९३७ च्या फैजपूर कॉंग्रेसच्या आधीं नुकतेच सुटले व त्या कॉंग्रेसला जाहीरपणें हजर राहिले.

भाई मानवेंद्र रॉय पुरे सहा फूट उंच असून त्यांच्या नजरेंत एक प्रकारचे शांत तेज आहे. ते जितके उद्योगी व साहसी आहेत तितकेच बुद्धिमानही आहेत. तत्त्वज्ञानाकडे त्यांचा विशेष ओढा आहे. सध्यां हिंदुस्थानांत त्यांच्या मताचे जे अनुयायी आहेत त्यांना 'रॉयिस्ट' अशी संज्ञा आहे. यावरून भाई रॉय यांची स्वतंत्र प्रज्ञा दिसून येईल.

---

# १४: डॉ. सर चंद्रशेखर रामन्

जगांतील अत्युच्च विद्वत्तेचें व बहुमानाचें समजलें जाणारें नोबेल पारितोषिक हिंदुस्थानांतील ज्या थोर पुरुषांना आतांपर्यंत मिळालें



आहे त्यांत कविवर्य रवींद्रनाथ टागोर याच्या बरोबरीनें डॉ. सर चंद्रशेखर व्यंकट रामन् यांची गणना होते. डॉ. रामन् यांनीं पदार्थविज्ञानशास्त्रांत बहुमोल शोध लावले आहेत, इतकेंच नव्हें तर प्रकाशशास्त्रांतील त्यांचा एक महत्त्वाचा शोध 'रामन् इफेक्ट' या नांवानें जगभर विख्यात झालेला आहे. विज्ञानशास्त्रांत नोबेल पारितोषिक मिळविणारे सबंध आशियाखंडांत डॉ.रामन् हे पहिलेच होत.

डॉ. रामन् यांचा जन्म त्रिचनापल्ली येथें ७ नोव्हेंबर १८८८ सालीं झाला. लहानपणापासून त्यांची बुद्धि फार तीव्र होती. हायस्कूलचें शिक्षण पुरें झाल्यावर ते मद्रासच्या प्रेसिडेन्सी कॉलेजांत गेले व तेथून१९०४सालीं म्हणजे वयाच्या सोळाव्या वर्षी बी.ए.च्या परीक्षेस बसून सर्व विद्यार्थ्यांत पहिले आले.एम्. ए. च्या परीक्षेंतही त्यांनीं हा उच्चांक सोडला नाहीं. मद्रास विद्यापीठांत पदार्थ–विज्ञानशास्त्रांत त्यांच्या इतके मार्क अजून कोणीं मिळविलेले नाहींत.

वयाच्या सोळाव्या वर्षीच इंग्लंडमध्यें प्रसिद्ध होणाऱ्या एका मासिकांत त्यांचा एक शोध प्रसिद्ध झाला. त्यांच्या या असामान्य बुद्धिमत्तेची छाप त्यांच्या शिक्षकवर्गावर इतकी पडली कीं त्यांना पाश्चात्य देशांत उच्च शिक्षण घेण्यासाठीं शिक्षकवर्गानें हिंदुस्थान-सरकारची शिष्यवृत्ति मिळविली, पण अशक्त प्रकृतीमुळें ते वैद्यकीय परीक्षेंत नालायक ठरले व ती शिष्यवृत्ति रद्द करण्यांत आली.

एम्. ए. चा निकाल लागण्यापूर्वी ते कलकत्त्याला फायनॅन्स परीक्षेसाठीं गेले व १९०७ सालीं त्या परीक्षेंतही ते पहिले आले. याच वर्षी कु. लोकसुंदरी यांच्याशीं त्यांचा विवाह झाला.

फायनॅन्स परीक्षेंत उत्कृष्ट यश संपादन केल्यामुळें कलकत्ता येथें असिस्टंट अकौंटंट जनरलच्या जागीं त्यांची नेमणूक झाली. यावेळीं त्यांचें वय अवघें १९ वर्षांचें होतें.

अशा प्रकारें त्यांच्या तीक्ष्ण बुद्धिमत्तेला हें पुरेसें काम मिळालें होतें तरी त्यांचें समाधान होत नव्हतें. शास्त्रीय विषयांकडे त्यांचा स्वाभाविकच ओढा असल्यामुळें शास्त्रीय शोधासाठीं निघालेल्या एका प्रयोगशाळेंत त्यांनीं आपला प्रवेश करून घेतला व दिवसांतला रिकामपणचा वेळ तेथें घालवूं लागले. रंगून, कलकत्ता इत्यादि ठिकाणीं त्यांची बढती झाली तरी त्यांचें संशोधनाचे वेड कमी कमी झालें नाहीं. उत्तरोत्तर प्रयोगशाळेंतच ते अधिकाधिक वेळ घालवूं लागले.

याच सुमारास कलकत्ता विद्यापीठाचे व्हाइस-चॅन्सेलर सर आशुतोष मुकर्जी यांनीं रामन् यांचें विज्ञानप्रावीण्य पाहून त्यांना कलकत्ता विद्यापीठांत पदार्थ-विज्ञान-शास्त्राचे प्रोफेसर होण्याबद्दल विनंती केली. आपल्याला आपल्या आवडत्या विषयाचा व्यासंग करावयास मिळत आहे, हें पाहून रामन् यांनी मोठ्या पगाराची सरकारी नोकरी सोडली व कमी पगाराची पण जास्त मानाची प्रोफेसरची नोकरी स्वीकारली. कलकत्ता विद्यापीठात अध्यापन व संशोधनकार्य करीत असतांनाच त्यांनीं निरनिराळे महत्त्वाचे शोध लावले.

प्रो. रामन् यांनीं नादशास्त्र, गायनशास्त्र व प्रकाशशास्त्र इत्यादि विषयांत निरनिराळे शोध लावले आहेत. त्यांच्या ज्या शोधाला नोबेल पारितोषक मिळालें तो प्रकाशशास्त्रांतील आहे व तो आतां ‘ रामन् इफेक्ट ’ या नांवानें ओळखला जातो. हा शोध त्यांना २८ फेब्रुवारी १९२८ सालीं लागला. या शोधामुळें पदार्थविज्ञानशास्त्र व रसायनशास्त्र यांतील कित्येक गूढ प्रश्न सोडविण्यास मदत होईल

प्रो. रामन् यांना त्यांच्या संशोधनाबद्दल निरनिराळ्या विद्यापीठांकडून सन्मानदर्शक पदव्या व पारितोषिकें देण्यांत आलीं आहेत. १९२१ सालीं कलकत्ता विद्यापीठानें त्यांना डी. एस्‌सी. ही पदवी समर्पण केली. जर्मनींतील फ्रायबर्ग व ग्लासगो या विश्वविद्यालयांकडून त्यांना पीएच्. डी. व एल्‌एल्. डी. या सन्मान्य पदव्या मिळाल्या. तसेंच कर्झन रीसर्च प्राइझ, वुडबर्न रीसर्च मेडल हे बहुमानही त्यांना मिळाले. नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर १९२८ सालीं त्यांना हिंदुस्थान सरकारनें 'सर' हा किताब दिला.

बंगलोर येथील सायन्स इन्स्टिटयूटमध्यें बरींच वर्षें ते प्रमुख म्हणून काम करीत आहेत. डॉ. रामन् यांचा जगदीशचंद्र बोस व प्रफुल्लचंद्र रॉय यांच्याप्रमाणें 'विज्ञानमहर्षि' या शब्दानें गौरव करणें अधिक यथार्थ होईल. त्यांच्यासारख्यामुळेंच हिंदी राष्ट्राच्या बुद्धिमत्तेचा लौकिक सबंध जगभर पसरतो व हें राष्ट्र किती विद्यावैभवसंपन्न आहे याची जगाला जाणीव होते.

# १५: चक्रवर्ती राजगोपाळाचार्य

महात्मा गांधींचें अहिंसेचें व सत्याग्रहाचें तत्त्वज्ञान त्यांच्या ज्या



अनुयायांनीं एकनिष्ठपणें आत्मसात् केलें आहे त्यांत मद्रासचे सध्यांचे मुख्य प्रधान ना. चक्रवर्ती राजगोपालाचार्य यांची प्रामुख्यानें गणना केली पाहिजे. आणि विशेष म्हणजे गांधीजींचें तत्त्वज्ञान त्यांनीं अंधभक्तीनें स्वीकारलें नाहीं तर त्या तत्त्वज्ञानाची व्यवहाराशीं उत्तम प्रकारें सांगड घालून गांधीजींपेक्षांही त्यांनीं तें

अधिक व्यवहार्य केलें आहे. राजगोपाळाचार्य ऊर्फ 'राजाजी' हे अत्यंत चिकित्सक, कठोर बुद्धिवादी व मार्मिक सूक्ष्मदर्शी असल्यामुळें गांधींजींच्या तत्त्वज्ञानांतील ग्राह्याग्राह्य व सूक्ष्मासूक्ष्म विवेक त्यांना जसा करतां येतो तसा गांधींच्या इतर अनुयायांपैकीं कोणाला येत असेल किंवा नाहीं याची शंका आहे. राजाजींच्या या विवेकी बुद्धिमत्तेमुळेंच महात्मा गांधींनीं त्यांना आपल्या 'सदसद्विवेकबुद्धीचे राखणदार' नेमलें आहे, आणि तें कार्य राजाजी किती सुयोग्यपणे पार पाडीत आहेत, तें प्रत्येकजण पहात आहेच. महात्मा गांधींच्या प्रभावळींत 'राजाजीं'ना जसें महत्त्वाचें स्थान आहे त्याप्रमाणें कॉंग्रेस संघटनेंतही ते मुरब्बी मुत्सद्दी म्हणून ओळखले जातात. राजाजींची बुद्धिमत्ता तीक्ष्ण व विवेचक आहे, व राजकारण आणि घटनाशास्त्र या विषयांचा त्यांचा व्यासंग हातखंडा आहे.

राजगोपालाचार्य कॉंग्रेसमध्यें मुख्य पुढारी म्हणून चमकूं लागण्यापूर्वी ते सालेम येथें वकीली करीत होते. मद्रासच्या मानानें सालेमसारख्या दुय्यम शहरीं त्यांनीं वकिलीचा धंदा थाटला तरी थोडयाच दिवसांत उत्कृष्ट वकील म्हणून त्यांनीं नांव मिळविलें. पण १९२० सालची असहकारितेची चळवळ सुरू झाल्यावर त्यांनीं वकिलीवर पाणी सोडलें व कॉंग्रेसचें विधायक कार्य हातीं घेतलें. १९२३ सालीं सालेम म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष म्हणून त्यांनीं काम केलें होतें. तसेंच महात्मा गांधी तुरुंगांत असतां त्यांच्या 'यंग इंडिया साप्ताहिका'चे ते कांहीं काळ संपादक होते. 'सी. आर'. या नांवाखालीं प्रसिद्ध होणारे त्यांचे लेख जितके तार्किक असत तितकेच मार्मिक व विचारप्रवर्तकही असल्यामुळें त्यांच्या लेखनाकडे हिंदुस्थानांतील विचारवंतांचें लक्ष वेधल्यास नवल नव्हतें.

कॉंग्रेसमध्यें राजगोपालाचार्य यांचें नांव १९२३ सालीं गया येथें भरलेल्या अधिवेशनांत पहिल्याप्रथम चमकलें असें म्हणण्यास

हरकत नाहीं. या कॉंग्रेसमध्यें कौन्सिलवादी फेरपक्ष व कौन्सिल-बहिष्कारवादी नाफेरपक्ष असे दोन पक्ष उत्पन्न झाले होते. फेरवाल्या पक्षांत देशबंधू दास, मोतीलाल नेहरू, हकीम अजमल-खान प्रभृति मोठमोठे वीर महावीर होते व गया कॉंग्रेसमध्यें त्यांचें प्रावल्य असल्यामुळें फेरवाल्यांचा कौन्सिलप्रवेशाचा ठराव बहुमतानें पास होणें शक्य होतें. या वेळीं कौन्सिल बहिष्काराचे अध्वर्यु खुद्द महात्मा गांधी तुरुंगांत असल्यामुळें नाफेरवाल्यांचा नेता असा कोणीही नव्हता. पण अशा बिकट परिस्थितींतही राजगोपाला-चार्य यांनीं नाफेरवाल्यांचें पुढारीपण घेऊन आपल्या ओजस्वी वक्तृत्वानें व परिणामकारक युक्तिवादाने प्रतिपक्षावर इतकी जबरदस्त मात केली कीं अखेर फेरवाल्यांचा सपशेल पराभव होऊन त्यांना 'स्वराज्य पक्ष' नांवाचा नवा पक्ष स्थापन करावा लागला! राजाजींच्या ज्या वादकुशल वक्तृत्वशैलीनें सबंध सभागृह जिंकलें तिची निराळी तारीफ करण्याचे कारणच नाहीं.

राजगोपालाचार्य यांचा जन्म इ. स. १८८६ च्या सुमारास झाला. त्यांचें सर्व शिक्षण मद्रास येथेंच झालें. बी. ए. बी. एल्. झाल्यावर ते वकिली करूं लागले. वकिलीच्या व्यवसायात त्यांनीं बराच पैसा मिळविला, पण महात्मा गांधींचें सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान त्याच्या मनोभूमिकेवर आरूढ झाल्यापासून ते अनासक्त संन्यासी बनले. १९३०-३२ च्या चळवळींत त्यांनीं उत्साहानें उडी घेतली व त्यानंतर तिरूचेनगोडू नांवाच्या एका खेड्यांत 'गांधी-आश्रम' स्थापन करून खादी, हरिजनसेवा, ग्रामोद्योग इत्यादि विधायक कार्यक्रम करण्यास सुरवात केली. १९३७ सालीं प्रांतिक स्वायत्तता आल्यानंतर कॉंग्रेसनें जेव्हां कायदेमंडळें काबीज करण्याचें ठरविलें तेव्हां मद्रासतर्फे ते उभे राहिले व प्रचंड बहुमतानें निवडून आले. कौन्सिलांतल्या कॉंग्रेसपक्षाचें नेतृत्व त्यांच्याकडे आले व पुढें

काँग्रेसनें अधिकारस्वीकार करावयाचें ठरवितांच मद्रास इलाख्याचे मुख्य प्रधान म्हणून साहजिकपणेंच त्यांचीच निवड झाली. आठ प्रांतांतल्या काँग्रेस मंत्रिमंडळांत राजाजींचा राज्यकारभार सर्वांत अधिक कार्यक्षम व धडाडीचा समजला जातो. त्यांनीं आपल्या प्रांतांत दारूबंदीचें कार्य नेटानें चालविलें आहे. राजगोपालाचार्य केवळ मद्रासचे मुख्य प्रधान झाले म्हणून त्यांचें चरित्र येथें दिलें नाहीं, तर काँग्रेसच्या चळवळीमुळें हिंदुस्थानांत जे थोर, कर्तबगार पुरुष उदयास आले त्यांत त्यांची गणना होत असल्यामुळें वाचकांना त्यांचा परिचय करून दिला आहे.

---

# १६: विठ्ठलभाई पटेल

लढाऊ राष्ट्रवीर, बांका मुत्सद्दी व मुरब्बी कायदेपंडित या नात्यांनीं विठलभाई पटेल यांनीं हिंदी राष्ट्राच्या अलीकडील इतिहासांत आपलें नांव चिरस्थायी करून ठेवलें आहे. काँग्रेसच्या लढ्यांतील कर्तबगार पुढारी म्हणून त्यांचा जितका लौकिक आहे त्यापेक्षां कायदेमंडळाचे कर्णधार म्हणून ते अधिक विख्यात आहेत. त्यांनीं आपल्या कर्तृत्वानें व बाणेदारपणानें हिंदी कायदेकौन्सिलांपुढें अनुकरणीय आदर्श ठेवला आहे



विठ्ठलभाई जव्हेरभाई पटेल हे सरदार वल्लभभाई पटेल यांचे ज्येष्ठ बंधू असून त्यांचा जन्म गुजराथेंतील एका घरदाज पाटीदार कुळांत सन १८७२ सालीं झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या खेडे-गांवींच झाल्यावर ते नडियादला गेले व तेथें राहून त्यांनीं वकिलीची परीक्षा दिली. वकील झाल्यावर त्यांनीं गोध्रा येथें आपल्या व्यव-सायाला सुरवात केली. त्यांचे बंधू वल्लभभाई पटेल यांनीं बॅरिस्टर होण्यासाठीं विलायतला जाण्याचा बेत ठरविला होता, पण योगा-योगानें विठ्ठलभाई पहिल्या प्रथम विलायतेस गेले व बॅरिस्टर होऊन परत आले. वल्लभभाई नंतर बॅरिस्टर झाले.

बॅरिस्टर होऊन आल्यावर त्यांनीं मुंबईच्या हायकोर्टांत वकिली करण्यास प्रारंभ केला. या धंद्यावर त्यांचें प्रथमपासूनच विशेषसें प्रेम नसल्यामुळें व सार्वजनिक कामाकडे त्यांचा विशेष ओढा असल्यामुळे पैसा कमविण्याच्या भानगडींत ते पडले नाहींत. त्या वेळीं ते वांद्रा येथें रहात असत व तेथील म्युनिसिपल कारभारांत लक्ष घालीत असत. पुढें ते वांद्रा म्युनिसिपालिटीचे अध्यक्षही झाले. पण असल्या आकुंचित क्षेत्रांत काम करण्याचा त्यांना उत्साह न वाटल्यामुळें ते १९१३ सालीं मुंबई कौन्सिलच्या निवडणुकीला उभे राहिले व लागलींच निवडूनही आले. कौन्सिलांत आल्यावर त्यांनीं पहिल्या प्रथम समाजसुधारणेचा प्रश्न हातीं घेऊन अंतर्जातीय विवाहासंबंधींचा कायदा पास करून घेण्याचा उद्योग आरंभला. विठ्ठलभाईंचें हें 'पटेल–बिल' त्या वेळीं चांगलेंच गाजलें. १९१८ सालीं मुंबई कौन्सिलच्या वतीनें इंपीरियल कौन्सिलांत जेव्हां एक सभासद निवडण्याचें ठरलें त्या वेळीं त्यांचीच मोठ्या बहुमतानें निवड झाली.

ते १९१५ सालापासूनच कॉंग्रेसमध्यें भाग घेऊं लागले होते. १९१८ सालीं मुंबईला कॉंग्रेसचें जें जादा अधिवेशन भरलें होतें

त्याच्या स्वागताध्यक्षाची माळ त्यांच्याच गळ्यांत पडली होती. १९१९ सालीं कॉंग्रेसच्या शिष्टमंडळांतील प्रमुख या नात्यानें मॉंटेग्यु–चेम्सफर्ड सुधारणांच्या बाबतींत साक्ष देण्यास ते विलायतेस गेले होते.

१९२० सालीं असहकारितेच्या चळवळींत उत्साहानें सामील होऊन त्या सालीं त्यांनीं कौन्सिल–बहिष्कार पुकारला. पुढें कॉंग्रेस-मध्यें जेव्हां दासबाबूंचा ' स्वराज्यपक्ष ' स्थापन झाला तेव्हां ते त्या पक्षांत गेले व इतर स्वराज्यपक्षीय सभासदांच्या बरोबर ते निवडणुकीला उभे राहिले व १९२३ सालीं मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत निवडून आले. १९२४ सालीं ते मुंबई कार्पोरेशनचे 'मेयर' झाले होते. १९२५ सालीं जेव्हां असेंब्लीला आपला अध्यक्ष प्रथमच निवडण्याची संधि मिळाली त्या वेळीं विठ्ठलभाईंचीच त्या स्थानीं सर्वानुमतें योजना झाली. असेंब्लीचे पहिले लोकनियुक्त व पहिले राष्ट्रीय अध्यक्ष होण्याचा मान विठ्ठलभाईंना मिळाला. लागोपाठ दोनदां ते अध्यक्ष म्हणून निवडून आले. पटेलांनीं आपल्या कर्तबगारीनें, मुत्सद्दीपणानें व बाणेदारपणानें असेंब्ली जशी गाजवली, तशी आजपर्यंत कोणीही गाजवली नसेल. त्यांच्या अंगच्या सर्व गुणांचें एकीकरण ते असेंब्लीचे अध्यक्ष झाले असतांना झालें होतें असें म्हणण्यास हरकत नाहीं.

असेंब्लीचे अध्यक्ष असतांना ब्रिटिश पार्लमेंटच्या कामकाजाचें निरीक्षण करण्यासाठीं ते इंग्लंडला गेले व युरोपांतील प्रमुख देशांच्या कायदेमंडळांचा त्यांनीं अभ्यास केला. असेंब्लीचे अध्यक्ष असतांना ते खादीचा पोषाख करीत असत व कॉंग्रेसच्या अधिवेश-नाला नियमितपणें हजर रहात असत. अध्यक्ष असतांना त्यांना जो तनखा मिळे त्यापैकीं फक्त जरूरीपुरते पैसे स्वतःजवळ ठेवून बाकीचे राष्ट्रकार्यासाठीं गांधींच्या स्वाधीन करीत.

१९३० सालीं कायदेभंगाची चळवळ सुरू झाल्यावर त्यांनीं अध्यक्षपदाचा राजीनामा दिला व चळवळीस वाहून घेतलें. त्या वर्षीं त्यांना सहा महिन्यांची शिक्षा झाली. तुरुंगांत प्रकृति ढासळल्यामुळें प्रकृतिस्वास्थ्यासाठीं ते युरोपला गेले व १९३२ च्या प्रारंभीं हिंदुस्थानांत परत आले व लगेंच त्यांना अटक झाली. या कारागृहवासाच्या वेळींही त्यांना पूर्वीसारखाच खूप त्रास झाला. साधारण प्रकृति सुधारल्यावर त्यांनीं अमेरिकेकडे दौरा काढला व हिंदुस्थानच्या राजकीय परिस्थितीबद्दल उत्कृष्ट मतप्रचार केला. पुढें ते आयर्लंडांतही गेले. आयर्लंडचे अध्यक्ष डी. व्हॅलेरा यांच्या बरोबर त्यांनीं स्नेह संपादन केला होता असें म्हणतात. अखेर प्रकृतीसाठीं ते व्हिएन्नाला आले व तेथेंच २२ आक्टोबर १९३३ रोजीं रुग्णालयांत त्यांचें देहावसान झालें. त्यांच्या अंतकाळीं बाबू सुभाषचंद्र बोस त्यांच्याजवळ होते.

## १७: डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर

महाराष्ट्राच्या अलीकडच्या इतिहासांत डॉ. श्रीधर व्यंकटेश



केतकर ही एक लोकविलक्षण व्यक्ति होऊन गेली. जगांतील विविध ज्ञानाचा व विज्ञानाचा संग्रह करून ‘ ज्ञानकोश ’ तयार करण्याची प्रचंड कल्पना त्यांनीं काढली व आत्मविश्वास, अखंड उद्योग, सखोल पांडित्य, धाडस इत्यादि गुणांच्या जोरावर ती यशस्वी करून दाखविली. ‘ ज्ञानकोश ’ हें डॉ. केतकरांचें एवढें मोठें कार्य आहे कीं

तेवढ्या एका कार्यामुळेंच त्यांचें नांव मराठी भाषेच्या इतिहासांत चिरंजीव होऊन राहील. केतकर हे जसे गाढे पंडित होते, त्याप्रमाणें समाजशास्त्रज्ञ व ललितलेखकही होते. त्यांची बुद्धि सर्वगामी होती.

डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर यांचा जन्म मध्यप्रांतांतील रायपूर शहरीं २ फेब्रुवारी १८८४ सालीं झाला. त्यांचे आजोबा कोंकणांत अंजनवेलीस रहात आणि पोथ्या लिहिण्याचें काम करीत. वडील रायपूर येथें पोस्टमास्तर होते. वयाच्या सोळाव्या वर्षी म्हणजे १९०० सालीं ते मॅट्रिक झाले. त्या वेळीं इतर विद्यार्थ्यांच्या मानानें त्यांचें अवांतर वाचन इतकें अफाट झालें होतें कीं मॅट्रिक मध्यें असतांनाच त्यांच्या मास्तरांनीं केतकरांना एन्सायक्लोपीडिया ऊर्फ ज्ञानकोश हें नांव बहाल केलें! मराठी वाङ्मयांत ज्ञानकोशासारख्या प्रचंड ग्रंथाची भर घालणाऱ्या डॉ. केतकरांना लहानपणींच 'ज्ञानकोश' ही पदवी मिळाली. यावरून त्यांच्या भावी कर्तृत्वाचीं बीजें कितीतरी आधीं प्रकट झालीं होतीं हें दिसून येतें.

मॅट्रिक झाल्यावर ते मुंबईच्या विल्सन कॉलेजांत गेले. तेथें ते १९०६ पर्यंत होते. पण अभ्यासापेक्षां इतर विषयांच्या व्यासंगाकडे त्यांचें पहिल्यापासूनच लक्ष असल्यामुळें त्यांना मुंबई विद्यापीठाची पदवी मिळाली नाहीं. पुढें कांहीं दिवस 'महाराष्ट्र–वाग्विलास' नांवाचें मासिक त्यांनीं चालविलें व १९०६ च्या एप्रिल महिन्यांत वडील मंडळींच्या इच्छेविरुद्ध उच्च शिक्षणासाठीं अमेरिकेस प्रयाण केलें.

अमेरिकेंत प्रथम ते कार्नेल विद्यापीठांत दाखल झाले. त्यांच्या अध्ययनाचा मुख्य विषय 'समाजशास्त्र' हा होता. हा विषय अत्यंत व्यापक असून त्यांत इतिहास, अर्थशास्त्र, शासनशास्त्र, धर्मशास्त्र,

पुराणवस्तुशास्त्र, भूस्तरशास्त्र, जीवनशास्त्र, इत्यादि अनेक शास्त्रांचा अंतर्भाव होतो. त्यामुळें डॉ. केतकरांना आपल्या मुख्य विषयासाठीं या इतर शास्त्रांचें अध्ययन करावें लागलें.

१९०७ सालीं ते बी. ए. व १९०८ सालीं एम्. ए. झाले. पुढें तीन वर्षांनीं १९११ सालीं कार्नेल विद्यापीठाची पीएच. डी. ही श्रेष्ठ पदवी त्यांनीं संपादिली. या काळांत त्यांना श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांची शिष्यवृत्ति मिळत असे. पीएच्. डी. साठीं त्यांनीं 'हिंदुस्थानांतील जाति-संस्थेचा इतिहास' हा विषय संशोधनार्थ घेतला होता. त्यांचा हा प्रबंध अमेरिकेंत त्याच वेळीं पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाला. १९११ सालीं ते इंग्लंडला गेले व तेथें एका वर्तमानपत्रांत एक वर्षभर काम करून १९१२ सालीं हिंदुस्थानांत परत आले.

डॉ. केतकर अमेरिकेत सुमारें पांच वर्षें होते. त्याच्या पुढील आयुष्यक्रमाची व कार्याची सर्व प्रकारची बौद्धिक पूर्व तयारी या वास्तव्यांतच झाली. लिमिटेड कंपनीच्या सहाय्यानें ग्रंथलेखन आणि ग्रंथसंपादन हा किफायतशीर धंदा कसा होऊं शकतो याचे ज्ञान त्यांनीं अमेरिकेंतच पैदा केलें.

१९१२ च्या ऑक्टोबरांत ते हिंदुस्थानांत परत आल्यावर एक वर्षभर कलकत्ता विद्यापीठांत अर्थशास्त्र व शासनशास्त्र या विषयांचे प्रोफेसर म्हणून त्यांनीं काम केलें. कांहीं ग्रंथलेखनही केलें. पण विद्यापीठाचें वातावरण त्यांना न मानवल्यामुळें त्यांनीं नोकरी सोडली व १९१४ पर्यंतच्या काळांत निरनिराळ्या योजना आंखीत ते बेकारावस्थेंत काळ कंठीत होते. त्या वर्षीं ते मद्रास कॉंग्रेसला गेले असतां आंध्रप्रतिनिधि डॉ. लक्ष्मीपति यांच्याशीं त्यांची ओळख झाली. लक्ष्मीपतींनीं तेलगू ज्ञानकोशाचें काम सुरू केल्याचें

त्यांना कळलें व त्या दिशेनें लागलीच त्यांनीं मराठी ज्ञानकोशाची योजना आंखली.

महाराष्ट्रांतील लो. टिळकप्रभृति विद्वानांच्या गांठी घेऊन त्यांनीं ८ जुलै १९१६ रोजीं ज्ञानकोशमंडळाची स्थापना केली. २१ मार्च १९२० रोजीं मिस् कोहन या जर्मन विदुषीबरोबर त्यांनीं व्रात्यस्तोमविधिपूर्वक विवाह केला. कोहन यांचें हिंदुकरण करण्यांत येऊन त्यांचें ' शीलवती ' असें नामांतर करण्यांत आलें.

१९१९ सालीं ज्ञानकोश कचेरी पुण्यास आली व तेव्हांपासून अखेरपर्यंत त्यांचें वास्तव्य तेथेंच होतें. ज्ञानकोशाचे एकंदर चोवीस खंड निघाले. या प्रचंड कार्याशिवाय डॉक्टरांनीं तीन चार कादंबऱ्या, नाटकें, काव्यें हीं लिहिलीं आहेत.' प्राचीन महाराष्ट्र ' व ' भारतीय समाजशास्त्र ' हे त्यांचे दोन ग्रंथ ज्ञानकोशाइतकेंच महत्त्वपूर्ण आहेत. ' निःशस्त्रांचें राजकारण ', ' विजयी हिंदुस्थान ' इत्यादि पुस्तकें लिहून त्यांनीं आपलीं राजकीय मतें प्रस्थापित करण्याचा कांहीं काळ उद्योग केला. पण त्याला कांहीं यश आलें नाहीं. केतकरांचें विक्षिप्त राजकारण सोडलें तर त्यांची गाढ विद्वत्ता, संशोधनवृत्ति, अखंड व्यासंग, अफाट कर्तृत्व, स्वतंत्र बाणा इत्यादि बाबतींत कोणाचेही दुमत होणार नाहीं. ' ज्ञानकोशकार ' आपल्या वयाच्या ५३ व्या वर्षीं १० एप्रिल १९३७ रोजीं मृत्यु पावले.

---

# १८: हरि नारायण आपटे.

मराठी कादंबरीलेखनाच्या क्षेत्रांत हरि नारायण आपटे यांनीं एवढी प्रचंड व अपूर्व कामगिरी केली आहे कीं त्यांना अर्वाचीन मराठी कादंबरीचे युगप्रवर्तक असें यथार्थतेनें म्हणतां येईल. त्यांना

आधुनिक कादंबरीचे जनक असें म्हणण्यासही हरकत नाहीं. हरिभाऊ आपटे यांचें चरित्र व त्यांनीं निर्माण केलेली वाङ्मयसृष्टि हा



महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासांतला एक स्वतंत्र कालखंडच आहे. हरिभाऊंनीं आपल्या आयुष्यांत जेवढें समाजकार्य केलें त्यापेक्षांहि त्यांच्या कादंबऱ्यांनीं समाजांत अधिक क्रांति घडवून आणली आहे, हें कोणालाही नाकारतां येणार नाहीं. आणि यांतच हरिभाऊंच्या लेखणीचें खरें सामर्थ्य आहे.

हरिभाऊ आपटे यांचा जन्म ८ मार्च १८६४ सालीं वऱ्हाडांत झाला. त्यांचें पाळण्यांतलें नांव 'बाळकृष्ण' असें होतें. ते चार वर्षांचे असतांच मातृसुखाला आंचवले. त्यामुळें त्यांना चुलतीचा विशेष लळा लागला. हरिभाऊंचे वडील नारायण

चिमणाजी उर्फ नानासाहेब हे सरकारी नोकर असून कर्मठ आचरणाचे होते. त्यांच्या उलट हरिभाऊंचे चुलते महादेव चिमणाजी हे आचारविचारानें सुधारकपंथी होते. ते नामांकित वकील होते व त्यांनींच आनंदाश्रम स्थापन केला.

हरिभाऊंचें इंग्रजी तीन इयत्तापर्यंतचे शिक्षण त्यांच्या चुलत्याजवळ मुंबईस झाले, पुढें वडिलांकडे ते पुण्यास आले. न्यू इंग्लिशमधून मॅट्रिक झाल्यावर ते डेक्कन कॉलेजांत गेले. एक वर्ष ते फर्ग्युसनमध्येंही होते. कॉलेजांत त्यांनीं पांच वर्षे काढलीं, पण त्यांना पदवी संपादन करतां आली नाही. याचें कारण त्यांची गणिताबद्दलची अप्रीति व नेमलेल्या विषयांबाहेरचें विविध विषयांचें वाचन. त्यांचा वाचनाचा व ज्ञानार्जनाचा हव्यास वाखाणण्यासारखा होता. मराठीबरोबर संस्कृत, इंग्रजी, फ्रेंच व जर्मन या भाषांतील असंख्य पुस्तकें त्यांनी वाचलीं.

ज्या काळांत कल्पित कादंबऱ्यांच्या वाचनानें वाचकांचीं मनें बिघडतात असें लोकमत प्रचलित होतें त्या काळांत आपल्या वयाच्या २१ व्या वर्षी हरिभाऊंनीं आपली पाहिली कादंबरी 'मधली स्थिति' १८८५सालीं 'पुणें वैभव' साप्ताहिकांत प्रसिद्ध करण्यास सुरवात केली. या कादंबरीची पहिलीं दोन प्रकरणें प्रसिद्ध होतांच सगळ्या महाराष्ट्रीय वाचकवर्गांत मोठी खळबळ उडाली. हरिभाऊंनीं आपलें नांव मुद्दामच गुप्त ठेवलें होतें. पण पुढें तें फुटलें. हरिभाऊंच्या ह्या पहिल्या कादंबरीनें एकंदर वाचकवर्गाच्या व टीकाकारांच्या ही मनांत इतकी उत्कट उत्कंठा उत्पन्न केली कीं पुढचें प्रकरण केव्हां प्रसिद्ध होतें याची ते वाट पाहूं लागले. यावरून हरिभाऊंच्या लेखणीचें सामर्थ्य समजून येतें. ' मनोरंजन ' मासिकांत १८८६ सालीं त्यांनीं ' गणपतराव ' कादंबरी चालू केली. या मासिकाशीं त्यांचा संपादकीय संबंध होता.

लोकशिक्षणाचें व विचारजागृति करण्याचें कार्य अधिक विस्तृत

प्रमाणावर करण्यासाठीं त्यांनीं १८९० च्या ऑक्टोबरांत 'करमणूक' पत्र काढलें. हें पत्र जरी सुधारकी मतांचा पुरस्कार करण्यासाठीं काढलें होतें तरी ' सुधारक ' पत्रापेक्षां त्याचें धोरण निराळें होतें. ' करमणुकी'तील हरिभाऊंचा सुधारणावाद शर्करावगुंठित होता. आणि त्यामुळेंच ' करमणूक ' अधिक लोकप्रिय झाली.

करमणूक पत्र त्यांनीं २८ वर्षे अव्याहत चालविलें व विशेष म्हणजे त्यांतील बहुतेक सर्व प्रकारचा विविध, मनोरंजक मजकूर त्यांनीं स्वतः लिहिला. ' पण लक्षांत कोण घेतो ' ही कादंबरी प्रथम ' करमणुकी'त प्रसिद्ध झाली. हरिभाऊंनीं या साप्ताहिकांत एकंदर १८ कादंबऱ्या लिहिल्या. त्यांपैकीं ८ सामाजिक व १० ऐतिहासिक आहेत. कादंबऱ्यांशिवाय हरिभाऊंनीं नाटकें व निबंधहि लिहिले. ' ज्ञानप्रकाश ' दैनिक झाल्यावर त्याचीं संपादकीय सूत्रें कांहीं काळ त्यांच्या हातीं होतीं.

हरिभाऊंनीं जरी १४ वर्षें ' करमणुकी'सारखें अत्यंत लोकप्रिय पत्र चालविलें तरी सांपत्तिक दृष्टीनें त्यांची स्थिति नेहमींच बिकट असे. त्यांच्या चुलत्यांनीं त्यांना थोडीबहुत आर्थिक मदत केली. त्यांना सांसारिक सुखाचाहि लाभ झाला नाहीं. त्यांनीं दोन लग्नें केलीं, पण शेवटीं ते निरपत्यच मृत्यु पावले. त्यांना तीनचार मुली झाल्या होत्या.

वाङ्मयव्यतिरिक्त हरिभाऊंनीं अनेक सामाजिक कामें केलीं. त्यांचीं राजकीय मतें नेमस्तपक्षीय होतीं. पुण्यांतील प्रमुख पुढाऱ्यांत त्यांची गणना होत असे. पुणें म्युनिसिपालिटीचे ते एक वेळ अध्यक्षही होते. पुण्यास भरलेल्या प्रांतिक परिषदेचे स्वागताध्यक्ष, मुंबई विद्यापीठाचे एम्. ए. चे परीक्षक, अकोला येथें भरलेल्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष इत्यादि अनेक मानसन्मान त्यांना मिळाले. ना. गोखले हे त्यांचे परमस्नेही होते.

एका प्रसिद्ध ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें "हरिभाऊंचें जीवितकार्य त्यांनीं लिहिलेल्या कादंबऱ्या हेंच आहे. ह्या कादंबऱ्या त्यांनीं जनमनोरंजनार्थ लिहिल्या नाहींत. त्या पतितांच्या उद्धारासाठीं, दीनांच्या दुःखविमोचनासाठीं, मार्गभ्रष्टांना सन्मार्गदर्शनासाठीं, हताश झालेल्या हृदयांत नवचैतन्य उत्पन्न करण्यासाठीं, समाजशुद्धीसाठीं व राष्ट्रीय भावना उद्दीपित करण्यासाठीं त्यांनीं लिहिल्या. त्यासाठीं त्यांनीं अखंड वाचन चालविलें, वाङ्मयाच्या क्षेत्रक्षेत्रांतरीं फिरून सुविचारांचीं बीजे गोळा केलीं आणि तीं आपल्या कादंबऱ्यांच्या द्वारां आपल्या देशबांधवांच्या मनांत मोठ्या चातुर्यानें पेरण्याचा महदुद्योग केला." हरिभाऊ आपटे ३ मार्च १९१९ रोजीं वयाच्या ५५ व्या वर्षीं मृत्यु पावले.

---

# १९: बॅ. विनायक दामोदर सावरकर

'मुहूर्तं ज्वलितं श्रेयः नच धूमायितं चिरम्' या श्लोकार्धांत बॅ. विनायक दामोदर सावरकर यांच्या जीवनचरित्राचें रहस्य प्रतिबिंबित झालें आहे. वयाच्या २५ व्या वर्षी सावरकरांनीं आपल्या ऊर्जस्वल राष्ट्रभक्तीची व जळजळीत स्वातंत्र्यनिष्ठेची जी चमक दाखविली त्यामुळें हिंदी जनतेचे डोळे क्षणमात्र दिपून गेले. आगबोटीवरून समुद्रांत उड्डाण, ५० वर्षांची जन्मठेप, अंदमानांतील खडतर कारागृहवास इत्यादि अनेक प्रसंगामुळें त्यांच्या चरित्राला अद्भुतरम्यता आली आहे. सावरकरांचें नांव उच्चारलें म्हणजे १९०८ सालची त्यांची ती वीररसानें धगधगणारी तेजस्वी मूर्ति डोळ्यांपुढें उभी रहाते. सावरकरांचें संस्मरणीय जीवनचरित्र कोणतें असेल तर तें त्यांच्या पहिल्या पंचविशींतलेंच आहे.

बॅ. सावरकर यांचा जन्म नाशिकजवळ भगूर येथें १८८३ च्या मे महिन्यांत झाला. भगूर हें सावरकरांच्या जहागिरीचें गांव असन



त्यांचे वडील विद्वान धर्मनिष्ठ व सच्छील होते. आई १० व्या वर्षीच निवर्तली. त्यांचें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण नाशिक येथेंच झालें. वयाच्या १२ व्या वर्षापासून त्यांना केसरीवाचनाचा नाद लागला. त्यामुळें त्यांच्या मनावर इतका परिणाम झाला कीं बालवयांतच त्यांनीं भगूरच्या देवीच्या देवळांत देशोद्धाराची शपथ घेतली. व आपल्या गांवीं शिवाजीउत्सव व गणेशोत्सव चालू केले. एका गणेशोत्सवांत त्यांनीं 'मित्रमेळा' काढला होता व त्याच्यासाठीं त्यांनीं राष्ट्रीय व स्फूर्तिदायक कवनें केलीं होतीं. विनायकरावांना लहानपणापासूनच वक्तृत्वाची आवड असल्यामुळें मॅट्रिकच्या वर्गांत

असतांनाच उत्तम वक्ते म्हणून ते प्रसिद्धीस आले. त्या वेळीं त्यांनीं शिवाजीवर जाहीर व्याख्यानें दिलीं.

१९०१ सालीं वयाच्या १८ व्या वर्षी मॅट्रिक होऊन ते फर्ग्युसन कॉलेजांत गेले. चार वर्षें ते त्या कॉलेजांत होते, पण तेवढ्या अवधींत त्यानीं तेथें इतकें चैतन्य उत्पन्न केलें कीं त्यांच्या चळवळीमुळें अखेर त्यांची कॉलेजच्या वसतिगृहांतून हकालपट्टी करण्याचा प्रसंग आला. त्यांनीं कॉलेजांत देशभक्तीचें वातावरण उत्पन्न केलें, राष्ट्रीय सप्तपदीवर व्याख्यानें दिलीं, स्वदेशी बहिष्काराच्या चळवळींत प्रामुख्यानें भाग घेतला, इतकेंच नव्हे तर पुण्यांत परदेशी कापडाची होळी केली. बहुशः हिंदुस्थानांत ही पहिलीच होळी असावी. सावरकरांच्या या विविध चळवळीमुळें नेमस्त प्रकृतीचे कॉलेजचे अधिकारी प्रक्षुब्ध झाल्यास नवल काय ?

फर्ग्युसन कॉलेजांत असतांना ते कै. शि. म. परांजपे यांचे चहाते होते. इतकेच नव्हे तर संपूर्ण स्वातंत्र्याचा उच्चार करण्याऱ्या शिवरामपंताना ते गुरुस्थानीं मानीत. आपल्याला स्वातंत्र्याची स्फूर्ति शिवरामपंतापासूनच मिळाली असें सावरकर म्हणतात.

१९०५ सालीं बी. ए. झाल्यावर एल्‌एल्. बी. साठीं ते मुंबईस गेले. तेथें त्यांनीं ‘ अभिनव भारत ’ या ज्वलज्जहाल क्रांतिकारक संस्थेची स्थापना केली, याच सुमारास ते ‘ विहार ’ पत्रांत लेखन करूं लागले. त्यापूर्वीच शि. म. परांजप्यांच्या ‘ काळ ’ पत्राशीं त्यांचा संबंध आला होता.

लो. टिळक व परांजपे यांच्या प्रशंसेनें त्यांना श्यामजी कृष्णवर्मा यांची ‘ शिवाजी ’ शिष्यवृत्ति मिळाली व ते १९०६ च्या मे महिन्यांत उच्च शिक्षण घेण्यासाठीं विलायतेस गेले. इंग्लंडांत ते १९०९ सालापर्यंत होते. त्या अवधींत त्यांच्या चळवळ्या स्वभावधर्माप्रमाणें त्यांनीं तेथे अनेक चळवळी केल्या. १८५७ च्या

स्वातंत्र्यसंग्रामाचा अर्धशतकोत्सव त्यांच्याच प्रेरणेनें लंडन येथें मोठ्या थाटानें साजरा झाला. सावरकरांचा अभ्यास चालू असतां त्यांचें ग्रंथलेखनही चालूच होतें. या वेळीं त्यांनीं सत्तावनाचा इतिहास, शीखांचा इतिहास, मॅझिनी इत्यादि पुस्तकें लिहिलीं. इंग्रजी वृत्तपत्रांतूनही लेखन केलें व 'काळ' आणि 'विहारी' पत्रांना बातमीपत्रें पाठविलीं.

१९०९ सालीं ते बॅरिस्टर झाले, पण त्यांच्या बंधूंना नाशिकच्या कटाच्या खटल्यांत अटक झाल्यामुळें सावरकरांच्या सनदेसंबंधीं वाद उत्पन्न झाला. कोणत्याही राजकीय चळवळीशीं यत्किंचितही संबंध न ठेवण्याच्या अटीवर त्यांना सनद देऊं केली, पण स्वाभिमानी सावरकरांना अशी सशर्त सनद रुचणें शक्य नव्हतें. त्यांनीं ती ताबडतोब नाकारली.

त्याच वर्षाच्या जून महिन्यांत विलायतेंत कर्झन वायली व लालकाका यांच्या खुनाचें प्रकरण उद्भवलें. आरोपी मदनलाल धिंग्रा यांच्या निषेधाची सभा सावरकरांनीं उधळल्यामुळें त्यांच्यामागें गुप्तहेरांचा ससेमिरा लागला. ते संशयित ठरले. याच सुमारास त्यांचा 'तरवार' पत्राशीं संबंध आला. गुप्तहेरांच्या त्रासामुळें त्यांनीं फ्रान्सला प्रयाण केलें. पण लवकरच १९१० सालीं लंडनला पुन्हां परत आले. तेथें आल्याबरोबर हिंदुस्थानांतील क्रांतिकारकांना सहाय्य केल्याच्या आरोपावरून त्यांना अटक करण्यांत आली व ब्रिस्टन तुरुंगांत ठेविलें. पुढें त्यांची चौकशी करण्यासाठीं त्यांना बोटींतून हिंदुस्थानाकडे नेलें जात असतां त्यांनीं मार्सेल्स नजीक फ्रान्सच्या किनाऱ्याजवळ बोटींतून समुद्रांत उडी टाकली. सावरकरांच्या आयुष्यांतला हाच तो अत्यंत अद्भुतरम्य, रसोत्कट व रोमहर्षक प्रसंग होय.

या प्रसंगामुळेंच त्यांची कीर्ति त्रिखंड पसरली. आगबोटीवर असतांना आपल्या स्वातंत्र्यासाठीं शेवटचा निर्वाणीचा प्रयत्न करावा अशी तीव्र इच्छा त्यांच्या मनांत उद्भवली व त्यांनीं आगबोटीवरील स्नानगृहाच्या पोर्टहोलमधून भर समुद्रांत उडी ठोकली. सावरकरांच्या आयुष्यांतील या अद्‌भुतरम्य घटनेनें त्यांना चिरंजीव केलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

बॅ. सावरकरांना लागलींच पकडण्यांत आलें. व त्यांची चौकशी करण्यासाठीं कडक पहाऱ्यांत मुंबईस नेण्यांत आलें. सावरकरांच्या उड्डाणामुळें आंतरराष्ट्रीय कायद्याचा प्रश्न उपस्थित झाला व तो सोडविण्यासाठीं हेग येथें युरोपियन राष्ट्रांच्या प्रतिनिधींची बैठक भरली. अशा प्रकारें सावरकरांची अटक आंतरराष्ट्रीय ठरली.

मुंबईस सावरकरांचा खटला चालून त्यांना २३ डिसेंबर १९१० रोजीं तीन गुन्ह्यांखालीं दोन जन्मठेपी व १० वर्षे काळें पाणी एकूण ५० वर्षें तुरुंगवास अशी शिक्षा ठोठावण्यांत आली. बॅ. विनायकराव सावरकरांच्या असामान्य जीवनाप्रमाणें त्यांना असामान्य असा देहदंड झाला. २८ मार्च १९११ रोजीं हेग परिषदेचा निर्णय त्यांच्या विरुद्ध लागला, त्यामुळें त्यांची सर्व शिक्षा कायम झाली.

१९११ ते २४ पर्यंत १३ वर्षे खडतर हालअपेष्टांत सावरकरांनीं अंदमानांत काढली. त्यानंतर त्यांची मुक्तता करण्यांत आली पण रत्नागिरी येथें ३७ पर्यंत त्यांना स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें. ऑगस्ट महिन्यांत त्यांची संपूर्ण मुक्तता झाली व पुढें ते लोकशाही स्वराज्यपक्ष व हिंदुमहासभा या संस्थांत सामील झाले. ते १९३८ सालीं अहमदाबाद येथील हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते.

सावरकर आपलें पूर्वायुष्य स्मरून यापुढें राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या

लढ्याला सर्वतोपरी वाहून घेतील अशी अपेक्षा केल्यास ती अस्थानीं होणार नाहीं. ते संपूर्ण राष्ट्रीय बनल्यास त्यांचें तेजस्वी नांव अधिक उज्ज्वल होईल.

---

## २०: भुलाभाई देसाई

हिंदी राजकारणाचा गेल्या पन्नास वर्षांतील इतिहास पाहिला तर



ज्यांनीं आपल्या आयुष्यांत उत्कृष्ट वकील म्हणून नांवलौकिक संपादन केला तेच पुढें राजकीय पुढारी म्हणून प्रसिद्धीस आले.

लो. टिळक, म. गांधी, दास, मोतीलाल नेहरू, जिना, जयकर इत्यादिकांप्रमाणें भुलाभाई देसाई हेदेखील प्रथम वकील म्हणून चमकले आणि नंतर राजकारणाच्या क्षेत्रांत उतरतांच तेथेंही त्यांनीं पुढारीपण मिळविलें. बॅरिस्टर नसतांनाही भुलाभाईंनीं आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर वकिलीच्या व्यवसायांत पहिल्या प्रतीचें यश संपादन केलें. वयाच्या ४६ व्या वर्षीं भुलाभाईंच्या राजकीय आयुष्याला सुरवात झाली असली तरी पंधरा वर्षांच्या आंतच पहिल्या दर्जाच्या हिंदी राष्ट्रीय पुढाऱ्यांत त्यांची गणना होऊं लागली. ले. असेंब्लींतील विरोधी पक्षाचे पुढारी, कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीचे सभासद व मुंबई हायकोर्टांतील नामांकित वकील या नात्यानें भुलाभाईंचें नांव आज सबंध हिंदुस्थानांत विख्यात झालें आहे.

भुलाभाई जीवनजी देसाई हे अनाविल ब्राह्मण असून त्यांचा जन्म बारडोलीजवळ बलसार येथे १३ ऑक्टोबर १८७७ रोजीं झाला. गुजराथेंतले अनाविल ब्राह्मण उच्च संस्कृति, विद्याभिरुचि व देशाभिमान यासाठीं प्रसिद्ध आहेत. भुलाभाईंचे वडील सरकारी वकील होते. भुलाभाईंचें हायस्कूल शिक्षण आपल्या गांवींच झाल्यावर ते एलफिन्स्टन कॉलेजांत गेले. पहिल्या वर्गांत बी. ए. ची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर आय्. सी. एस्. साठीं विलायतेस जाण्याकरितां त्यांना सरकारी शिष्यवृत्ति मिळाली, पण घरच्या कौटुंबिक परिस्थितीमुळें त्यांना ती सोडून द्यावी लागली. तेव्हां त्यांनीं एम्. ए. चा अभ्यास सुरू केला व ती पदवी संपादन करतांच ते गुजराथ कॉलेजांत प्रोफेसर झाले. तरी त्यांचा वकिलीचा अभ्यास चालूच होता. दोन वर्षांनीं ते एल्‌एल्. बी. झाले, त्याबरोबर त्यांनीं प्रोफेसरीला रामराम ठोकला व वकिली करण्यासाठीं ते मुंबईस दाखल झाले. मुंबई हायकोर्टांत त्या वेळीं मोठमोठे युरोपियन बॅरिस्टर होते,

पण थोड्याच अवधींत भुलाभाईंनीं आपलें बस्तान बसविलें. विवेचक बुद्धिमत्ता, सूक्ष्म दृष्टि, सखोल अभ्यास, परिणामकारक वक्तृत्व, कायदेशास्त्राचें अचूक ज्ञान इत्यादि गुणविशेषांमुळें कायदे-पंडित म्हणून भुलाभाईंची लवकरच ख्याति झाली.

पं. मोतीलाल नेहरूंप्रमाणें त्यांच्या राजकीय आयुष्यक्रमाची सुरवात प्रागतिक नेमस्त म्हणून झाली, पण होमरूल चळवळीच्या वेळीं ते ॲनी बेझंट यांना जाऊन मिळाले व त्यांनीं मुंबईस बरीच कामगिरी केली. याच वेळीं म. गांधी व वल्लभभाई पटेल यांच्याशीं त्यांचा संबंध आला.

भुलाभाईंच्या चरित्रांतली विशेष लक्षांत ठेवण्यासारखी एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं सरकारनें त्यांना मोठमोठ्या मान-सन्मानाच्या नोकऱ्यांचीं अनेक आमिषें दाखविलीं, पण ते बळी पडले नाहींत. सप्रू-जयकरांसारख्या श्रेष्ठ दर्जाच्या वकिलांनाही सरकारी नोकरीचा मोह आवरतां आला नाहीं, पण भुलाभाई अढळ राहिले. १९२३ सालीं मुंबईच्या गव्हर्नरानें त्यांना आपल्या कार्यकारी मंडळींत बोलाविलें, पण भुलाभाईंनीं त्याला सपशेल नकार दिला. त्यानंतर हायकोर्ट जज्ज होण्यासाठीं त्यांना अनेकवार विनंती करण्यांत आली पण दर वेळीं त्यांनीं तो मान नाकारला. हिंदुस्थान सरकारचे कायदेमंत्री होण्यासाठीं त्यांचें मन वळविण्याचा प्रयत्न करण्यांत आला, पण ह्या मोठ्या अधिकारालाही ते बळी पडले नाहीत. नाहीं म्हणावयाला १९२६ सालीं मुंबई इलाख्याचे ॲडव्होकेट जनरल म्हणून कांहीं दिवस त्यांनीं काम केलें, पण थोड्याच दिवसांत त्यांनीं राजीनामा दिला.

१९२८ च्या बार्डोलीच्या लढ्यामुळें कॉंग्रेसच्या राजकारणाकडे त्यांचें विशेष लक्ष वेधलें व त्यांत पडण्याचा त्यांनीं निश्चय केला. तोंपर्यंत ते नेमस्तच होते. पण बार्डोलीजवळच त्यांचें जन्मस्थान

असल्यामुळें बार्डोलीच्या लढ्यामुळें त्यांच्या जीवनक्रमांत भयंकर क्रांति घडून आली. १९३० च्या चळवळींत ते मोठ्या उत्साहानें सामील झाले. १९३२ च्या वटहुकुमाखालीं २५ जुलै १९३२ रोजीं त्यांच्यावर खटला करण्यांत आला व त्यांना १ वर्षाची शिक्षा व दहा हजार रुपये दंड झाला. या चळवळींत भुलाभाईंना दोनतीन वेळ कारागृहांत जाण्याचा प्रसंग आला.

१९३४ सालीं कॉंग्रेसतर्फे ते मध्यवर्ती लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत गेले व तेथें कॉंग्रेसपक्षाचे पुढारी झाले. स्वराज्यपक्षाच्या अंमदानींत पं. मोतीलाल नेहरूनीं असेंब्ली जितकी गाजविली तितकें जरी भुलाभाईंना यश संपादन करतां आलें नाहीं तरी त्यांची शिस्त वाखाणण्यासारखी होती. कारण भुलाभाईंची मनोवृत्ति मोतीलाल नेहरूंप्रमाणें आक्रमक व चढाऊ नाहीं, ते स्वभावतःच शांत प्रकृतीचे आहेत. त्यांच्या स्वभावांत सर्वांशीं मिळतें घेण्याची, तडजोडीची वृत्ति आहे. त्यामुळें स्वपक्षाप्रमाणें प्रतिपक्षीयांतही ते सारखेच लोकप्रिय आहेत. ते उत्कृष्टपैकीं कायदेपंडित असून नामांकित मुत्सद्दी आहेत.

कॉंग्रेस व शेतकरी यांच्यासाठीं भुलाभाईंच्या थैलीचें तोंड नेहमींच मोकळें असतें. जमनालाल बजाजप्रमाणें भुलाभाई फार मोठे दाते आहेत हें पुष्कळांना माहीत नसेल. ते जसा खूप पैसा मिळवितात तसा दातृत्वांतही तितकाच खर्च करतात. वकिलींतली त्यांची प्राप्ति महिन्याला किमान पंधरा हजार रुपये आहे.

असेंब्लीप्रमाणें कॉंग्रेसमध्येंही भुलाभाईंना विशेष महत्त्वाचें स्थान आहे. कॉंग्रेसनें १९३४ सालीं कौन्सिलप्रवेशाचा जो स्वीकार केला याला डॉ. अन्सारी यांच्याबरोबर भुलाभाईंचे प्रयत्न विशेष कारणीभूत झाले असें म्हणतात. यावरून त्यांची राजकीय दूरदृष्टि व व्यावहारिक राजकारणांतील मर्मज्ञता दृष्टीस पडते. कॉंग्रेसच्या धोरणाची दिशा

ठरविणारी जी त्रिमूर्ति आहे त्यांत भुलाभाई हे एक आहेत, इतकें सांगितलें असतां भुलाभाईंची खरी योग्यता कळून येईल.

---

# २१: डॉ. सर तेजबहादूर सप्रू

हिंदुस्थानांतील नामांकित पुरुषांत सर सप्रू यांना महत्त्वाचें स्थान आहे. ते जसे पहिल्या दर्जाचे व उत्कृष्ट वकील आहेत त्याप्रमाणें राजकारणधुरंधर मुत्सद्दी आहेत. पाश्चात्त्य राज्यघटनाशास्त्र व राज्यशास्त्र या विषयांवरचा त्यांचा अधिकार फार मोठा आहे. ते विद्वान् आहेत, त्यांना देशाभिमानही पुष्कळ आहे, पण स्वदेशासंबंधीं जो स्वार्थ-त्याग – मूलक जळजळीत अभिमान असावा लागतो तो त्यांच्या अंगीं नसल्या-मुळें ते उदारमतवादी नेमस्त



झाले आहेत. ना. शास्त्री, चिंतामणी व सेटलवाड यांच्याप्रमाणेंच त्यांना नेमस्ताग्रणी म्हणावयाला हरकत नाहीं. ते सनदशीर राजकार-णाचे पुरस्कर्ते असल्यामुळें बहिष्कार, असहकार, कायदेभंग इत्यादि बेसनदशीर गोष्टी त्यांना अमान्य असल्यास नवल नाहीं. राज-कारणांत तडजोड व समन्वय यांचें प्राधान्य असलें पाहिजे असें त्यांचें स्पष्ट मत असल्यामुळें १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळींत

बॅ. जयकर यांच्याबरोबर त्यांनीं सरकार व काँग्रेस यांच्यामध्यें तडजोडीचे अनेक प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना यश आलें नसलें तरी त्यांचा प्रयत्नवाद स्पृहणीय होता याबद्दल मात्र वाद नाहीं.

पं. मोतीलाल नेहरूप्रमाणेंच तेजबहादूर सप्रू हे काश्मिरी ब्राह्मण आहेत. त्यांच्या पूर्वजांनीं १८ व्या शतकांत आपला प्रांत कायमचा सोडला व ते संयुक्त प्रांतांत स्थायिक झाले. त्यांपैकीं कित्येकांनीं मोंगल दरबारी मोठमोठ्या मानाच्या जागा मिळविल्या होत्या. मोंगल सत्ता नामशेष झाल्यावर त्यांना संस्थानिकांचा आश्रय मिळवावा लागला किंवा स्वतंत्रपणें दुसरे उद्योग करावे लागले. सर तेजबहादूर यांचें घराणे पिढीजात जमीनदाराचें आहे.

सर तेजबहादूर सप्रू यांचा जन्म ८ डिसेंबर १८७५ सालीं झाला. म्हणजे आज त्यांचें वय ६५ वर्षांचें आहे. त्यांचें सर्व शिक्षण आग्रा येथें झालें. आग्रा कॉलेजांतून ते एम्. ए. झाल्यावर त्यानीं वकिलीकडे आपला मोर्चा वळविला व १८९६ सालीं ॲडव्होकेट होऊन ते अलाहाबादला वकिली करूं लागले. पं. मोतीलाल नेहरूही त्याच सुमारास अलाहाबादला वकिली करण्यास आले होते. अलाहाबाद हायकोर्टांत या दोघांची चांगलीच चुरस चाले. दोघेही थोड्याच काळांत आपल्या धंद्यांत प्रसिद्धीस आले. १८९६ पासून १९२६ पर्यंत म्हणजे जवळजवळ ३० वर्षे सप्रूंनीं अलाहाबाद येथें वकिली केली. अजूनही ते पूर्ण निवृत्त झाले आहेत असें म्हणतां येत नाहीं; कारण मोठमोठ्या कज्जांत सल्लामसलतीचें त्यांचें काम चालूं असतें.

वकीली करीत असतांनाच ते सार्वजानिक कामांत पडले. १९१३ ते १९१६ पर्यंत ते संयुक्तप्रांत कायदेमंडळाचे सभासद होते. त्या नंतर इंपीरिअल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्यें त्यांची नेमणूक झाली. १९२० पर्यंत या वरिष्ठ कौन्सिलांत ते होते. आतांपर्यंत त्यांनीं

निरनिराळ्या सरकारी कमिटयांवर सरकारनियुक्त सभासद म्हणून कामें केलीं आहेत. साउथबरो कमिटीचे सभासद, लंडनच्या सेलबोर्न्स कमिटीपुढील साक्षीदार, गव्हर्नरजनरलच्या कार्यकारी मंडळाचे कायदेमंत्री ( १९२२ ) लंडनच्या इंपीरिअल कौन्सिलचे सभासद ( १९२३ ) रिफॉर्म्स इन्कायरी कमिटीचे अध्यक्ष, गोलमेज परिषदेचे प्रतिनिधि ( १९३०–१९३२ ) इत्यादि अनेक नात्यांनीं सर सप्रू यांचें नांव चांगलेंच प्रसिद्ध झालें.

याशिवाय त्यांनीं सामाजिक व राजकीय चळवळींतही बराच भाग घेतला. ते जरी आज नेमस्ताग्रणी आहेत तरी १९०६ ते १९१७ पर्यंत ते ऑल इंडिया काँग्रेस कमिटीचे सभासद होते. संयुक्तप्रांत सामाजिक परिषदेचे अध्यक्ष ( १९१३), संयुक्तप्रांत राजकीय परिषदेचे अध्यक्ष, ( १९१४ ), सं. प्रांत लिबरल लीगचे अध्यक्ष ( १९१८–२० ), अखिल भारतीय प्रागतिक परिषदेचे अध्यक्ष ( १९२३ ) इत्यादि अनेक मानसन्मान त्यांनीं मिळविले. पुणें करार (१९३३) घडवून आणण्यांत त्यांनीं महत्त्वाचा भाग घेतला. बनारस हिंदु विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळांतही ते होते. त्यांना एल्‌एल्. डी. ही कायदेशास्त्रांतील प्राविण्याबद्दल सन्मान्य पदवी देण्यांत आली आहे.

हिंदुस्थानांत जेव्हां सायमन कमिशनचें आगमन झालें तेव्हां काँग्रेसबरोबर नेमस्तांनींही त्यावर बहिष्कार पुकारला होता. आणि विशेष म्हणजे तेजबहाद्दर सप्रूसारख्या सनदशीर मुत्सद्द्यांनाही त्या बहिष्कारांत भाग घ्यावासा वाटला. यावरून कमिशनचें स्वरूप किती प्रतिगामी व असमाधानकारक होतें याची खात्री पटते. पं. मोतीलाल नेहरू व तेजबहाद्दर सप्रू हे त्यापूर्वी अलाहाबाद हायकोर्टांत एकाच वेळीं वकील म्हणून काम करीत होते. ते दोघे परस्परांचे जसे सहकारी होते तसे व्यावसायिक प्रतिस्पर्धीही होते.

नेहरूंनीं आपल्या व्यवसायांत जितकी गडगंज संपत्ति मिळविली तितकीच सप्रूंनींही मिळविली. दोघांच्या राजकीय दृष्टिकोणांत महदंतर होतें. पण सायमन कमिशन व लॉर्ड बर्कनहेड यांचें आव्हान यांमुळें ते दोघे एकत्र आले. हिंदी स्वराज्याची घटना तयार करण्यासाठीं जी नेहरू कमिटी नेमण्यांत आली होती त्या कमिटींत नेहरूंच्या बरोबरीनें सप्रू होते. नेहरू रिपोर्टांत दोघांच्याही मतांचें प्रतिबिंब पडलें आहे.

१९२९ सालीं व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनीं डोमिनियन स्टेटसची जी घोषणा केली ती सप्रूप्रभृति नेमस्तांना मनापासून पसंत पडली. सर तेजबहादूर तिन्ही गोलमेज परिषदांना विलायतेस गेले व त्यांनीं आपली फेडरेशनची मागणी ब्रिटिश राज्यकर्त्यांपुढें मांडली. सध्यां ते निरनिराळ्या संस्थानिकांचे राजकीय सल्लागार आहेत.

---

## २२: विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

इतिहासाचार्य राजवाडे हे एक महापुरुष होऊन गेले. ते नुसते इतिहाससंशोधक नव्हते, तर थोर इतिहासतत्त्वविवेचक होते. इतकेंच नव्हे तर प्रज्ञावंत विचारस्रष्टे होते. ज्वलज्जहाल राष्ट्रीय वृत्ति, मराठी भाषेचा दुर्दम्य अभिमान, खोल इतिहासव्यासंग, व्यापक दृष्टि, भाषाशास्त्र व समाजशास्त्र या शास्त्रांतील थोर अधिकार इत्यादि अनेक गुणविशेषांमुळें राजवाडे हे हिंदी राष्ट्राला ललामभूत झाले आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांचा जन्म ता. १२ जुलै १८६४ रोजीं झाला. त्यांच्या घरची स्थिति अत्यंत गरिबीची होती. वयाच्या अठराव्या वर्षी ते मॅट्रिक झाले. थोडे दिवस एल्‌फिन्स्टन कॉलेजांत राहून पुढें ते डेक्कन कॉलेजांतून १८९० सालीं बी. ए. झाले. मॅट्रिकपर्यंतचें त्यांचें शिक्षण कांहीं घरीं व कांहीं बाबा गोखले,



नातू, बोमंट आणि भावे यांच्या शाळांतून झालें. १८८४ ते ९० हीं सहा वर्षें ते डेक्कन कॉलेजांत होते. या अवधींत गणित, इतिहास वगैरे निरनिराळे ऐच्छिक विषय आलटूनपालटून घेऊन अखेर त्यांनीं इतिहासविषयांत पदवी संपादन केली. कॉलेजचा त्यांचा शिक्षणक्रम त्यांना स्वावलंबनानेंच चालवावा लागत असल्यामुळें बी. ए. व्हायला त्यांना सहा वर्षें लागलीं. पण त्या अवधींत अभ्यासाखेरीज इतर अनेक विषयांचें त्यांनीं अफाट वाचन केलें. डेक्कन कॉलेजांत असतांना आपल्या भावी आयुष्याची बौद्धिक पूर्व-तयारी त्यांनीं जशी केली त्याप्रमाणें शरीर कमावण्यासाठीं सक्त मेहनत घेतली. कॉलेजांत असतांना राजवाड्यांनीं तालीम, पोहोणें, होडी वल्हविणें इत्यादि व्यायाम पुष्कळच घेऊन मजबूत शरीराची व निकोप प्रकृतीची जोड करून घेतली; आणि पुढें जें कष्टमय

आयुष्य त्यांना कंठावें लागलें आणि जे उपासतापास आणि सायास सोसावे लागले, त्याची तयारी करून ठेवली. कॉलेजमध्यें असतां-नाच वनस्पतिशास्त्र, मानसशास्त्र, इत्यादि शास्त्रें व फार्शी, फ्रेंच इत्यादि भाषा त्यांनीं अवगत करून घेतल्या. अशा रीतीनें उत्तम कमावलेलें शरीर आणि अनेक शास्त्रांच्या अध्ययनानें कमावलेली बुद्धि असें मौल्यवान भांडवल त्यांनीं संपादन केलें.

राजवाडे यांची बुद्धि कुशाग्र व कल्पनाशक्ति जबरदस्त होती हें तर खरेंच, पण त्याबरोबर ते आपल्या विषयाची माहिती मिळ-विण्यासाठीं पराकाष्ठेची मेहेनत करीत हें विसरतां कामा नये. त्यांची गाढ विद्वत्ता व व्यापक सिद्धांत मांडण्याची शैली अनेक वर्षांच्या तपश्चर्येचें फळ होतें. ही तपश्चर्या करतांना त्यांनीं 'कनक आणि कांता' या जोडीचा मोह जिकण्याच्या कामी एकाद्या योग्या-प्रमाणें सिद्धी मिळविली असल्यामुळें सामान्य लोकांना अधिकार-युक्त वाणीनें कठोर भाषेंत उपदेश करण्याचा अधिकार त्यांना प्राप्त झाला होता. इतिहास, व्युत्पत्ति व समाजशास्त्र हे विषय त्यांनीं आपलेसे करून ३०।३२ ग्रंथ प्रसिद्ध केले. प्रचलित राजकारणा-वरही त्यांनीं सडेतोड लेख लिहिले. विशेषतः चित्रमय–जगत्-मधील असहकारितेवरचे त्यांचे लेख फार गाजले होते.

तथापि या सर्व विद्याव्यासंगापेक्षां त्यांचें अंतःकरणांतलें खरें ध्येय निराळें होतें; देशोद्धार हें त्यांच्या जीविताचें अंतिम ध्येय होतें. देश खडबडून जागा व्हावा, तो स्वतंत्र असावा, विद्यासंपन्न असावा, जगांत सर्वत्र त्याला मान्यता असावी, ही त्यांच्या अंतः-करणांतली खरी तळमळ असून अत्यंत स्वार्थत्याग, जबर विद्या-व्यासंग व धाडसाची कृति यांचा संयोग, झाल्याशिवाय इष्ट कार्य साधणार नाहीं अशी त्यांची विचारांअंतीं खात्री झालेली होती.

कॉलेजांत असतांना जुजबी ठराविक शिक्षणापेक्षां स्वतःचें वाचन

व मनन यांजवरच राजवाडे यांनीं विष्णुशास्त्र्यांप्रमाणें भर दिला होता. त्यामुळें ठरीव साच्यांतून निघणाऱ्या तत्कालीन पदवीधरांप्रमाणें विद्यापीठांतून बाहेर पडतांच नोकरीकरितां अर्ज करण्याचा मामुली रस्ता त्यानीं स्वीकारला नाहीं.

बी. ए. होण्यापूर्वीच म्हणजे इ. स. १८८८ चे सुमारास त्यांनीं मराठी इतिहासाच्या खोल अध्ययनास प्रारंभ केला व सुमारें दहा वर्षांनीं ‘ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें ’ या आपल्या मालेंतील पहिला खंड प्रसिद्ध केला.

यापूर्वीं उदरनिर्वाहासाठीं एक वर्ष भावे हायस्कूल व पुढें दोन वर्षें न्यू इंग्लिश स्कूल या शिक्षणसंस्थांतून त्यांनीं शिक्षकाचा व्यवसाय केला. १८९५ मध्यें ‘ भाषांतर ’ नांवाचें स्वतंत्र मासिक शि. म. परांजपे प्रभृतींच्या सहाय्यानें त्यांनीं चालविलें, पण पुढें तें लवकरच बंद पडलें. तथापि त्यामुळें राजवाड्यांच्या ऐतिहासिक कार्याला नेट लागला. १८८८ते१९२७ या जवळजवळ अडीच तपांच्या अवधींत राजवाड्यानीं इतिहासाची जी प्रचंड व प्रभावी सेवा केली, त्यामुळें राजवाडे ही किती थोर व कर्त्री व्यक्ति होती याची यथार्थ साक्ष पटते. एवढ्या अवधींत त्यांनीं ऐतिहासिक कागदपत्रांचे बावीस खंड, इतर सहा स्वतंत्र ग्रंथ व भाषांतर मासिकाचे तीन खंड प्रसिद्ध केले. राजवाड्यांच्या या ऐतिहासिक साधनग्रंथांपेक्षां त्यांच्या प्रस्तावना अधिक बहुमोल आहेत. ज्ञानेश्वरीची त्यांची प्रस्तावना म्हणजे त्यांच्या गाढ विद्वत्तेचा उत्कृष्ट नमुना आहे.

अठराव्या वर्षीं मॅट्रिक, चोविसाव्यांत बी. ए., तिशींत एका भारदस्त मासिकाचा चालक व संपादक आणि चौतिसाव्यांत गाढा इतिहासविवेचक अशा पायऱ्या चढत चढत राजवाड्यांनीं वयाच्या पन्नाशीच्या आंत आपला एक संप्रदायच निर्माण करून दाखविला आणि हें अवजड कार्य स्वतःच्या बुद्धिप्रभावानें, परिश्रमानें आणि

एकनिष्ठेनें यशस्वी केलें आणि तज्ज्ञमंडळांत अग्रस्थान मिळविलें, हें जसें राजवाडे यांना व्यक्तिशः भूषणावह होय तसेंच तें महाराष्ट्रा-सही निःसंशय अभिमानास्पद आहे यांत संशय नाहीं.

# २३: नेव्हिल चेंबरलेन

कुणाला सांगितलें तर खरेंही वाटावयाचें नाहीं कदाचित्, कीं सध्यां इंग्लंडच्या मुख्य प्रधानपदावर आरूढ झालेले नेव्हिल चेंबरलेन हे वीस वर्षांपूर्वीं बर्मिंगहॅम या आपल्या जन्मभूमीपलीकडे विशेष माहीतही नव्हते. पण अवघ्या दीड तपाच्या अवधींत चेंबरलेन यांनीं आपल्या कर्तृत्वानें प्रधान-मंडळांत प्रवेश केला व पुढें लागोपाठ इंग्लंडचे मुख्य प्रधान झाले. चेंबरलेन मुख्य प्रधान झाल्यावर दोन वर्षांतच आंतरराष्ट्रीय राज-कारणांत भयंकर वादळ झालें. पहिल्या वर्षीं शांतता-वादी नेव्हिल चेंबरलेननीं



झेकोस्लोव्हाकियाचा बळी देऊन युरोपांत शांतता प्रस्थापित ठेवली

पण लागलींच दुसऱ्याच वर्षीं हिटलरशाही नेस्तनाबूद करण्यासाठीं चेंबरलेन यांनीं जर्मनीशीं युद्ध पुकारावयाला मागेंपुढें पाहिलें नाहीं. म्हणजे यावरून हें सिद्ध होते कीं, नेव्हिल चेंबरलेन हे जसे शांततेचे भोक्ते आहेत, त्याचप्रमाणें स्वाभिमानी इंग्रज व अस्सल मुत्सद्दी आहेत.

नेव्हिल चेंबरलेन याचें संपूर्ण नांव आर्थर नेव्हिल चेंबरलेन असून त्यांचा जन्म १८ मार्च १८६९ सालीं झाला. म्हणजे आज त्यांना ७१वें वर्ष चालू आहे. त्यांचे वडील जोसेफ चेंबरलेन व वडील बंधु ऑस्टिन चेंबरलेन या दोघांनी इंग्लंडच्या व युरोपच्या राजकारणांत चांगलाच लौकिक संपादन केला होता, पण मुख्य प्रधानपद कोणालाही लाभलें नाहीं. नेव्हिलचें प्राथमिक शिक्षण पुरें झाल्यावर त्यांना रग्बी येथें पब्लिक स्कूलमध्यें घालण्यांत आलें. शाळेंत असतांना त्यांची शिक्षणापेक्षां खेळाकडे अधिक आवड दिसून येई व त्यांनीं खेळांत चांगलें नांव मिळाविलें होतें. थोरल्या भावाप्रमाणें त्यांना विश्वविद्यालयांतील उच्च शिक्षणाचा विशेष लाभ झाला नाहीं. वडिलांची इच्छा त्यांनीं व्यापारांत पडावें अशी असल्यानें त्यांच्या व्यापारी शिक्षणाची चांगली तरतूद केलेली होती.

चेंबरलेन हे उणेदुणे विसाव्या वर्षांचे असतांनाच त्यांच्या वडिलांनीं त्यांना अमेरिकेत कांहीं व्यापारधंद्यासाठीं पाठविलें होते व तेथें त्यांना पांच सहा वर्षे रहावें लागलें. त्यांना तेथें शिसवीच्या लाकडाची लागवड करावयाची होती. त्यासाठीं त्यांनीं २० हजार एकर जमीन घेतली व अनेक संकटांतून हें कार्य उत्तम रीतीनें तडीस नेलें. या उद्योगांत त्यांचा विशेषसा आर्थिक फायदा झाला नाहीं, पण भरपूर व्यवहारज्ञान पैदा करून बर्मिंगहॅम येथें त्यांनीं आपला व्यवसाय सुरू केला.

वयाच्या बेचाळिसाव्या वर्षीं त्यांनीं सार्वजनिक आयुष्यांत पाहिलें

पाऊल टाकलें. आपल्या शहरच्या म्युनिसिपालिटीसाठीं ते उभे राहिले व १९११ सालीं निवडून आले. त्यानंतर आपल्या अंगच्या गुणांवर लवकरच ते टाऊन प्लॅनिंग कमिटीचे सभासद व अध्यक्ष झाले व लवकरच बर्मिंगहॅम कार्पोरेशनचे मेयर होण्याचा त्यांना मान मिळाला.

युरोपात त्या वेळीं महायुद्धाचा वणवा पेटलेला होता व लॉइड जॉर्ज हे मुख्य प्रधान होते. देशांतले मुत्सद्दी एकत्र करून त्यांचा राष्ट्राच्या आणीबाणीच्या प्रसंगीं शक्य तितका अधिक उपयोग करून घेण्याची त्यांची ख्याति होती. चेंबरलेन यांच्या कीर्तीचा सुगंध चहूंकडे दरवळत होताच. मुख्य प्रधानानीं त्यांना पाचारण करून राजकारणांत पडण्याविषयीं आदरानें सुचविलें, पण राजकारणांत भाग घ्यावयाचा तर त्यासाठीं पार्लमेंटचे सभासद होणें जरूर होतें. पण चेंबरलेन यांची तर आपल्या पंचक्रोशीबाहेर कोठेंही ख्याति नव्हती. अखेर तेथूनच १९१९ सालीं ते निवडून आले.

पार्लमेंटमध्यें शिरल्यावर ते फार लवकर चढत गेले. चार वर्षांच्या आंतच त्यांचा मंत्रिमंडळांत प्रवेश झाला. पोस्टखात्याचे डायरेक्टर-जनरल, आरोग्यमंत्री इत्यादि अनेक नात्यांनीं आपलें राजकीय महत्त्व प्रस्थापित केल्यावर १९२६ सालीं ते अर्थमंत्री झाले.

युद्धोत्तरकाळांत राष्ट्राला पैशाचा तुटवडा पडल्यानंतर जेथें जेथें पैसा वांचविणें शक्य आहे अशा सर्व जागीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त करून त्यांनीं राष्ट्राचा फायदा केला. एवढेंच नव्हे १९३४ सालीं ज्या वेळीं युरोपांतलीं इतर राष्ट्रें पैशाच्या टंचाईमुळें अंदाजपत्रकाची तोंड मिळवणी कशी करावी या विवंचनेंत होतीं त्या वेळीं चेंबरलेन यांनीं तुटीच्या अंदाजपत्रकाऐवजीं राष्ट्रापुढें फायद्याचें अंदाजपत्रक सादर केलें व आपली योग्यता प्रत्ययास आणून दिली.

आदर्श इंग्रज मुत्सद्दी म्हणून त्यांची ख्याति आहे व त्यांच्या धिम्मेपणामुळें राष्ट्राचा त्यांच्यावर विश्वास आहे. दीर्घोद्योग, चिकाटी, एकनिष्ठता, निरलसपणा इत्यादि त्यांचे गुण घेण्यासारखे आहेत. विशेषत: प्रतिकूल परिस्थितींत इतरांच्या विरोधांना न जुमानतां आपलें कार्य निधडेपणानें चालू ठेवण्याचा विशेष गुण त्यांच्या अंगीं आहे.

ते निर्व्यसनी आहेत. त्यांची वाचनाची हौस मात्र दांडगी आहे व त्याचें प्रत्यंतर त्यांच्या भाषणांतून पहावयास मिळतें. फिरण्याची, मासे धरण्याची व शिकारीची त्यांना अत्यंत आवड आहे. आपल्या स्वतःच्या ठराविक कार्याशिवाय ते इतर सार्वजनिक कामांत विशेष भाग घेत नाहींत.

इंग्लंडसारख्या देशाच्या मुख्य प्रधानकीची जागा मिळालेली असतांनाही चेंबरलेन यांचा स्वभाव महत्त्वाकांक्षी नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आपल्याला हें अत्युच्च पद मिळावें अशी त्यांनीं खटपटही केली नाहीं; पण वेळ आल्यानंतर जबाबदारीही टाळली नाहीं, यावरूनच नेव्हिल चेंबरलेन यांच्या व्यक्तित्वाचें व कर्तृत्वाचें यथार्थ दर्शन होईल.

---

# २४: प्रेसिडेंट मेसॅरिक

१९१४ च्या महायुद्धामुळें युरोपांत ज्या असंख्य घडामोडी झाल्या त्यांत आर्थिक व भूगोलविषयक घटनांना प्रामुख्यानें स्थान दिलें पाहिजे. या महायुद्धामुळें युरोपांतल्या अनेक देशांची उलथापालथ झाली व पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, रुमानिया, फिनलंड इत्यादि नवीं राष्ट्रें जन्मास आलीं. यांपैकीं झेकोस्लोव्हाकिया हें

चिमुकलें राष्ट्र थॉमस गॅरिक मेसॅरिक या थोर राष्ट्रपुरुषाच्या भगीरथ प्रयत्नांमुळें निर्माण झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. झेक व स्लाव या लोकांचा बोहेमिया हा देश एके काळीं स्वतंत्र



होता, पण ऑस्ट्रिया-हंगेरीच्या साम्राज्यशाहीनें गिळंकृत केल्यामुळें तो कित्येक शतकें पारतंत्र्यांत पिचत होता. आणि थॉमस मेसॅरिक या राज्यशास्त्राच्या प्रोफेसरानें आपल्या प्रयत्नांची पराकाष्ठा केली नसती तर अजूनही तो तसाच कुजत पडला असता. पण त्या राष्ट्राला उज्ज्वल भविष्यकाळ होता म्हणूनच प्रो. मेसॅरिक यांच्या हस्तें १९१८ सालीं त्याचा उद्धार झाला. जॉर्ज वॉशिंग्टन हे ज्या-

प्रमाणें अमेरिकेच्या स्वातंत्र्याचे जनक होत त्याप्रमाणें मेसॅरिक यांना झेकोस्लोव्हाकियाच्या निर्मितीचें सर्व श्रेय दिलें पाहिजे. हें राष्ट्र छोटें असलें तरी त्याची ऐतिहासिक पूर्वपरंपरा फार मोठी आहे व आज जगांतल्या मोठमोठ्या औद्योगिक राष्ट्रांत झेकोस्लोव्हाकियानें महत्त्वाचें स्थान संपादन केलें आहे.

झेकोस्लोव्हाकियाचे जनक व पहिले अध्यक्ष प्रे. मेसॅरिक यांचा जन्म ७ मार्च १८५० सालीं झाला. त्यांचें घराणें अगदीं खालच्या दर्जाचें व सामान्य होतें. वडील एका सरदाराच्या घरीं कोचमनचें काम करीत असल्यामुळें मेसॅरिक यांना लहानपणापासूनच स्वतःच्या चरितार्थाची सोय पहाणें भाग पडलें. व्हिएन्ना येथील रस्त्यावर ‘ टाला, चावी ’ करीत कुलुपकिल्ल्यांचा धंदा करण्यांत त्यांनीं बरेच दिवस घालविले. पुढें कांहीं दिवस एका लोहाराच्या हाताखालीं त्यांनीं काम केलें. अखेर त्यांना शाळेंत जाण्याची संधि मिळाली व थोड्याच दिवसांत आपल्या तल्लख बुद्धिमत्तेनें व स्वावलंबनानें वर चढतचढत ते पदवीधर झाले.

व्हिएन्ना विद्यापीठाची सर्वोच्च पदवी घेतल्यावर त्यांची प्रोफेसर म्हणून लागलींच नेमणूक झाली. अध्यापनाचें कार्य करित असतां त्यांनीं ‘ आत्महत्येची मीमांसा ’ नांवाचा एक छोटासा ग्रंथ प्रसिद्ध केला. या ग्रंथामुळें त्यांचा सगळीकडे फार बोलबाला झाला व त्याच वेळीं चार्ली गॅरिग या अमेरिकन तरुणीची व त्यांची गांठ पडली व त्यांचा विवाह झाला. तिच्यावरील उत्कट प्रेमामुळेंच तिचें आडनांव त्यांनीं आपल्या नांवांत समाविष्ट केलें. १८८२ ते १९०० हीं अठरा वर्षें त्यांनीं अध्यापनाचें पवित्र कार्य करण्यांत घालविलीं. रुबाबदार व गंभीर चेहेरा, गाढ विद्वत्ता व मोहक भाषणशैली यांमुळें त्यांचा सर्वत्र नांवलौकिक झाला, पण कॉलेजच्या नियमाप्रमाणें सरकारनें त्यांची योग्य ती बढती केली नाहीं. कारण

त्यांचीं सरकारविरोधी राजकीय मतें. ऑस्ट्रो-हंगेरियन सरकारनें त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांना नाना तऱ्हांनीं छळण्यास सुरवात केली व अखेर त्यांना हांकून दिलें. पण मेसॅरिक गडबडले नाहींत.

ते तावडतोब पार्लमेंटच्या निवडणुकीला उभे राहिले व बहुमतानें निवडूनही आले व त्यांनीं लागलींच आपल्या देशाच्या स्वातंत्र्याची चळवळ सुरू केली. डॉ. बेनेस, रासीन व स्टेहेला या सहकाऱ्यांसह १९१४ सालीं त्यांनीं बंडाचें निशाण उभारलें, पण तें स्वदेशांत नव्हें, परदेशांत. युरोपांतील प्रमुख राष्ट्रांची सहानुभूति संपादन करून त्यांच्या सहाय्यावर झेकोस्लोव्हाकियाचें स्वातंत्र्य मिळविण्याचा त्यांचा हेतू होता.

या वेळीं त्यांचें वय ६४ वर्षांचें होतें, तरी त्यांचा उत्साह व आशावाद अत्यंत जबरदस्त होता. १९१४ च्या डिसेंबर महिन्यांत राजकीय चळवळीचें नेतृत्व स्वीकारण्यासाठीं त्यांनीं स्वखुषीनें देशत्याग केला. स्वदेशाच्या मोक्षासाठीं त्यांनीं घरदार बायकोमुलें यांवर तुळशीपत्र ठेवलें व जिनीव्हा येथे प्रयाण केलें. इंग्लंड, फ्रान्स, इटाली, रशिया इत्यादि देशांच्या सहकार्यानें व युरोप-अमेरिकेंतील झेकोस्लोवाक लोकांच्या लष्करी संघटनेनें त्यांनीं १९१८ सालीं आपलें ध्येय साध्य केलें. अमेरिकन सरकार व प्रेसिडेंट विल्सन यांनीं झेकोस्लोव्हाकियाचें स्वातंत्र्य मान्य केलें. १८ ऑक्टोबर १९१८ रोजीं मेसॅरिक यांनीं झेकोस्लोव्हाकियाच्या स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. २१ डिसेंबर रोजीं त्यांनीं प्राग नगरींत पाऊल ठेवतांच त्यांचा जो अभूतपूर्व सन्मान केला तो अवर्णनीय होता. झेकोस्लोव्हाकियाच्या लोकसत्ताक सरकारनें त्यांना पहिले अध्यक्ष म्हणून निवडले इतकेंच नव्हें तर तहहयात अध्यक्ष म्हणून त्यांची नेमणूक केली. वयाच्या ८६ व्या वर्षापर्यंत १७ वर्षे त्यांनीं

आपल्या मायदेशाची सेवा केली व ते स्वेच्छेनें निवृत्त झाले. त्यानंतर दोन वर्षांनींच १९३७ सालच्या सप्टेंबर महिन्यांत ८८ व्या वर्षी त्यांनीं इहलोकची यात्रा संपविली.

प्रे. मॅसॅरिक यांची गणना जगांतील थोर मुत्सद्यांत व राष्ट्रपुरुषांत होते. लेनिन, सन्यत्सेन, केमालपाशा यांच्याबरोबर त्यांची तुलना करतां येईल. ज्या प्रे. मॅसॅरिकनीं झेकोस्लोव्हाकिया हें राष्ट्र निर्माण केलें त्या मॅसॅरिक यांच्या मृत्युनंतर अवघ्या एका वर्षाच्या आंतच झेकोस्लोव्हाकिया हें राष्ट्र नामशेष झालें, ही अत्यंत दुर्दैवाची घटना म्हटली पाहिजे. जर्मनीचा सर्वाधिकारी हर हिटलर यानें १९३८ च्या सप्टेंबर महिन्यांत झेकोस्लोव्हाकिया गिळंकृत करून जर्मन साम्राज्याला जोडला.

## २५: रॅम्से मॅक्डोनल्ड

इंग्लंडमधील मजूरपक्षाचे पहिले मुख्य प्रधान म्हणून रॅम्से मॅक्डोनल्ड यांचें नांव इंग्लंडच्या इतिहासांत महत्त्वाच्या स्थानीं नोंदलें गेलें जाईल यांत शंका नाहीं. विद्वत्ता, संपत्ति किंवा पूर्वजांची कीर्ति यांपैकीं कोणत्याही गोष्टीचा लाभ झालेला नसतांना स्वतःच्या कर्तृत्वशक्तीवरच ते एवढ्या महत्पदास चढले व गेलीं ४० वर्षे त्यांनीं इंग्लंडच्या राजकारणांत प्रामुख्यानें भाग घेतला. ब्रिटिश राष्ट्राच्या राजकीय इतिहासांत



संस्मरणीय समजली जाईल अशी क्रांतिकारक कामगिरी जरी त्यांच्या हातून झालेली नसली तरी एक थोर मुत्सद्दी या नात्यानें त्यांचे नांव दीर्घकालपर्यंत दुमदुमत राहील यांत शंका नाहीं.

इंग्लंडमध्यें समुद्रकांठच्या एका क्षुद्र खेडयांत मासे धरणाऱ्या कोळयाच्या घरीं त्यांचा इ. स. १८६५ च्या सुमारास जन्म झाला. त्यांना कोणत्याही प्रकारचें पद्धतशीर शिक्षण मिळालें नाहीं. त्यांनीं स्वावलंबनानेच जरूरीपुरतें शिक्षण संपादन केलें. आपल्या कर्तृत्वानें हळूहळू चढत जाऊन ते मजुरांचे पुढारी बनले. मजुरांच्या चळवळीचें पुढारीपण त्यांना मिळवितां आलें याचें कारण त्यांची वाणी व लेखणी प्रभावशाली होती. त्यांची कीर्ति व त्यांचा मोठेपणा जसा स्वयंसंपादित होता त्याचप्रमाणें त्यांचें प्रधानपद स्वकष्टार्जित होतें.

त्यांचें सर्व आयुष्य म्हणजे प्रयत्न व कष्ट यांची तेजस्वी कहाणी आहे. सुमारें ४० वर्षांपूर्वी लंडनच्या एका वखारींत आठवडयाला दहा रुपये मिळविणारा एक क्षुल्लक कारकून ब्रिटिश साम्राज्याचा पंतप्रधान होतो ही गोष्ट असामान्य कर्तृत्वशक्तीखेरीज कशी शक्य आहे? दुपारी वखारींत मरेमरेतों काम करावें, आणि रात्रीं शाळेंत जावें व मरेमरेतों अभ्यास करावा, असें कष्टकारक व खडतर आयुष्य कंठणारा मनुष्य मुख्य प्रधान झाला तर नवल कां वाटावें? शास्त्रीय विषयांत प्रावीण्य मिळविण्याची त्यांची विशेष आकांक्षा होती. परंतु आजारी पडल्यामुळें त्यांच्या आयुष्याला निराळें वळण लागलें. राजकारणाच्या क्षेत्रांत ते नकळत प्रवाहपतित झाले.

पार्लमेंटचे सभासद थॉमस लो यांचे खाजगी चिटणीस म्हणून कांहीं दिवस त्यांनीं काम केलें. फेबिअन चळवळींतून ते पुढें मजूरपक्षांत शिरले व त्यांच्या परिश्रमांमुळेंच तो पक्ष १९२४ सालीं सर्व-

श्रेष्ठ बनूं शकला. मजूरपक्षांत समाविष्ट झाल्यावर त्यांनीं विवाह केला व सबंध देशभर प्रवास करीत ते हिंडले. प्रवासांत त्यांनीं राजकारणाचा चांगलाच अभ्यास केला व परत आल्यावर १९०५ सालीं ते पार्लमेंटांत शिरले. महायुद्धाच्या वेळीं लोकमत त्यांच्या विरुद्ध गेलें त्यामुळें ते निवडून येऊं शकले नाहींत. तथापि महायुद्धानंतर पांच वर्षांनीं लोकमताचा वारा त्यांच्या बाजूला झुकल्यामुळें एकदम आश्चर्यकारक रीतीनें ते लोकप्रियतेच्या शिखरावर चढले व त्यांनीं ब्रिटिश साम्राज्यांतील सर्वांत श्रेष्ठ स्थान अलंकृत केलें. १९०५ सालीं त्यांनीं पार्लमेंटांत पदार्पण केलें व १९२४ सालीं ते ग्रेटब्रिटनचे पहिले मजूर मुख्य प्रधान झाले. पण त्यांचें हें प्रधानपद फार दिवस टिकलें नाहीं. एक वर्षाच्या आंतच त्यांचें प्रधानमंडळ गडबडलें, तथापि त्यांचें विरोधी पक्षाचें पुढारीपण टिकून राहिलें. पुन्हां १९२९ सालीं त्यांना पेशवेपदाचीं वस्त्रें मिळालीं व ते पुढें चार पांच वर्षें त्या जागेवर होते. पण १९३१ सालीं त्यांना स्वपक्षत्याग करून संमिश्र राष्ट्रीय पक्षांत सामील व्हावें लागलें. या वेळीं मॅक्डोनल्ड यांनी स्वपक्षद्रोह केला म्हणून त्यांच्यावर मोठें काहूर उठलें, पण साम्राज्यसंरक्षणासाठीं आपण संयुक्त पक्षांत दाखल झालों असें त्यांनीं स्वतःचें समर्थन केले. कांहीं असो, त्यांचें आत्मसमर्थन कोणाला पटलें नाहीं म्हणून असो, कीं तात्कालिक राजकीय परिस्थिति कारणीभूत झालेली असो, त्या वेळेपासून त्यांच्या लोकप्रियतेला ओहोटी लागली.

त्यांना विश्वविद्यालयांत शिक्षण बहुतेक मिळालेलें नव्हतें व त्यांनीं कोणतीहि पदवी संपादन केलेली नव्हती. तथापि वाचन, व्यासंग व प्रवास यामुळे त्यांच्या दृष्टीची व्यापकता वाढली होती व त्यांची बहुश्रुत विद्वानांत गणना होत असे. बहुजनसमाजाचें अंतःकरण वेधून घेणारें त्यांचें उत्कृष्ट वक्तृत्व त्यांच्या यशोवैभवाला कारणीभूत झालें. जबर महत्त्वाकांक्षा हें त्यांच्या उत्कर्षाचें एक महत्त्वाचें कारण आहे.

हिंदुस्थानाबद्दल त्यांच्या मनांत एके काळीं सहानुभूति वास करीत होती. ' हिंदुस्थानांतील राज्यकारभार ' या नांवाचें त्यांचें एक पुस्तक प्रसिद्ध आहे. आत्मविश्वास, प्रयत्नवादित्व, दीर्घोद्योग व आशावाद या गुणांनीं अलंकृत असें मॅक्डोनल्ड यांचें चरित्र अनेक दृष्टींनीं उद्बोधक वाटेल.

ते दक्षिण अमेरिकेच्या वाटेवर असतांना आगबोटींत ता. १०-११-१९३७ रोजीं एकाएकीं मृत्यु पावले.

---

# २६: स्टॅन्ले बाल्डविन

स्टॅन्ले बाल्डविन वीस वर्षांपूर्वी इंग्लिश जनतेला मुळींच माहीत नव्हते असें म्हटलें तरी चालेल. ते जे एवढ्या महत्पदाला चढले ते योगायोगाने चढले. त्यांच्या अंगीं असलेल्या असामान्य गुणांवर चढले असें मुळींच नाहीं. उलट मुख्य प्रधान व्हावयाला ज्या गुणांची आवश्यकता असते त्या गुणांचा तर त्यांच्यांत पूर्णत्वानें अभाव आहे. थोर मनाचे व उदार अंतःकरणाचे इंग्रज सद्गृहस्थ असें त्यांचें यथार्थ वर्णन करतां येईल. मुख्य प्रधानकीच्या जागेवर बाल्डविन अधिष्ठित झाले ते केवळ आकस्मिक योगायोगानेंच, असें म्हटल्यास मुळींच प्रत्यवाय नाहीं. बाल्डविन यांच्या कॉन्झर्वेटिव्ह ऊर्फ हुजूर पक्षांत त्यांच्या पेक्षां अधिक लायक व कर्तबगार माणसें असतांना बाल्डविन हे मुख्य प्रधान होऊं शकतात, यावरून नेतेपणाला लागणारे सर्व गुणविशेष त्यांच्या ठायीं आहेत हें स्पष्ट आहे. बाल्डविन यांच्या जवळ अशी कांहीं मोहिनी आहे कीं ज्यामुळें त्यांची छाप बसावयाला वेळ लागत नाहीं. लोकप्रीति संपादन करण्याची कला त्यांना फारच चांगली साधली आहे.

कर्तृत्व, मुत्सद्देगिरी, धडाडी, वक्तृत्व, श्रमशीलता, हुकमत, अग
दिपवून टाकण्याजोगें कोणतेही गुणविशेष अंगीं नसतांना बाल्डवि
मुख्य प्रधान कसें होऊं शकले याचें पुष्कळांना नेहेमीं आश्चर्य वाटते
पण बाल्डविन यांच्याजवळ सर्वांशीं समरस होण्याची व सर्वांन
आपल्या बरोबर घेऊन जाण्याची जी गोडवी वृत्ति आहे तीच त्यांच्य
ह्या श्रेष्ठ पदवीच्या मुळाशीं आहे, हें किती जणांना ठाऊक आहे ?

स्टॅन्ले बाल्डविन यांचा जन्म ३ ऑगस्ट १८६७ सालीं एका घरंदाज, सधन व सुखवस्तु घराण्यांत झाला. त्यांचे वडील आल्फ्रेड बाल्डविन हे एका पोलादाच्या कारखान्याचे मालक असून ग्रेट वेस्टर्न रेल्वेचे अध्यक्ष होते. ते सोळा वर्षं पार्लमेंटचे सभासद होते. स्टॅन्ले हे आपल्या वडिलांचे एकुलते एक पुत्र असल्यामुळें



त्याच बालपण साहाजिकच मोठ्या ऐषारामांत गेलें. हॅरो आणि केंब्रिजसारख्या आदर्श शिक्षणसंस्थांतून उच्च शिक्षण घेतल्यावर १९०८ सालीं वडिलांच्या पाठीमागें त्यांना वडिलोपार्जित पोलादाच्या धंद्यांत पडावें लागलें. सुमारें २० वर्षें त्यांनीं या धंद्यांत घालून तो खूप वाढविला. बाल्डविन यांच्या ठिकाणीं औद्योगिक किंवा व्यापारी बुद्धि नाहीं, तरी ते मोठे धोरणी व व्यवहारकुशल आहेत.

पहिल्याप्रथम आपल्या गांवच्या म्युनिसिपालटींत ते निवडून आले, पण अंगीं तडफदार वक्तृत्व नसल्यामुळें त्यांचें मुळींच तेज पडलें नाहीं. ते पुढें पार्लमेंटसाठीं उभे राहिले. एकदोनदां पराभव खाऊन ते १९०८ सालीं निवडून आले. आणि तेव्हांपासून मात्र ते आतांपर्यंत पार्लमेंटचे एक प्रमुख सभासद असून त्यांनीं आजपावेतों तीन वेळां मुख्य प्रधानाचें पद भूषविलें आहे.

महायुद्धाच्या वेळीं जेव्हां संयुक्त प्रधानमंडळ अस्तित्वांत आलें, तेव्हां बाल्डविन यांच्याकडे व्यापारखातें सोंपविण्यांत आलें होतें. त्या वेळीं त्यांचें नांव फारसें कोणालाही ठाऊक नव्हतें. पण पुढें बोनर लॉ यांच्या प्रधानमंडळांत त्यांना अर्थमंत्र्याची महत्त्वाची जागा मिळाली व पुढें बोनर लॉ यांच्या अकस्मात् मृत्यूमुळें पक्षाच्या पुढारीपणाबरोबर मुख्य प्रधानकीचीं वस्त्रेंही त्यांच्या अंगावर येऊन पडलीं.

साधारणपणें प्रत्येक सामान्य माणसाची अशीच समजूत असणार कीं, ज्या अर्थीं बाल्डविन हे तीन वेळां इंग्लंडचे सूत्रचालक झाले त्या अर्थीं ते मोठे कुटिल कारस्थानी मुत्सद्दी व कपटपटु राजकारणधुरंधर असले पाहिजेत. पण ही समजूत अगदीं चुकीची आहे. त्यांचा राजकारणाकडे मुळींच ओढा नाहीं; इतकेंच नव्हे तर त्यांची मनोवृत्ति राजकारणाला पारखी आहे. ते एक सुसंस्कृत, सुखवस्तु, स्वास्थ्यप्रिय व विद्याव्यासंगी गृहस्थ आहेत. बागेंत आरामशीरपणें पडून स्वस्थ चित्तानें पाइपचे झुरके घेत घेत एकादें पुस्तक वाचीत पडावें, यापलीकडे त्यांच्या सुखाची व महत्त्वाकांक्षेची धांव नाहीं. ते स्वभावानें सज्जन व वृत्तीनें उदार आहेत. राजकारणांत त्यांच्या धिम्या स्वभावाबरोबरच त्यांच्या नैतिक दृष्टिकोणाचाही उल्लेख केला पाहिजे. प्रत्येक लहानमोठ्या गोष्टीचें मूल्य ते नैतिक दृष्टीनें ठरवितात.

त्यांना आपल्या देशाबद्दल इतका निरतिशय व प्रखर अभिमान आहे कीं, केवळ देशासाठीं ते आपल्या टीकाकारांना व शत्रूंनाही आपल्या प्रधानमंडळांत घ्यावयास मागेंपुढें पहात नाहींत. दुसऱ्याच्या गुणांची कदर करण्याचा त्यांच्या अंगीं महत्त्वाचा गुण आहे. तसेंच प्रसंगीं स्वार्थाला पाठ देऊन देशासाठीं आपलें सर्वस्व द्यावयाला ते मागेंपुढें पहाणारे नाहींत.

---

# २७: टॉमस एडिसन

जगांतील एक थोर संशोधक टॉमस अल्व्हा एडिसन यांच्या अद्‌भुत शोधामुळेंच आज जगाच्या आधिभौतिक सुखसोयींत अभूतपूर्व क्रांति झाली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. विजेचा दिवा, फ़ोनोग्राफ, सिनेमा, टेलिफोन, टाइपरायटर इत्यादि अनेक अपूर्व शोध लावून एडिसननें मानवी सौख्य कितीतरी पटीनें वाढविलें आहे! जगांतील संशोधकांचे मुकुटमणि



होण्याचा मान त्यांनीं आपल्या हयातींत मिळविला होता. लहान-मोठ्या सर्व संशोधकांच्या शोधांची बेरीज केली तर एडिसनच्या वांट्याला जितके शोध येतील त्यांच्या निम्यानें तरी दुसऱ्यांच्या नांवें पडतील कीं नाहीं याची शंका आहे.

टॉमस एडिसन यांचा जन्म अमेरिकेंतील ओहियो संस्थानांत ११ फेब्रुवारी १८४७ रोजीं झाला. लहानपणीं त्यांची शरीरयष्टि नाजुक व कोमल असल्यामुळें त्यांना शाळेंत घातलें नाहीं. पण घरीं बसून त्यांची निरीक्षणशक्ति वाढली. यंत्रकलेविषयीं व निसर्गाच्या शक्तीविषयीं त्यांच्या मनांत लहानपणापासूनच विलक्षण कुतूहल निर्माण झालें. वयाच्या दहाव्या वर्षी त्यांना रसायनशास्त्राची गोडी लागली व त्यांनीं छोटीशी प्रयोगशाळाही निर्माण केली. आपल्या प्रयोगशाळेसाठीं पैसा मिळविण्याकरितां त्यांनीं वर्तमानपत्रें व भाजी विकण्याचा धंदा केला. कांहीं दिवस छोटे वर्तमानपत्रही चालविलें.

पुढें एडिसन रेल्वेचे इंजिन ड्रायव्हर व तारमास्तर झाले. ते जर तारमास्तर झाले नसते तर त्यांच्या हातून पुढें जे इतके शोध लागले ते लागले नसते. तारमास्तर असतांनाच त्यांना बिनतारी संदेश पाठविण्याची युक्ति सुचली. तारमास्तराचें काम करीत असतांनाच त्यांचे खाजगी रासायनिक प्रयोग चालूच होते. नोकरी करून फावल्या वेळांत त्यांनीं युनिव्हर्सल प्रिंटर, सुवर्णदर्शक यंत्र, विशिष्ट संदेशवाहक तारायंत्र इत्यादि यंत्रें त्यांनीं तयार केलीं. या यंत्रांच्या पेटंटाबद्दल त्यांना एकदम ४० हजार डॉलर मिळाले. भरपूर पैसे मिळाल्यामुळें त्यांना नवीन शोध लावण्यास उमेद आली.

१८७६ सालीं एडिसन मेनपोलार्क येथें गेले व तेथें स्वतःच्या मालाची पैदास करण्याकरितां त्यांनीं कारखाना उभारला. या ठिकाणीं त्यांनीं आपला टेलिफोनचा शोध पूर्णतेला नेला व त्या-

बद्दल त्यांना एक लाख डॉलर मिळाले. पुढें त्यांनीं फोनोग्राफ तयार केला व १९ फेब्रुवारी १८७८ रोजीं त्याचें पेटंट घेतलें. हें यंत्र तयार करण्यासाठीं त्यांनीं लवकरच कारखाना उघडला. त्यांत त्यांना महिन्याला आठ हजार डॉलर मिळूं लागले. एकट्या फोनोग्राफवर त्यांना अगणित संपत्ति प्राप्त झाली. विजेचा दिवा बनविण्यासाठीं त्यांनीं किती तरी रात्री खर्च केल्या, अखेर ते संपूर्णपणें यशस्वी झाले. विजेच्या दिव्यानें त्यांनीं सबंध जगास थक्क करून सोडलें! पोर्टलंड सीमेंट, ओतीव इमारती, खडकापासून लोहचुंबक, वनस्पतीपासून रबर इत्यादि अनेक शोध त्यांनीं लावले. १८६९ च्या जून महिन्यापासून १९१० च्या जून महिन्यापर्यंत थॉमस एडिसन यांनीं १३२३ शोध लावले व त्याबद्दल पेटंटें घेतलीं.

एडिसन शाकाहारी होते, इतकेंच नव्हे तर शेवटीं शेवटीं ते पूर्णपणें दुधावर राहिले होते. त्यामुळें त्यांची कार्यक्षमता व उत्साहशक्ति अखंड कायम राहिली.

एडिसन यांनीं जगाला जो संदेश दिला आहे तो कोणालाही अत्यंत मननीय वाटेल. ते म्हणतातः—"आतां मनुष्य प्राणि आपल्या मेंदूचा उपयोग करण्यास शिकला आहे. एका एकोणिसाव्या शतकांतच केवढे प्रचंड फेरफार मानवजातीच्या अनुभवास आले आहेत, त्यावरून मेंदूचा उपयोग करूं लागल्यास मनुष्याला अशक्य कांहीं नाहीं असें दिसून येईल. शोधक शक्तीची हल्लीं केवळ बाल्यावस्था आहे. लहान मुलें हिंडूंफिरूं लागण्यापूर्वीं रांगावयास लागतात, त्याप्रमाणें संशोधनशक्ति आतां कुठें रांगूं लागली आहे. जों जों या शक्तीची वाढ होत जाईल तों तों निसर्गाची शक्ति मनुष्याच्या हातीं येऊन एकापेक्षां एकेक अद्भुत चमत्कार होत जातील."

या थोर संशोधकानें ता. १८।१०।३१ रोजीं वयाच्या ८५ व्या वर्षीं आपली इहलोकची यात्रा संपविली.

# २८: चिआंग-कै-शेक

चिआंग-कै-शेक हा मूळचा एका खेडवळ व्यापाऱ्याचा मुलगा, पण तो आज चीनचा सर्वसत्ताधारी झाला आहे. चीनचें भवितव्य आज त्याच्या हातांत आहे. हजारों वर्षें जो चीन छिन्नविच्छिन्न झालेला होता त्या चीनचें एकीकरण करण्याचें बरेंचसें श्रेय त्याच्याकडे आहे. चीनचा एकमेव कर्णधार, चिनी सैन्याचा सर सेनापति व जगांतील एक थोर राष्ट्र-पुरुष म्हणून चिआंग-कै-शेक यांचें नांव आजकाल सर्वत्र विख्यात झालें आहे.



चिआंगचा जन्म इ. स. १८८७ सालीं चेकिआंग प्रांतांतील एका खेडयांत झाला. त्याचें घराणें कांहीं मोठेसें श्रीमंत नव्हतें, तसेंच तें अगदीं गरीबही नव्हतें. त्याला लहानपणींच शाळेंत घालण्यांत आलें. शाळेंतल्या अभ्यासांत त्यानें कधींच चमक दाखविली नाहीं. वयाच्या विसाव्या वर्षी म्हणजे १९०७ सालीं त्यानें आपला नेहमींचा शिक्षणक्रम सोडून दिला व पेकिंग जवळ असलेल्या पाओटिंग लष्करी विद्यालयांत आपलें नांव दाखल केलें. तेथील अभ्यासक्रम पुरा झाल्यावर तो जपानांत गेला व तेथील सुप्रसिद्ध शिंबो गोक्यो नांवाच्या लष्करी अधिकाऱ्यांच्या कॉलेजांत त्याला प्रवेश मिळाला. कॉलेजांतून बाहेर पडल्यावर जपानी लष्कर-

खात्यानें त्याची ताबडतोब सैन्यांत नेमणूक केली. चिआंग हा जवळ जवळ चार वर्षे जपानी सरकारचा नोकर होता.

जपानमध्यें असतांनाच १९०९ सालीं चीनच्या क्रांतीचा जनक डॉ. सन्यत्सेन यांच्याशीं त्याची गांठ पडली. त्या वेळीं चिआंगचें वय अवघें २२ वर्षांचे होतें. डॉ. सन्यत्सेन हद्दपार झाल्यामुळें जपानमध्यें रहात होते व तेथे त्यांनीं चिनी तरुणांच्या मनांत देशभक्तीचीं बीजें पेरण्यास सुरवात केली. त्यांच्या भोंवतालच्या तरुणांपैकीं ज्यांच्या हृदयांत राष्ट्रभक्तीची ज्योत प्रज्वलित झाली त्यांत चिआंगचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे.

चिआंग जपानमध्यें असतांना 'टंगमेघुई' नांवाच्या चिनी गुप्त संस्थेचा सभासद झाला. ही संस्था चिनी राष्ट्रीयत्वाचा पुरस्कार करण्यासाठीं स्थापन झालेली होती. ज्वलज्जहाल देशभक्तांनीं चीनच्या विमोचनार्थ या गुप्त संस्थेच्या द्वारें प्रयत्न चालविले होते. चीनमध्यें त्यानंतर कोमिंटांग नांवाचा जो प्रबळ राष्ट्रीय पक्ष स्थापन झाला त्याचीं बीजें या संस्थेंतच आढळून येतात. १९११ सालीं चीनमध्यें मांचू राजघराण्याची सत्ता उलथून पाडून चिनी लोकशाहीची जेव्हां प्रतिष्ठापना करण्यांत आली तेव्हां चीनमधील क्रांतीच्या रणयज्ञांत स्वतःची आहुति देण्यासाठीं चिआंगनें मागचा पुढचा विचार न करतां चीनमध्यें तांतडीनें प्रयाण केलें. वास्तविक चिआंगचें हें कृत्य उघडउघड बेकायदेशीर होतें. जपानी लष्करांतून पळून जाण्याचा त्यानें हा भयंकर गुन्हा केला होता! पण राष्ट्रभक्तीनें त्याचें हृदय इतकें प्रज्वलित झालें होतें कीं असले विचार करण्यास त्याला अवसर नव्हता. चीनमध्यें आल्यावर त्यानें आपला लष्करी पोषाख व तरवार जपानला पाठवून दिली!

१९११ ते १९१६या पांच वर्षांच्या अवधींत चीनमध्यें क्रांतीची

जी रणधुमाळी चालली होती तिच्यांत त्याला पुष्कळसें लढावें लागलें. या अवधींत सन्यत्सनेचा उजवा हात म्हणून चिआंगनें विश्वास संपादन केला, तसा त्यानें जनतेकडूनही नांवलौकिक मिळविला.

मध्यंतरीं चारपांच वर्षे व्यापारांत घालवून १९२१ सालीं क्रांतीच्या पुढारीपणाचीं कांहीं सूत्रें त्याला हातीं घ्यावीं लागलीं. १९२५ सालीं कोमिंटांग पक्षाचा अध्यक्ष म्हणून त्याची निवड झाली व डॉ. सन्यत्सेन यांच्या मृत्यूनंतर राष्ट्रीय सैन्याचा सर सेनापति म्हणून सर्व लष्करी सूत्रें त्याच्या हातीं आलीं व तो चिनी राष्ट्रीय पक्षाचा सर्वश्रेष्ठ अधिकारी झाला.

चिआंगनें आपल्या कारकीर्दीला १९२६ सालीं मोठ्या धाडसानें सुरवात केली. थोड्याच अवधींत आपल्या लष्करी सत्तेच्या सामर्थ्यावर व अचाट कर्तबगारीवर चीनचें एकीकरण घडवून आणण्याचें दुर्घट कार्य केलें.

चिआंगची पत्नी मादाम चिआंग-कै-शेक इचा उल्लेख केल्या--शिवाय त्याचें चरित्र पूर्ण होणार नाहीं. मादामचें शिक्षण अमेरिकेंत झालें असून त्याच्या प्रत्येक कार्यांत सल्लागार या नात्यानें तिची मोठी मौल्यवान मदत होत असते. चीनच्या आधुनिक इतिहासांत मादामइतकी सुसंस्कृत, सुविद्य, कर्तबगार व मुत्सद्दी स्त्री झालेली नाहीं. चिआंग-कै-शेक यांच्या यशस्वितेचें अर्धे श्रेय मादामकडे आहे असें निःसंशय म्हणतां येईल.



मादाम चिआंग

# २९: बेनिटो मुसोलिनी

आज जगाच्या नकाशांतील रंग बदलण्याचें सामर्थ्य ज्यांच्या



हातांत आहे अशा सत्ताधारी पुरुषांत सिनॉर मुसोलिनी याची प्रामुख्यानें गणना करावी लागेल. मुसोलिनीचें जीवनचरित्र मोठें रोमांचकारी आहे. बेकार, भटक्या, मजूर, शिक्षक, संपादक, सैनिक, पुढारी इत्यादि विविध स्थित्यंतरांतून चढत चढत जाऊन वयाच्या ३९ व्या वर्षी इटलीचा मुख्य प्रधान व सर्वाधिकारी होणाऱ्या मुसोलिनीचें आयुष्य चमत्कृतिपूर्ण नाहीं काय ?

मुसोलिनीचा जन्म २९ जुलै १८८३ रोजीं प्रिडापो प्रांतांत एका खेडेगांवीं झाला. त्याचा बाप लोहाराचा धंदा करीत असे, पण आई सुशिक्षित होती व ती शिक्षकिणीचा व्यवसाय करीत असे. मुसोलिनीचें प्राथमिक शिक्षण तिच्याच देखरेखीखालीं झालें. पुढील शिक्षण फेंझा येथील सायलेशियन कॉलेजांत झालें व फॉर्लिम पोपोली येथील शिक्षणक्रम संपवून १८९८ सालीं त्यानें शिक्षकाची पदवी संपादन केली. नंतर ग्वाल्टरी येथें एक वर्षभर शिक्षकाचें काम केलें.

मुसोलिनी लहानपणापासून हूड व दांडगा असल्यामुळें एके ठिकाणीं राहून शिक्षकाचा निर्जीव व्यवसाय करीत रहाणें त्याला पसंत पडणें शक्य नव्हतें. एक वर्षाच्या आंत तो घराबाहेर पडला. त्यानंतर त्याची स्थिति बरीच कठीण झाली.

त्याला कित्येक वेळां पोटासाठीं हमाली करावी लागली तर कांहीं प्रसंगीं उपाशी रहाण्याची पाळी आली. या अवधींत त्यानें फ्रेंच व जर्मन भाषांचा अभ्यास केला. साध्या जीवनक्रमास कंटाळून पुढें त्याने सैन्यांत प्रवेश मिळविला व थोड्याच दिवसांत कार्पोरल झाला. पण आईच्या आजारीपणामुळें त्याला सैन्यांतील नोकरी सोडावी लागली. नंतर सोशालिस्ट झाला व त्यानें अनेक वृत्त-पत्रांत काम केलें. १५ नोव्हेंबर १९१४ सालीं आपल्या मतप्रचारा-साठीं त्यानें पोपोलो डी इटालिया नांवाचें स्वतःचें वृत्तपत्र काढलें.

महायुद्धाच्या वेळीं इटालीनें दोस्त राष्ट्रांच्या वतीनें युद्धांत पडावें म्हणून मुसोलिनीनें आपल्या वृत्तपत्रांतून जोराचा प्रचार केला व त्यासाठीं त्याला तत्कालीन सरकारचा रोषही सहन करावा लागला. पण अखेर २४ मे १९१५ रोजीं इटाली दोस्त राष्ट्रांच्या बाजूनें युद्धांत सामील झाला व मुसोलिनीच्या वृत्तपत्राचें कार्य सफल झालें. लागलीच मुसोलिनीही रणांगणावर गेला, पण १९१७ सालीं प्राणांतिक जखमी झाल्यामुळें त्याला परत घरीं यावें लागलें.

महायुद्ध संपल्यावर लेनिननें इटालींत समाजसत्तावादी मतांचा जोरानें प्रचार चालविला, पण मुसोलिनीच्या ज्वलज्जहाल राष्ट्रीय वृत्तीला तें तत्त्वज्ञान न मानवल्यामुळे त्यानें स्वतःचा 'फॅशिस्मो' नांवाचा नवीन मतपंथ निर्माण केला. समाजवादाला तोंड देण्या-साठीं २३ मार्च १९१९ सालीं त्यानें फॅशिस्मो नांवाची लष्करी संघटना स्थापन केली. थोड्याच अवधींत या संघटनेचें सामर्थ्य वाढत गेलें व मुसोलिनीनें तीन लक्ष फॅसिस्ट सैनिक तयार करून रोमवर मोर्चा करण्याचा बेत जाहीर केला. मुसोलिनीच्या साम-र्थ्याची जाणीव इटलीचे राजे व्हिक्टर इमॅन्युअल यांना पुरेपूर असल्यामुळें मुसोलिनी आपल्या सैनिकांनिशीं रोमवर चाल करून जाण्याच्या आंत त्यांनीं त्याला आपल्या भेटीचें आमंत्रण दिलें व

मंत्रिमंडळ बनविण्याची विनंती केली. २९ ऑक्टोबर १९२२ रोजीं इटालीचीं राज्यसूत्रें मुसोलिनीच्या हातीं आलीं आणि तेव्हांपासून तो आजतागायत इटलीचा सर्वाधिकारी आहे. मुख्य प्रधान झाल्यावर मुसोलिनीनें आपलें सामर्थ्य इतकें वाढविलें कीं आजकाल मुसोलिनी म्हणेल ती पूर्वदिशा आहे. इटालीचे राजे नुसते नामधारी राजे राहिले आहेत.

मुसोलिनीचें जीवन स्टालिन किंवा हिटलर यांच्यापेक्षां पुष्कळच निराळें आहे. तो सुसंस्कृत विद्वान व विद्याव्यासंगी आहे. तसेच तो उत्कृष्ट वक्ता आहे. केवळ वक्तृत्वावरच तो इतका पुढें येऊं शकला, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. तो संगीतज्ञ आहे, तरवारबहाद्दर आहे, त्याचप्रमाणें लेखणी चालविण्यांतही त्याचा हातखंडा आहे. त्यानें आपल्या संपादकीय लिखाणानें इटालींत क्रांति घडवून आणली.

मुसोलिनी हा शिस्तीचा अत्यंत कडवा पुरस्कर्ता असून त्याची रहाणी अत्यंत साधी व नियमित आहे. तो कौटुंबिक वृत्तीचा असल्यामुळें गृहस्थधर्माचा अभिमानी आहे व संततिनियमनाचा कट्टा विरोधक आहे. आहाराच्या बाबतींत तो अधिक संयमनशील असून मद्याला क्वचितच स्पर्श करतो. दररोज सपाटून व्यायाम घेण्याची त्याची नेहमींची सवय आहे.

इटालीची आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं मुसोलिनीनें जितकें लक्ष पुरविलें तितकेंच जनतेच्या शारीरिक संपत्तीकडेही त्याचें लक्ष आहे. मुसोलिनीच्या अष्टादशवार्षिक अमदानींत इटालीची सर्वांगीण सुधारणा झाली आहे. यावरून एकतंत्री सर्वाधिकारशाहीसुद्धां कधीं कधीं लोकोपकारक होत असते असें स्पष्ट म्हणण्यास हरकत नाहीं.

---

# ३०: प्रेसिडेंट रूझवेल्ट

लागोपाठ दोन वेळां क्वचितच मिळणारा अध्यक्षपदाचा दुर्मिळ



बहुमान आतांपर्यंत ज्या दोघां-तिघांना मिळाला त्यांत अमेरिकेचे आजचे अध्यक्ष फ्रँकलिन रूझवेल्ट यांची गणना होते. फ्रँकलिन रूझ-वेल्ट हे अमेरिकेचे माजी अध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट यांचे दूरचे नातलग असून त्यांनीं आपल्या घराण्याची परंपरा पुढें चालविली आहे हें त्या घराण्यास भूषणावह आहे.

फ्रँकलिन यांचें वय आज साठीच्या घरांत असलें तरी त्यांच्या अंगीं तारुण्याचा जोम, धडाडी, कार्यक्षमता व महत्त्वाकांक्षा हे गुण उत्कटत्वानें वसत आहेत. त्यांची धिप्पाड देहयष्टि व त्यांचें व्यक्तिमत्व डोळ्यांत भरण्यासारखें असल्यामुळें त्यांची बहुजनसमाजावर तेव्हांच छाप बसते. निर्भयता, उत्साह व मुत्सद्देगिरी यांपेक्षां अखंड कार्यव्यापृतत्व हें त्यांच्या यशाचें प्रमुख कारण सांगतां येईल.

फ्रँकलिन रूझवेल्ट यांचें शिक्षण ग्रोटन येथील शाळेंत झालें. शाळेंत असतांनाच त्यांना ठिकठिकाणीं हिंडावयाची व प्रवासाची संधि मिळत गेल्यामुळें त्यांची दृष्टि व्यापक झाली. तसेंच निरनिराळे खेळ, पोहणें, घोड्यावर बसणें, नाव वल्हविणें, शिकार करणें, बर्फावर घसरणें वगैरे विविध प्रकारचे शारीरिक व्यायाम करण्यांत त्यांनीं आपल्या आयुष्यांतील कित्येक वर्षें घालविलीं आहेत.

त्यांना लहानपणापासून समुद्रपर्यटणाची व नाविक शिक्षणाची विशेष हौस असे. पण पुढें ते कॉलेजांत गेले व १९०४ सालीं ते पदवीधर झाले. लगेंच त्यांची चुलत बहीण ॲना रूझवेल्ट यांच्या-बरोबर त्यांचा विवाह झाला.

रूझवेल्ट सुरवातीला रिपब्लिकन पक्षांतले होते. पुढें ते डेमोक्रॅटिक पक्षाला जाऊन मिळाले. त्या पक्षाकडून त्यांना हरतऱ्हेची मदत झाल्यामुळें व तो पक्ष त्यांच्या मनोभूमिकेशीं अनुरूप ठरल्यामुळें ते पुढें कायमचेच डेमोक्रॅट झाले.

पदवीधर झाल्यावर कोलंबिया लॉ कॉलेजमध्यें त्यांनीं कायद्याचा अभ्यास केला व ते बॅरिस्टर झाले. १९१० सालीं ते आपल्या प्रांतांतून वरिष्ठ कायदेमंडळासाठीं उभे राहिले व निवडूनही आले.

तिसाव्या वर्षीं ते आरमारखात्याचे असिस्टंट सेक्रेटरी म्हणून काम पाहूं लागले. आरमारखातें हें त्यांचें अत्यंत आवडतें खातें असल्यामुळें ते अत्यंत उत्साहानें व उमेदीनें काम करूं लागले. त्यांच्या नेतृत्वाखालीं ह्या खात्यांत बऱ्याच सुधारणा झाल्या व अमेरिकेचे परराष्ट्रीय धोरण ठरविण्याच्या कामीं रूझवेल्टनीं आंखून दिलेल्या धोरणाचा फार उपयोग झाला. प्रेसिडेंट विल्सन यांनींही त्यावेळीं रूझवेल्टबद्दल चांगले उद्गार काढले होते.

महायुद्ध सुरूं झाल्यावर त्यांत भाग घेण्यासाठी ते युरोपांत गेले होते. तेथें मार्शल फॉक, क्लेमेंको, लॉइड जॉर्ज, पचम जार्ज इत्यादिकांशीं त्यांच्या भेटी झाल्या.

वयाच्या अडतिसाव्या वर्षीं त्यांनीं आरमारखात्याचा राजीनामा दिला, व उद्योगधंदा करण्याकडे आपलें लक्ष घातलें. त्यानंतर कांहीं वर्षांनीं त्यांच्यावर एक भयंकर आपत्ति कोसळली. पक्षघाताच्या विकारानें त्यांचे पाय लुले झाले व त्यांना कोणतेंही काम करणें अशक्य झालें. पण त्यांनीं व्यायामाच्या निरनिराळ्या प्रका-

यांचें सहाय्य घेतलें व दुखण्यांतून ते लवकरच बरे झाले. हल्लीं त्यांची प्रकृति अगदीं खणखणीत आहे.

१९३२ सालीं अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून निवडून येण्यापूर्वी २८।२९ वर्षे त्यांनीं देशाच्या राजकारणांत व राज्यकारभारांत महत्त्वाचा भाग घेतला होता. अध्यक्षपदावर येण्यापूर्वी ते न्यूयॉर्कचे लोकनियुक्त गव्हर्नर म्हणून काम करीत होते. ही जागा जशी मानाची आहे तशीच महत्त्वाचीही आहे. अमेरिकेच्या अध्यक्षाच्या खालोखाल न्यू यॉर्कच्या गव्हर्नरचें स्थान आहे.

त्यांची कामगिरी व नेत्याला लागणाऱ्या गुणांचें त्यांच्या ठिकाणचें अस्तित्व या गोष्टींकडेच प्रामुख्यानें लक्ष देऊन अध्यक्षपदासाठीं त्यांचें नांव मुक्रर करण्यांत आलें. त्यांच्या पूर्वींचे अध्यक्ष व रिपाब्लिकन पक्षाचे प्रमुख हर्बर्ट हूवर यांच्या अंमदानींत जागतिक मंदी, बेकारी, हलाखी इत्यादिकांचें निवारण न झाल्यामुळें अमेरिकन लोकमत मोठमोठ्या घोषणा करणाऱ्या डेमोक्रॅटिक पक्षाकडे वळावें हें साहजिकच होतें. शिवाय हूवर हा मद्यपानबंदीचा कट्टा पुरस्कर्ता तर रूझवेल्ट मद्यपानस्वातंत्र्याची तरफदारी करणारे, त्यामुळें अनिर्बंध मद्यपानाच्या कायद्यासाठीं लोलंगत झालेली जनता रूझवेल्टला डोक्यावर घेऊन नाचल्यास नवल काय?

रूझवेल्ट यांना शेतकीचा विशेष शोक असून खेडेगांवांत रहाणें त्यांना मनापासून आवडतें. त्यांची स्वतःची पुष्कळ शेती व बागाईत आहे. त्यांच्या स्वतःच्या वीस गाई आहेत.

ते बहुश्रुत असून त्यांचा अनेक विषयांचा व्यासंग आहे. ते नेहमीं कुठला ना कुठला नवीन विषय वाचीत असतात. चरित्रें व गुप्त पोलिसांच्या गोष्टी हें त्यांच्या आवडीचें वाङ्मय आहे. ते असामान्य वक्ते नसले तरी त्यांचा आवाज श्रोत्यांवर छाप पाडल्याशिवाय रहात नाहीं. परिणामकारकता हें त्यांच्या भाषणाचें मर्म आहे.

प्रेसिडेंट रूझवेल्ट यांनीं आपल्या अध्यक्षपदाच्या पहिल्या कारकीर्दीत इतकीं लोकोपयुक्त कार्यें केलीं कीं त्यामुळें त्यांची लागोपाठ दुसऱ्यांदा अध्यक्षपदावर निवडणूक झाली. जागतिक मंदी, बेकारी, इत्यादिकांपासून अमेरिकेचें रक्षण करून तिला वाढत्या वैभवाच्या शिखरावर नेऊन पोंचविण्याचें कार्य रूझवेल्ट यांनीं केल्यामुळें ते सर्वत्र लोकप्रिय झाले आहेत. आणि त्यामुळेंच तिसऱ्यांदा त्यांनीं अध्यक्षपदासाठीं उभे रहावें अशी जनतेची खटपट चालू आहे.

---

# ३१: डॉ. सन्यत्सेन

डॉ. सन्यत्सेन यांना चिनी स्वातंत्र्याचा जनक म्हणून संबोधण्यांत येतें आणि ते मुळींच चुकीचें नाहीं. कारण डॉ. सन्यत्सेन झाले नसते तर १९११ सालीं चीनमध्यें जी क्रांति झाली ती झाली नसती व देश खडबडून जागा झाला नसता. असें सांगतात कीं आजपर्यंत जगांत होऊन गेलेल्या किंवा सध्यां अस्तित्वांत असलेल्या कोणाही पुढाऱ्याला सन्यत्सेन इतके अनुयायी



मिळाले नाहींत. चिनी लोक तर त्याला साक्षात् ईश्वराचा अवता मानीत. यावरून सन्यत्सेननें चीनमध्ये केवढें प्रचंड कार्य केले याचं यथार्थ कल्पना येईल.

दक्षिण चीनच्या एका सुपीक भागांत १८६६ स लीं सन्यत्सेनच जन्म झाला. त्याचा बाप शिंपी होता. त्याच्या लहानपणीं चीनमध् सर्वत्र अदाधुंदी व बेबंदशाही माजली होती. चोऱ्या, दरोडे अत्याचार यांचें सगळीकडे अनिर्बन्ध साम्राज्य होतें. सन्‌ला क लागल्यापासून तो यासंबंधीं विचार करूं लागला. वयाच्या १ व्या वर्षी तो आपल्या थोरल्या भावाकडे होनोलुलूला गेला व तें तीन वर्षे इंग्रजी शिकला. आपल्या गांवी आल्यावर राजा, दैव, ध यांच्या विरुद्ध तो शिकवण देऊं लागला. त्यामुळें गांवांतले शि लोक, व अधिकारी खवळले व त्याला गांवांतून हद्दपार करण्यां आलें. या वेळीं सन्‌चें वय अवघे १९ होतें.

पुढें तो पुन्हां हॉंगकॉंगला गेला व तेथील क्वीन्स कॉलेजां त्यानें वैद्यकीय शिक्षण घेतलें व वयाच्या २६ व्या व म्हणजे १८९२ साली तो डॉक्टर झाला. मध्यंतरींचीं कांहीं व चळवळ करण्यांत गेलीं. डॉक्टर झाल्यावर मॅकोआ व कंतान ये त्यानें दवाखाने सुरूं केले व थोड्याच अवधींत उत्तम शस्त्रवै म्हणून त्याची प्रसिद्धि झाली.

कंतान येथें असतांना त्यानें लोकजागृतीची विलक्षण खटप केली. चीनमध्यें त्या वेळीं ज्या मांचू राजांचें राज्य होतें त्यां कायदे एकाद्या सुलतानालाही लाजविण्यासारखे असत. चिन लोकांनीं चिनी कायदे अगर लष्करी शिक्षणाचें पुस्तक वाचलें त त्यांना फांसावर लटकावण्यांत येत असे. असल्या प्रतिकूल परि स्थितींतहि सन्यत्सेननें चळवळ करण्याचा चंग बांधला. लो. टिळकां स्वराज्याचा महामंत्र जसा निर्माण केला त्याप्रमाणेंच सन्‌नें ' टि

मिंग वु चँग ' हा तेजस्वी मंत्र तयार केला. याचा अर्थ ' राजाची सत्ता चिरकाल टिकत नाहीं. ' असा आहे. सन्यत्सेननें जनतेला हा उपदेश देण्यासाठीं सबंध चीनभर गुप्त मंडळ्यांची स्थापना केली. त्याच्या जळजळीत राष्ट्रीय चळवळीमुळें मांचू अधिकारी संतप्त झाले व १८९५ सालीं त्याच्यासह अठरा चळवळ्यांना पकडण्यांत आलें. त्यांपैकीं सतरांना फांसावर चढविण्यांत आलें, पण सन्यत्सेन सुदैवानें सुटला. देशाभिमानी चिनी अधिकाऱ्यांनींच त्याला वांचविला.

सन्यत्सेननें तुरुंगांतून पलायन केल्यावर त्याला पकडण्यासाठीं पन्नास हजार पौंडांचें बक्षिस लावण्यांत आलें, पण वेषांतर करून त्यानें देशपर्यटणास सुरवात केल्यामुळें त्याचा पत्ता लागला नाहीं. या अज्ञातवासांत तो होनोलुलू, अमेरिका इंग्लंड इत्यादि ठिकाणीं हिंडला. लंडनमध्यें असतांना त्याला पकडण्यांत आलें. पण तो शिताफीनें निसटला. पुढें तो जपानमध्यें गेला व तेथून चीनमधील कारस्थानांचीं सूत्रें हालवीत राहिला.

सन्यत्सेन जरी चीनमध्यें प्रत्यक्ष घडामोडी करण्यास हजर नव्हता तरी त्यानें दिलेली स्फूर्ति व आंखलेलें धोरण हेंच त्याच्या अनुयायांना पुढील बंडाची उभारणी करण्यास पुरेसें झालें. पुढाऱ्यांच्या अंतर्धानाबरोबर इतर देशांत त्या पुढाऱ्यांनीं उत्पन्न केलेली स्फूर्ति जशी वावटळीप्रमाणें निघून जाते तशी स्थिति चीनची झाली नाहीं. त्यामुळें त्याचें क्रांतीचें कार्य त्याच्या गैरहजेरींतही यशस्वी होऊं शकलें.

सन्यत्सेनच्या चळवळीला १९११ सालीं पूर्ण यश आलें. त्या सालीं चीननें मांचू घराण्याविरुद्ध बंड पुकारून मांचूचा पुरा बींमोड केला व त्यांना हाकून लावलें. बंडाला सुरवात झाल्यानंतर सन्यत्सेन रणांगणावर आला. त्यानें आपल्या हातीं बंडाचीं सूत्रें घेतलीं व बंड पूर्ण यशस्वी केलें. सन्यत्सेनच्या या महत्कार्याबद्दल

जनतेनें त्याला लोकसत्ताक चीनचे पाहिले अध्यक्ष नेमले. ता. १–१–१९१२ रोजीं डॉ. सन्यत्सेन चीनचा पहिला लोकनियुक्त अध्यक्ष झाला. पण पुढें चीनमध्यें अंतःस्थ बंडाळी माजल्यामुळें त्यानें राजीनामा दिला. पुढें देशांत शांतता नांदण्यासाठीं स्वकीय व परकीय यांच्यांशीं झगडण्यांत त्याचीं बरींच वर्षें गेलीं. या विरोधामुळें सन्यत्सेनला आपल्या हयातींत शांति अगर सुख कसें तें लाभलें नाहीं. त्याच्या प्रयत्नाला खरें यश त्याच्या मृत्यूनंतरच आलें. सन्यत्सेननें जें आपलें मृत्युपत्र करून ठेवलें आहे, त्याला चिनी लोक धर्मग्रंथाप्रमाणें मानतात. सन्यत्सेन वयाच्या ५९ व्या वर्षी ता. १२–३–२५ रोजीं मृत्यु पावला.

---

# ३२: केमालपाशा

गेल्या महायुद्धांतून जगांत जीं मोठीं माणसें निर्माण झालीं



त्यांपैकीं केमालपाशा हे एक होत. महायुद्धांत शिरण्यांत तुर्कस्थानानें चूक केली व ती त्यास अखेर भोंवल्याशिवाय रहाणार नाहीं अशी त्यांची प्रथमपासूनच ठाम समजूत होती व तीच खरी ठरून महायुद्धाच्या शेवटीं तुर्कस्थान हें स्वतंत्र राष्ट्र या दृष्टीनें रसातळास जाण्याच्या बेतांत आलें. त्या कठीण अवस्थेंतून त्यास तारणारा केमालपाशासारखा कर्णधार तुर्कस्थानास भेटला. केमालपाशांत सेनापति व मुत्सद्दी हे दोन्ही गुण असामान्य-

पणें वसत होते व त्याच गुणांच्या जोरावर त्यानें तुर्कस्थानला युरोपियन राष्ट्रांच्या दाढेंतून बाहेर काढला. केमालपाशाला तुर्कस्थानला नवजीवन देणारा तुर्कस्तानचा राष्ट्रोद्धारक म्हटल्यास हरकत नाही. ' गाझी ' म्हणजे विजेता व 'विजेता' ही पदवी जर कोणाला यथार्थतेनें शोभत असेल तर लोकसत्ताक तुर्कस्थानचे पहिले अध्यक्ष गाझी मुस्तफा केमालपाशा यांनाच शोभून दिसते. कारण मुस्तफा केमाल हे सर्वत्र गाजलेले विजयी वीर होते.

मुस्तफा केमालपाशा यांचा जन्म तुर्कस्थानचा सुलतान दुसरा अबदुल हमीद याच्या कारकीर्दींत इ. स. १८८२ साली सालोनिका येथें झाला. मुस्तफाचा बाप तेथें जकातखात्यांत नोकर होता. त्याच्या मृत्यूनंतर मुस्तफाचें पालनपोषण करण्याचें कार्य त्याच्या आईवर येऊन पडलें. सालोनिकास एक लष्करी शिक्षणाची शाळा होती व लष्करी लोकही बरेच होते. त्यांचा ऐटबाज लष्करी पोशाख पाहून मुस्तफाला लष्करी शाळेंत शिकावयाची इच्छा झाली. त्या शाळेंत शिकत असतां गणित विषयांतील प्राविण्यावरून त्याच्या शिक्षकानें त्याला केमाल हें नांव दिलें व पुढें तेंच रूढ झालें.

सालोनिका येथें प्राथमिक लष्करी शिक्षण घेतल्यावर मोनॅस्टीर व कॉन्स्टांटिनोपल येथें पदवीचें उच्च शिक्षण त्यानें पुरें केलें व लागलीच वयाच्या २१ व्या वर्षी त्याची लेफ्टनंटच्या हुद्दयावर नेमणूक झाली. त्यावेळीं तुर्कस्थानांत तरुण तुर्कांची एक गुप्त राजकीय संस्था सुलतानाचें उच्चाटण करण्यासाठीं निर्माण झाली होती. केमाल या संस्थेला गुप्तपणें जाऊन मिळाला. संशयावरून त्याला अटक करण्यांत आली पण मागाहून त्याची सुटका करून त्याला लांब दमास्कस येथें पाठविण्यांत आलें.

महायुद्धाच्या वेळीं तुर्कस्तानचा सेनापति अन्वरपाशा यानें डार्डानेलीसच्या संरक्षणार्थ केमालची नेमणूक केली. त्या ठिकाणीं

जर्मन सेनेचेंही आधिपत्य त्याजकडे आलें. त्याच्या जोरावर केमालनें ब्रिटिश सत्तेचा मोड केला. त्यायोगे त्याचा लौकिक फार वाढला इतकें नव्हे तर जर्मनींत तो मोठा वीरपुरुष समजला गेला.

महायुद्ध संपल्यावर केमालपाशा कॉन्स्टांटिनोपल येथें परत आला व तुर्कस्थानची दुर्दशा पाहून त्याच्या मनांत क्षोभ उत्पन्न झाला. ब्रिटिश फ्रेंच व इटालियन या तिघांनीं तुर्कस्थानवर आक्रमण करून तो छिन्नविच्छिन्न करून टाकला होता. केमालपाशानें संपूर्ण तुर्कस्थान तुर्की लोकांच्या सत्तेखालीं आला पाहिजे या राष्ट्रीय भावनेनें सैन्याची जमवाजमव करण्यास सुरवात केली व १९१९ सालीं कॉन्स्टँटिनोपलविरुद्ध उघडपणे बंड पुकारून आशियामायनरचा ताबा घेण्याचें ठरविलें व अंगोरा ही आपली राजधानी केली. २३ एप्रिल १९२० रोजीं अंगोरा येथें त्यानें ग्रॅड नॅशनल असेंब्लीची बैठक भरविली. शेवटीं अंगोरापासून ४० मैलांवर ग्रीक व तुर्क यांचें तुंबळ युद्ध होऊन ग्रीकांचा पराभव झाला. या लढाईत केमालनें अशी मर्दुमकी गाजविली कीं ती लढाई जगातील क्रांतिकारक लढायांत गणली गेली. या लढाईनंतर लॉसेन येथे परिषद भरली व तिच्यांत केमालपाशानें जें मागितलें होतें तें बहुतेक सारें त्याला मिळालें. त्यानें २९ ऑक्टोबर १९२३ रोजीं लोकसत्ताक राज्याची स्थापना केली व तो पहिला अध्यक्ष म्हणून निवडून आला. १९२४ च्या मार्च महिन्यांत तुर्की सरकारनें खिलाफत नष्ट केली.

केमालनें लोकसत्ताक राज्य स्थापन केलें होतें तरी सर्व अधिकार त्यानें आपल्या मुठींतच ठेवलें होतें. तो तुर्कस्थानचा सर्वाधिकारी झाला. त्यानें हें पद मरेपर्यंत गाजविलें.

केमालच्या विजयश्रीचें उच्च शिखर जर कोठें दिसून येत असेल तर त्यानें तुर्कस्थानांत जी अपूर्व क्रांति घडवून आणली तिच्यांत दिसतें. अज्ञानांधकारांत खितपत पडलेल्या व मागासलेल्या राष्ट्राचें

आधुनिक सुधारणांनीं नटलेल्या आजतागायत राष्ट्रांत रूपांतर करणें हें किती दुर्घट व दुःसाध्य आहे हें सांगावयास नकोच. अवघ्या दहा वर्षांत केमालनें तुर्कस्थानांत क्रांति करून सबंध जगाला थक्क करून सोडलें.

केमालनें आपल्या अमदानींत तुर्कस्थानला जसें राजकीय स्वातंत्र्य दिलें त्याप्रमाणें सामाजिक व इतर क्षेत्रांतही त्यानें अनेक क्रांतिकारक सुधारणा केल्या. धर्मगुरूंचें उच्चाटन करून त्यानें जनतेला धार्मिक स्वातंत्र्य दिलें. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीनें सर्व हक्क देऊन त्यांच्या प्रगतीचें पाऊल पुढें टाकलें. केमालनें पहिल्या प्रथम फेज टोपी नामशेष केली. मशीदी जमीनदोस्त करून त्यांच्या जागीं धान्याचीं कोठारें स्थापन केलीं; तुर्की भाषेला नवें लॅटिन स्वरूप दिलें; तुर्कस्थानांत पूर्वापार चालत आलेल्या बहुपत्नीकत्वाच्या चालीचा त्यानें कायमचा बीमोड केला व विवाहासंबंधीं नवे कायदे तयार केले; अरबी पंचांग बदलून युरोपियन कॅलेंडर चालू केलें. केमालनें स्त्रियांच्या स्वातंत्र्याचे दरवाजे खुले केले; त्यांच्या मार्गांतील पूर्वपरंपरागत अडथळे व निर्बन्ध नाहीसे केले; जादूटोण्यांच्या पुस्तकांना बंदी केली; कॉन्स्टांटिनोपलचें नांव इस्तबूल ठेवलें, स्त्रियांचा पडदा काढून टाकला; लग्न, घटस्फोट, वारस यांसंबंधीं कायदे बदलले; पाशा, बे, या पदव्या नाहींशा करून आडनांवें सुरू केलीं.

केमालनें आपल्या देशांत ज्या इतक्या सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक सुधारणा केल्या त्यामुळें युरोपांतील इतर सर्वाधिकाऱ्यांपेक्षां त्याचें नांव विशेष ठळकपणें डोळ्यांपुढें येतें व त्याचें कर्तृत्व असामान्य आहे अशी खात्री पटते.

केमालपाशानें आपल्या नांवाचें शुद्धीकरण करून अलीकडे 'केमाल अतातुर्क' हें अस्सल तुर्की नांव धारण केलें होतें. १० नोव्हेंबर १९३८ रोजीं वयाच्या ५६ व्या वर्षी केमालचें देहावसान झालें.

---

# ३३: एडवर्ड दलादिये

फ्रान्सचे आजचे मुख्य प्रधान एडवर्ड दलादिये हे जर्मनी व इटली या देशांच्या



सर्वाधिकाऱ्यांप्रमाणें त्रिखंडविख्यात नसले तरी युरोपियन राजकारणाच्या प्रमुख सूत्रधारांत त्यांची गणना आहे. फ्रेंच लोकशाहीचे कर्णधार या नात्याने फ्रान्सचे सर्वाधिकार सध्यां त्यांच्याकडेच आले आहेत. हिटलर, मुसोलिनी, स्टॅलिन अगर चेंबर्लेन यांच्या पंक्तींत बसण्याची लायकी असतांनाहीं केवळ परिस्थितीच्या भिन्नत्वानें व आपल्या मितभाषीपणानें ते मागें पडले आहेत. हिटलर ज्या दिवशीं जर्मनीचा चॅन्सेलर झाला त्याच दिवशीं दलादिये यांच्याकडे फ्रान्सचें मुख्य प्रधानपद आलें, हा योगायोग पहाण्यासारखा आहे. एकमेकां विरुद्ध युद्ध पुकारणारे हे दोन राष्ट्रांचे नेते एकाच दिवशीं अधिकारारूढ व्हावेत हें आश्चर्यकारक नाहीं काय ?

दलादिये हे इतर सर्वाधिकाऱ्यांप्रमाणें जगाला माहीत नसले तरी त्यांच्या जीवनचरित्रांत व या सर्वाधिकाऱ्यांच्या जीवनचरित्रांत

अनेक साम्यस्थळें आढळून येतील. दलादिये यांचा जन्म इ. स. १८८६ सालीं एका सामान्य व दरिद्री कुळांत झाला. त्यांचे वडील एका खेडेगावांत बेकरीचा धंदा करीत होते. त्यामुळें दलादिये यांच्या शिक्षणावर लहानपणींच गदा आली. पण दलादिये यांना पहिल्या-पासूनच विद्यार्जनाची विशेष आवड असल्यामुळें त्यांनीं स्वतःच द्रव्यार्जन करून विद्यार्जनाला सुरवात केली. शालेय शिक्षणांत गांवच्या साऱ्या विद्यार्थ्यांत बुद्धिमत्तेची विशेष चमक दाखविल्यामुळें दलादिये यांना उच्च शिक्षणासाठीं विद्यापीठांत प्रवेश करण्याची संधि मिळाली. विद्यापीठांतील डॉक्टरेटच्या परीक्षेमध्यें त्यांनी पहिला नंबर मिळविला व त्यामुळें त्यांना खास शिष्यवृत्ति मिळून विशेष अभ्यासासाठीं परदेशीं जाण्याचाहि योग साधतां आला. या शिष्य-वृत्तीचा फायदा घेऊन रोम येथें एक वर्षभर राहून दलादिये यांनीं इटालियन भाषेचा अभ्यास केला. पण भाषाविषयापेक्षां इतिहासा-कडेच त्यांचा अधिक ओढा असल्यामुळें स्वदेशीं परत आल्यावर त्याच विषयाच्या अभ्यासाला त्यांनीं वाहून घेतलें आणि मुसो-लिनीप्रमाणें या सुमारास कांहीं काल शिक्षकाचेंही काम केलें.

महायुद्धापर्यंत चेंबर्लेन यांच्याप्रमाणेंच दलादिये यांनीं राजकार-णांत प्रवेश केलेला नव्हता. महायुद्धाच्या वेळीं ते एका खेड्यांत शाळामास्तर होते व त्यांची तिशी उलटावयाला एक दोन वर्षें होतीं तर चेंबर्लेन यांची चाळिशी उलटून गेलेली होती. सुखवस्तु घरा-ण्यांत वाढलेल्या चेंबर्लेन यांच्या आयुष्यापेक्षां दलादिये यांचा आयुष्यक्रम फार भिन्न होता. महायुद्धाच्या काळांत चेंबर्लेन हे मंत्रिमंडळांत प्रवेश मिळविण्यासाठीं उमेदवारी करूं लागले होते, तर त्याच वेळीं एडवर्ड दलादिये हे आजच्या त्यांच्या प्रतिस्पर्धी सर्वाधिकाऱ्याप्रमाणेंच रणांगणांवर शत्रूशीं जातीनें लढत होते. महायुद्धाचीं हीं चारीं वर्षें त्यांनीं जवळजवळ खंदकांतच काढलीं

असें म्हणण्यास हरकत नाहीं. या युद्धांत दलादिये हे कॅप्टनच्या हुद्द्यावर होते आणि युद्धांत गाजविलेल्या शौर्याबद्दल अनेक पदकेंही त्यांनीं संपादन केलीं होतीं.

महायुद्धानंतरही त्यांच्या राजकारणी आयुष्याला सुरवात होण्यापूर्वी कांहीं वर्षे गेलीं पण एकदां सुरवात झाल्यावर मंत्रिमंडळांतील अगदीं उच्च स्थानीं पोंचण्यासाठीं त्यांना फार काळ उमेदवारी करावी लागली नाहीं. फ्रेंच पार्लमेंटांत म्हणजे चेंबर ऑफ डेप्यूटीज्मध्यें रॅडिकल सोशॅलिस्ट पक्षाचे सभासद म्हणून निवडून आल्यावर थोडयाच अवधींत वसाहतमंत्री, शिक्षणमंत्री, पब्लिकवर्क्स खात्याचे मंत्री, युद्धमंत्री अशा निरनिराळ्या अधिकारांवर त्यांनीं कामें केलीं. यांपैकीं युद्धमंत्री या नात्यानें त्यांची कामगिरी विशेषच उल्लेखनीय व यशस्वी झाली.

१९३३ सालीं त्यांनी आपलें पाहिलें मंत्रिमंडळ स्थापन केलें. हें त्यांचें मंत्रिमंडळ नऊ महिनेच टिकलें, पण त्यांच्या दुसऱ्या मंत्रिमडळाला एवढेंही आयुष्य लाभलें नाहीं. प्रसिद्ध स्टॅव्हिस्की प्रकरणाच्या वेळीं फ्रान्समध्यें यादवी माजण्याची पाळी आली त्या वेळीं राज्यकारभाराचीं सूत्रें त्यांनीं आपल्या हातीं घेतलीं होतीं. त्यानंतर मॉ. ब्लूम यांच्या सोशॅलिस्ट मंत्रिमंडळांत संरक्षण मंत्रि या नात्याने काम केल्यावर दलादिये यांनीं गेल्या वर्षी पुन्हां एकदां फ्रान्सच्या राज्यनौकेचें सुकाणूं आपल्या हातीं घेतलें. १९३८ सालापासून युरोपियन राजकारणांत उद्भवलेल्या वादळी परिस्थितींत व त्यानंतर सध्यांच्या महायुद्धाच्या आणीबाणीच्या घटकेलाही तें त्यांच्याच हातीं राहूं देण्यांत आलें आहे यावरून फ्रेंच जनतेला व मुत्सद्द्यांनाही दलादिये यांच्या कर्तृत्वाबद्दल किती विश्वास वाटतो याची सहज साक्ष मिळूं शकते.

एडवर्ड दलादिये हे चलाख बुद्धीचे मुत्सद्दी व अनुभवी राज-

कारणपटु आहेत; पण त्यापेक्षांही ते धीरगंभीर प्रकृतीचे शूर व शिस्तप्रिय सैनिक आहेत. त्यांच्या राजकारणांत धिम्मेपणा असला तरी निश्चितता आहे. धैर्य, निश्चयी बाणा व निश्चल वृत्ति हे त्यांचे प्रमुख स्वभावविशेष असून फ्रान्सच्या आजपर्यंतच्या राजकारणांत ह्या गुणांना अनेक वेळां कसोटी लागलेली आहे व प्रत्येक वेळीं ते कसोटीला उतरलेले आहेत.

गेल्या महायुद्धांत क्लेमेंको, ब्रियांद, पॉइंकारे वगैरे राजकारण-धुरंधरांचीं नांवें गाजत होतीं. आज त्यांची जागा ज्यांनीं घेतली आहे त्यांचीं नांवें तितकीं गाजून राहिलेलीं नसलीं तरी फ्रेंच राज-कारणाचीं मुख्य सूत्रें ज्या एडवर्ड दलादिये यांच्या हातीं आहेत त्यांचें कर्तृत्व वरील मुत्सद्द्यांच्या पेक्षां यत्किंचितही कमी नाहीं, हें त्यांच्या आजच्या युद्धाच्या आघाडीवरील कर्तबगारीवरून दिसून येईल.

---

# ३४: अडॉल्फ हिटलर

राशियांत लेनिननें किंवा इटलींत मुसोलिनीनें जशी अभूतपूर्व क्रांति केली तशीच क्रांति जर्मनींत हिटलरनें केली असें म्हणण्यास यत्किंचितहि प्रत्यवाय नाहीं. मुसोलिनी ज्याप्रमाणें थोड्या दिव-सांत इटलीच्या अग्रस्थानीं जाऊन बसला तसाच हिटलरही एकदम मोठा पुरुष झाला. हिटलर हा लेनिनप्रमाणें युगप्रवर्तक नाहीं अगर जगांत त्यानें नवें तत्त्वज्ञान आणलें असेंही नाहीं. पण महायुद्धामुळें सर्वतोपरी उध्वस्त झालेल्या जर्मन राष्ट्रांत नवचैतन्य उत्पन्न करून जर्मनीचें पूर्ववैभव प्रस्थापित करण्याचें त्यानें जें महत्कार्य केलें त्या-मुळें हिटलर हा जर्मनीचा उद्धारकर्ता होय यांत शंका नाहीं. एकादा अगदीं यःकश्चित् मनुष्य, पण अंगीं अलोट कर्तृत्व असल्यास तो

एका प्रचंड राष्ट्राचा सर्व सत्ताधिकारी कसा होऊं शकतो, हें हिटलरच्या चरित्रावरून कोणालाही दिसून येईल.

ॲडाल्फ हिटलर हा आज जर्मनीचा भाग्यविधाता व सर्वसत्ताधिकारी



असला तरी तो जन्मानें जर्मन नाहीं. ऑस्ट्रियन आहे. त्याचा जन्म ऑस्ट्रिया व जर्मनी यांच्या सरहद्दीवरील ब्रुनो या खेड्यांत इ. स. १८९० सालीं झाला. त्याच्या वडिलांनीं शेतकरी, चांभार इत्यादि विविध धंदे करून हिटलरच्या जन्माच्या वेळीं ते सरहद्दीवर एक जकात नाकेदार होते. आपल्या मुलानें आपल्यासारखेंच सरकारी नोकरींत शिरून आपलें आयुष्य घालवावें अशी त्यांची स्वाभाविकच इच्छा होती. म्हणून त्यांनीं अडॉल्फला सरकारी शाळेंत घातलें. पण हिटलरला शाळेंतील अभ्यासाचा विलक्षण तिटकारा असल्यामुळें तो आपल्या आवडीच्या विषयांतच रममाण होत असे. त्याच्या शाळेंत एक इतिहासाचा शिक्षक होता, तो आपल्या वर्गांत जर्मनीच्या वैभवाचें असें सुंदर चित्र उभें करी कीं हिटलर अगदीं देहभान विसरून जात असे. या शिक्षकामुळें हिटलरला जर्मनीबद्दल अत्यंत आदर व आपलेपणा वाटूं लागला. तो जर्मनीलाच आपली मातृभूमि समजूं लागला. त्याला पहिल्यापासूनच

चित्रकलेची विशेष आवड असल्यामुळें तासचे तास तो चित्रे काढीत बसे. सरकारी अधिकारी न होतां आपण मोठे जगप्रसिद्ध चित्रकार व्हावें, मूर्तिकार बनावें, असें त्याला मनापासून वाटत असे. व त्याप्रमाणें त्यानें चित्रकलेच्या अभ्यासाला जारीनें सुरवात केली.

१९०३ सालीं वडील व १९०८ सालीं आई वारल्यानंतर १९०९ सालीं वयाच्या १९ व्या वर्षी अत्यंत निर्धन व पोरक्या अवस्थेंत चरितार्थ चालविण्यासाठीं तो व्हिएन्नाला गेला. चित्रकलेचें जुजबी ज्ञान एवढीच त्याच्याजवळ कर्तृत्वाची शिदोरी होती. उदरनिर्वाहासाठीं भिंती रंगविणें, नांवाच्या पाट्या रंगाविणें इत्यादि क्षुद्र कामें त्याला करावीं लागलीं. यःकश्चित् कामगार-मजूर म्हणून व्हिएन्ना शहरांत त्यानें पांच वर्षें काढली. या ठिकाणी त्याला सामान्य व खालच्या दर्जाच्या लोकांच्या स्थितीची खरी कल्पना आली. समाजांतील ही स्थिति सुधारण्यासाठीं आपण झटलें पाहिजे असें त्यानें याच वेळीं ठरविलें.

१९१२ सालीं ऑस्ट्रियांतील सक्तीची लष्करी नोकरी टाळण्यासाठीं तो तेथून निसटला. व जर्मनींत म्युनिच येथे दाखल झाला. या वेळीं त्याला कांहीं दिवस बेकारावस्थेंत वणवण फिरण्यांत घालवावें लागले. इतक्यांत १९१४ सालीं युद्धाचें रणशिंग फुंकलें जातांच तो ताबडतोब युद्धावर गेला. युद्धामुळे त्याला नोकरी मिळाली, म्हणून महायुद्धाचें त्यानें मनःपूर्वक अभिनंदन केलें व ईश्वराला धन्यवाद दिले.

महायुद्धांत तो अगदीं सामान्य शिपाई होता. युद्धाच्या वेळीं त्याला इकडून तिकडे निरोप पोंचविणाऱ्या निरोप्याचें काम देण्यांत आलें होतें पण तें त्यानें उत्कृष्टपणें बजाविलें. युद्धांत त्याला कार्पोरलचा हुद्दा मिळाला. पण याहून तो वर चढला नाहीं; तथापि लष्करी संघटनेची

विद्या रणांगणावरच त्यानें आत्मसात करून घेतली. लढाईत तो दोनदां जखमी झाला. व त्याला एक सन्मानचिन्हही मिळालें.

महायुद्ध संपल्यावर आपण आपल्या राष्ट्राकरितां कांहीं तरी केलें पाहिजे या गोष्टीची त्याला तीव्र जाणीव झाली. म्युनिचमध्यें असतांना १९१९ च्या मे महिन्यांत मजूर पक्षाच्या एका बैठकीला तो हजर राहिला होता. त्या पक्षांत फक्त सहाच सभासद होते. हिटलरचें वक्तृत्व व उत्साह पाहून सातवा सभासद म्हणून त्याचें नांव नोंदविण्यांत आलें. सबंध जर्मनी आक्रमण करणाऱ्या नाझीपक्षाचा पक्षाच हा मूळारंभ होय. हिटलरच्या नेतृत्वाखालीं या पक्षाचें बळ पहातां पहातां वाढूं लागलें. या पक्षाला नॅशनल सोशॅलिस्ट पार्टी असें नांव देण्यांत आलें. नाझी हें याचेंच रूपांतर होय. पहिल्या दहा महिन्यांत या पक्षांचे सभासद एकशें दहा झाले, एका वर्षांत पांच हजार झाले व १९२२ साल उजाडावयाच्या आंत हिटलर वीस हजार अनुयायांचा पुढारी म्हणून मानला जाऊं लागला. वर्तमानपत्रें, हस्तपत्रकें, सभा इत्यादि विविध साधनांचा उपयोग करून नाझी पक्षानें आपल्या तत्त्वाचा अपरंपार प्रचार केला. महायुद्धामुळें जर्मनीची स्थिति अत्यंत खालावलेली असल्यामुळें व व्हर्सेलिसच्या तहानें जर्मनीचा स्वाभिमान दुखावला गेला असल्यामुळें हिटलरच्या राष्ट्रोद्धारक योजनांना जर्मन जनतेचें पाठबळ मिळाल्यास आश्चर्य काय ? जर्मनींतील मोठमोठे व्यापारी, प्रतिष्ठित पुढारी, वजनदार लष्करी अधिकारी, नामांकित मुत्सद्दी व बडे कारखानदार हिटलरला मिळाल्यामुळें हिटलरचें आसन उत्तरोत्तर बलिष्ठ होत गेल्यास नवल काय ? अवघ्या बारा वर्षांच्या अवधींत आपल्या अचाट कर्तृत्वानें हिटलरनें जर्मन लोकमत इतकें अंकित केलें कीं १३ जानेवारी १९३३ रोजीं हिटलर जर्मनीचा मुख्य प्रधान झाला.

चॅन्सेलर ऊर्फ मुख्य प्रधान होण्यापूर्वी १९३२ सालीं हिटलर

जर्मनीच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीला हिंडेन्बुर्गचा प्रतिस्पर्धी म्हणून उभा राहिला होता, पण हिंडेन्बुर्ग यांच्यापुढें त्याचा टिकाव लागणें शक्य नव्हतें. साठ लक्ष मतांनीं त्याचा पराभव झाला. त्यानंतर त्यानें आपलें सामर्थ्य वाढवून पार्लमेंटमध्यें दणदणीत बहुमत प्रस्थापित केलें व तो चॅन्सेलर झाला. १९३४ साली हिंडेन्बुर्ग मृत्यु पावल्यावर मुख्य प्रधान व अध्यक्ष हे दोन्हीही अधिकार त्यानें स्वतःकडे घेतले व तो जर्मनीचा सर्वाधिकारी झाला व तेव्हांपासून आजतागायत तो एकतंत्री राज्यकारभार चालवीत आहे व जर्मन साम्राज्य वाढविण्याच्या ईर्ष्येनें युरोपांतील राष्ट्रांना दहशत बसवीत आहे. १९३७ ते ३९ या तीन वर्षांच्या अवधींत त्यानें सार, ऑस्ट्रिया, झेकोस्लोव्हाकिया, डँझिग व पोलंड हे प्रदेश गिळंकृत केले असून शेवटच्या दोहोंवरील आक्रमणामुळें आज जगांत महायुद्ध सुरू झालें आहे.

हिटलर ही व्यक्ति आधुनिक इतिहासांत अद्वितीय गणली जाईल यांत वाद नाहीं. त्याच्या मताबद्दल अगर कार्याबद्दल पुष्कळ मतभेद असले तरी त्याच्या अंगीं असामान्य गुण आहेत, हे नाकबूल करतां येणार नाहीं.

हिटलरचें जीवन इतकें पराकाष्ठेचें ध्येयवादी आहे कीं तो पुढेंमागें आपल्या जीविताचा त्याग केल्यावांचूनहि राहणार नाहीं. आपल्या ध्येयासाठीं अंतिम त्याग करण्याची त्याची महत्वाकांक्षा आहे.

हिटलरनें जर्मनीचें पुनरुज्जीवन केलें असलें तरी जर्मनींतील सबंध जनतेच्या उत्कर्षाला पोषक असें त्याचें कार्य नाहीं. त्यामुळें जर्मनीमध्येंही अंतर्गत क्रांतीची लाट केव्हां उसळेल याचा नेम नाहीं. शिवाय जर्मनीच्या साम्राज्याविस्तारामुळें हिटलरला इतर राष्ट्रांचेंही शत्रुत्व पत्करावें लगत आहे. म्हणून हिटलरचें भवितव्य चालू महायुद्धांतच निश्चित होईल असें आज तरी म्हणावयास हरकत नाहीं.

हिटलरचें भवितव्य हें एक कोडें आहे. त्याचें जीवित इतकें चमत्कातिपूर्ण आहे कीं त्याचा अजमास बांधणेंही कठीण आहे. त्याचें व्यक्तिगत जीवन त्याहीपेक्षां गूढ आहे. राजकीय जीवनांत त्यानें जर्मनीचें सर्वस्व पणाला लावलें आहे. आणि जर्मनीपलीकडे त्याला स्वतःला अस्तित्वच नाहीं. जर्मनीच्या साम्राज्यतृष्णेला त्यानें चालना दिली आहे आणि सबंध युरोपखंडांत त्यानें वडवानल पेटविला आहे. यांत जर्मनीची व त्याचीही आहुति पडते कीं काय हें भावी काळच ठरवील.

---

# ३६: जनरल हिंडेन्बुर्ग

१९१४ च्या महायुद्धांत ज्यांनीं असामान्य मर्दुमकी गाजवून आपलें नांव जगभर सुविख्यात केलें त्या थोर वीराग्रणींत जर्मनीचे तत्कालीन सरसेनापति जनरल फॉन पौल हिंडेन्बुर्ग यांचें नांव अग्रस्थानीं बसेल. महायुद्धापूर्वीं हिंडेन्बुर्ग यांचें नांव एक लष्करी अधिकारी यापलीकडे कोणालाहि माहीत नव्हतें; पण महायुद्धांत त्यांनीं जी विजयशाली समरधुरंधरता प्रगट केली त्यामुळेंच त्यांचें नांव सबंध युरोपखंडांत सर्वत्र गाजलें व जर्मन राष्ट्राच्या अध्यक्ष-पदाचा राजमुकुट त्यांच्या मस्तकावर विराजूं लागला. हिंडेन्बुर्ग हे एकंदर नऊ वर्षें लोकसत्ताक जर्मनीचे अध्यक्ष होते.

हिंडेन्बुर्ग यांचा जन्म इ. स. १८४७ च्या सुमारास झाला. लहानपणापासून लष्करी शिक्षणाची आवड असल्यामुळे ते लवकरच लष्करांत शिरले आणि पुढें आपल्या कर्तृत्वानें चढत चढत जर्मनीचे सरसेनापति झाले. महायुद्ध सुरू झालें तेव्हां ते जर्मन लष्करांतून सेवानिवृत्त झालेले होते. या सेवानिवृत्तीचें मुख्य कारण प्रशियाच्या

पूर्व सरहद्दीवरील टानेनबर्ग नांवाच्या जागेंतील दलदल काढून टाकावी, कां राष्ट्ररक्षणाच्या दृष्टीनें राहूं द्यावी, या प्रश्नावर माजी



कैसरशीं त्यांचा मतभेद झाला हें होय. ती दलदल बुजवावी असें कैसरचें मत होतें आणि राहूं द्यावी असा हिंडेन्बुर्ग यांचा अभिप्राय पडला. हिंडेन्बुर्ग हे त्या वेळीं पूर्व प्राशियाच्या सैन्याचे मुख्याधिकारी होते. कैसरनें मतभेदासाठीं त्यांना कामावरून दूर करून पेन्शन दिलें; पण त्यांच्या अभिप्रायाचा मान राखला, कारण कैसर त्या दलदली प्रदेशाच्या वाटेस गेला नाहीं.

पुढें तीनचार वर्षांनीं ४ ऑगस्ट १९१४ रोजीं महायुद्धाला

प्रारंभ झाला आणि २३ सप्टेंबरपर्यंत महायुद्धांत भाग घेण्याची संधि मिळेल असें हिंडेन्बुर्ग यांच्या स्वप्नींही नव्हतें. त्यावेळीं त्यांचें वय ६७ होतें,म्हणजे जवळ जवळ त्यांनीं सत्तरी गांठली होती. महायुद्धाच्या प्रसंगानें मोठमोठालीं दळें हलत आहेत, पण आपल्याला एकाही दळाच्या नेतृत्वाचें भाग्य नाहीं, अशा तऱ्हेच्या विषण्ण विचारांत हिंडेन्बुर्ग असतां पूर्व प्रशियाच्या सैन्याचे सर्वाधिकार त्यांना दिल्याबद्दल कैसरचा हुकूम त्यांच्या हातीं पडला आणि तात्काळ ते निघून गेले. सप्टेंबरच्या अखेरीस रशियन फौजांनीं पूर्व प्रशियांत थोडासा प्रवेश करून कोनिग्जबर्ग वगैरे किल्लेकोट माऱ्याच्या टप्प्यांत आणले होते, त्यामुळें हिंडेन्बुर्ग यांच्यावर हा शह सोडवून टॅनेनबर्गच्या दलदलीचें महत्त्व सिद्ध करण्याची जबाबदारी आली आणि त्यांनीं एका आठवड्याच्या आंत रशियन फौजेचा प्रचंड पराभव करून आपली जबाबदारी शेवटास नेली. हिंडेन्बुर्ग यांच्या या विजयामुळें त्यांचें नांव एकदम सर्वतोमुखीं झालें व ह्या प्रसंगामुळें त्यांनीं जी लोकप्रियता संपादन केली ती मरणघटकेपर्यंत कायम होती.

त्यांच्या लोकप्रियतेचें एक सांगण्यासारखें उदाहरण म्हणजे महायुद्ध चालू असतां त्यांचा पुतळा उभारला गेला हें होय. टॅनेनबर्गनंतर इतरही आघाडीच्या ठिकाणीं त्यांची नेमणूक झाली होती व तेथेंही त्यांनीं असामान्य पराक्रम केला. १९१८ सालीं जर्मनीनें आपला पराजय जाहीर करून जेव्हां युध्द थांबविलें तेव्हांचा प्रसंग अत्यंत आणीबाणीचा होता व हिंडेन्बुर्गसारखा सैनिकांच्या अत्यंत विश्वासाचा व प्रेमादराचा सेनापति जर्मन लष्कराच्या डोक्यावर त्या वेळीं नसता तर पराभव पावलेल्या त्या लष्करानें गोंधळ उडवून दिला असता. परंतु हिंडेन्बुर्ग यांनीं सारें लष्कर रणांगणावरून विजयी लष्कराप्रमाणें अतिशय शिस्तीनें परत आणलें.

महायुद्धानंतर पुनः कांहीं काळ ते अज्ञातवासांत राहिले या काळांत त्यांनीं स्वतःचें आत्मचरित्र लिहून काढलें. नंतर लोकसत्ताक जर्मनीच्या अध्यक्षपदाची जागा जनतेच्या अत्याग्रहास्तव स्वीकारली व वयानें ऐशींची मर्यादा ओलांडली असतांही ते राज्यकारभाराच्या रणांगणांत उतरले. लागोपाठ दोन वेळां त्यांनीं हें अध्यक्षपद भूषविलें व अध्यक्ष असतांनाच त्यांना मृत्यु आला.

हिंडेन्बुर्ग यांचें सारें आयुष्य लष्करांत गेलें असतांही त्यांनीं आयुष्यांतली शेवटचीं दहा वर्षें राजकारणधुरंधर मुत्सद्दी या नात्यानें घालविलीं. तीव्र बुद्धिमत्ता अंगीं नसतांही चिकाटी, शिस्त, साहस, व्यवहारज्ञता, देशभक्ति इत्यादि गुणांमुळें त्यांनीं आपलें कार्य यशस्वी केलें. राष्ट्राच्या चढत्या काळांत देशसेवेकरतां सरसावणारे लोक पुष्कळ असतात. पण राष्ट्राच्या पतितावस्थेंत त्याच्या अभ्युदयाचें बिकट कार्य शिरावर घेण्याची मातब्बरी निराळी असून राष्ट्राच्या वरील दोन्ही अवस्थांमध्यें सारख्या उत्साहानें राष्ट्रसेवेला सादर रहाणारी व्यक्ति या दृष्टीनें जनरल हिंडेन्बुर्ग यांचें चरित्र संस्मरणीय व स्पृहणीय गणलें जाण्याच्या योग्यतेचें ठरल्यावांचून रहाणार नाहीं.

---

## ३७: लेनिन

रशियांतील क्रांतीचा जनक, बोल्शेविक संप्रदायाचा आद्य प्रवर्तक व जगांतील एक लोकोत्तर महापुरुष म्हणून लेनिनचें नांव सर्वत्र आदरपूर्वक उच्चारलें जातें. रशियांत आज जी समाजसत्तावादी राज्यघटना प्रस्थापित झाली आहे तिचें बहुतेक सर्व श्रेय लेनिनकडे जातें. म्हणून लेनिनला नवरशियाचा निर्माता असें यथार्थतेनें म्हणण्यास हरकत नाहीं.

लेनिनचा जन्म रशियांत सिंबुर्स्क गांवीं इ. स. १८७० सालीं




झाला. त्याचें मूळचें नांव ल्व्हाडिमीर उलिच उलिनॉव्ह असें होतें. त्यानें राज्यक्रांतीची चळवळ जोरांत सुरूं केली, तेव्हां सरकारी ससेमिरा चुकविण्याकरितां लेनिन हें टोपणनांव धारण केलें. त्याचें घराणें खानदानीचें होतें पण अलीकडे मोडकळीस आलेलें होतें. त्याचे वडील शिक्षणखात्यांत जिल्हा स्कूल इन्स्पेक्टर होते. लेनिनचें उच्च शिक्षण पीटर्सबर्ग विश्वविद्यालयांत झालें. लहानपणापासूनच त्याला शेतकरीवर्गाबद्दल अनुकंपा वाटत होती. कॉलेजमध्यें प्रवेश केल्यावर तो शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचे विचार करूं लागला, व त्यानें लागलींच चळवळीस प्रारंभ केला. लहानपणापासून त्याच्याभोंवतीं कार्ल मार्क्स या जर्मन पंडिताच्या समाजसत्तावादाचें वातावरण पसरलें असल्यामुळें तो कॉलेजांत असतांनाच या वाङ्मयाचा अभ्यास करूं लागला होता. पुढें लवकरच म्हणजे १८८७ सालीं त्याचा वडील भाऊ निकोलस यास झारचा खून करण्याच्या प्रयत्नाबद्दल फांसावर चढविण्यांत आलें.

आधींच झारशाहीविरुद्ध खवळलेलें लेनिनचें मन भावाच्या

फांशीनें अधिकच भडकलें. त्यानें उघडपणें मजूरपक्षाची चळवळ सुरू केली. त्यानें कामकरी व मजूर वर्गाच्या मनांत कार्ल मार्क्सचीं तत्त्वें बिंबवून पुढील अद्भुत राज्यक्रांतीचें बीज पेरलें. झारशाहीनें त्याच्या ह्या असल्या राजद्रोही चळवळीबद्दल त्यास सैबेरियांत हद्दपार केलें. याच हद्दपारीच्या दिवसांत त्यानें 'रशियामधील भांडवलशाहीचा विकास' हा ग्रंथ लिहिला.

या हद्दपारीनंतर तो पुष्कळ दिवस रशियाच्या बाहेर राहूनच झारशाहीला उलथून पाडणारी क्रांतिकारक चळवळ करीत होता. त्याच्या या चळवळीनें त्यानें रशियांतलि जनतेचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतलें होतें. झारशाहीचेंही त्याच्याकडे इतर पुढाऱ्यापेक्षां अधिक लक्ष लागून राहिलें. पण लेनिननें त्याची पर्वा केली नाहीं. त्याच्यापुढें एकच एक ध्येय होतें कीं, देशांतलि गांजलेल्या उपाशी प्रजेला सुखसमाधान कसें मिळेल? या ध्येयप्राप्तीसाठीं लेनिननें अनेक तुरुंगवास व हद्दपाऱ्या सोसल्या. रशियन क्रांतिकारकांचे तेथील सरकारनें जे हाल केले त्यांचीं वर्णनें वाचलीं असतां रावणराज्य किंवा अलीकडील नादिरशाही फिक्की पडेल, इतके ते भयंकर आहेत. लेनिननें व त्याच्या अनुयायांनीं ह्या दुःखकष्टांस न जुमानतां आपलें कार्य अप्रतिहतपणें चालविलें होतें.

परंतु त्याच्या कार्याला खरें यश इ. स. १९१७ सालअखेरपर्यंत मिळालें नव्हतें. प्रजेला गांजणाऱ्या झारशाहीचा नायनाट एवढाच कांहीं लेनिनप्रभृतींचा कार्यक्रम नव्हता. खरा कार्यक्रम तर झारशाही उलथून पाडल्यानंतरचाच होता. त्या वेळीं केरेन्स्की प्रभृति पहिल्या क्रांतीच्या पुढाऱ्यांनीं तात्पुरतें सरकार स्थापन करून लष्करशाही राज्यकारभार चालविला होता. तो लेनिन व त्याचे अनुयायी जे स्टॉलिन, ट्रॉट्स्की वगैरेंनाही मान्य नव्हता. त्यामुळें या दोघांत झटापट होऊन देशांत शांतता व सुबत्ता प्रस्थापित करण्याच्या

सद्बुद्धीनें लेनिननें केरेन्स्कीचें उच्चाटन केलें व रशियांत खरेंखुरें बॉल्शेव्हिक राज्य स्थापन केलें. ही गोष्ट ७ नोव्हेंबर १९१७ रोजीं घडली. हा दिवस रशियाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिण्याजोगा मानला जातो. कारण याच दिवशीं रशियांतील मुलेंबाळें, स्त्रिया, शेतकरी व कामकरी यांच्या सुखासमाधानाचा पाया घातला गेला.

अधिकारसूत्रें हातीं आल्याबरोबर पहिली गोष्ट लेनिनपक्षानें केली ती ही कीं बोल्शेव्हिक राज्यपद्धतीला कसून विरोध करणारे, इतकेंच नव्हे तर तिचे कट्टे शत्रू असणारे असे सर्व लोक हद्दपार केले किंवा बाजूस सारले. इ. १९१७ च्या नोव्हेंबरच्या दोन तारखेपासून १२ तारखेपर्यंत बोल्शेविकांनीं आपल्या मार्गांतील सर्व लहानमोठे कांटे दूर केले, व असें करतांना त्यांनीं राजनीतीच्या तत्त्वाप्रमाणें कोणालाच दयामाया दाखविली नाहीं. याच शत्रुसत्रांत झार व झारीना यांची सहकुटुंब सहपरिवारें आहुति दिली गेली. या दहा दिवसांना भांडवली राष्ट्रांनीं ‘रावणराज्य’ अशी संज्ञा देऊन लेनिनला राक्षस म्हटलें आहे.

याप्रमाणें शत्रूंचा नायनाट झाल्यावर निष्कंटक परिस्थिति प्राप्त झालेली पाहून लेनिननें देशांतील आर्थिक परिस्थिति सुधारण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यानें सर्व जमीनदार व भांडवलवाले यांच्या जमिनी व चारितार्थापेक्षां अधिक अशी मालमत्ता हिसकावून घेऊन ती राष्ट्राच्या मालकीची आहे. असें जाहीर केलें. नंतर सर्व शेतकरी व मजूरवर्ग यांच्यामध्यें ज्याच्या त्याच्या गरजेप्रमाणें ती सारी जमीन वांटून दिली. रशियाची आर्थिक परिस्थिति सुधारण्यासाठीं लेनिननें ‘नवी आर्थिक योजना’ आंखली व तीच पुढें कित्येक दिवस अंमलांत होती. लेनिननें केलेलें कार्य स्टॉलिननें सध्यां पुढे चालविलें आहे. वयाच्या त्रेपन्नाच्या वर्षी ता. २२-१-१९२४ रोजीं

तो मृत्यु पावला. मृत्युपूर्वी तो बरेच दिवस आजारी होता. आपण आतां जगत नाहीं, हें पाहून त्यानें एक मृत्युपत्र लिहून ठेवलें व आपल्या मागून बोल्शेव्हिकांचें पुढारीपण स्टॉलिनकडे जावें असें त्यानें ठरविलें. लेनिनची बायको क्रूपस्काया इनें लेनिनच्या बरोबरीनें शैक्षणिक व इतर चळवळींत महत्त्वाचा भाग घेतला होता.

---

## ३८: लिऑन ट्रॉट्स्की

आजचा क्रांतिशिखरावर विराजमान झालेला रशिया निर्माण करण्यांत ज्या महापुरुषांचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत त्यांत लेनिन, स्टॉलिन इत्यादिकांच्या बरोबर लिऑन ट्रॉट्स्की याचाही महत्त्वाचा भाग आहे हें विसरून चालणार नाहीं. ट्रॉट्स्की हा लेनिनचा उजवा हात होता व त्यानें क्रांतीच्या काळांत संस्मरणीय कामगिरी केलेली आहे. रशियांत सोव्हिएट राज्य प्रस्थापित झाल्यावर



स्टॉलिननें आपल्याकडे सर्वाधिकार घेतले व राज्यकारभारांत मतभेद झाल्यावरून स्टॉलिननें ट्रॉट्स्कीला हद्दपार केलें; अजूनही तो राशियाबाहेर निर्वासितावस्थेंत आपलें आयुष्य कंठीत आहे. मध्य-

आशिया, तुर्कस्थान, प्रिंकिपो इत्यादि ठिकाणांनंतर सध्यां त्याला मेक्सिकोंत कालक्रमणा करावी लागत आहे. अशा या हद्‌पार स्वातंत्र्यवीराचें चरित्र अनेक दृष्टीनें स्फूर्तिदायक होईल.

इ. स. १८७९ सालीं एका श्रीमान जमीनदार कुटुंबांत ट्रॉट्स्कीचा जन्म झाला, त्याचें सबंध नांव लिऑन डेव्हिडोविच ब्रॉन्स्टीन असें होतें, पण लेनिनप्रमाणेच त्यानें ट्रॉट्स्की हें टोपण नांव धारण केलें. तो रशियन नसून ज्यू आहे. शेतांत तो वाटेल तसा भटकत फिरत असे व शेतकऱ्यांत मिसळत असे. त्यामुळें त्याला शेतकरी व मजूर यांच्या कष्टकारक रहाणीचा प्रत्यक्ष परिचय झाला.

वयाच्या नवव्या वर्षीं हायस्कूलचें शिक्षण घेण्यासाठीं त्याला ओडेसा येथें पाठविण्यांत आलें. या शाळेंत त्याची बुद्धिमत्ता सर्वांहून वरचढ दिसून आली. कोणत्याहि परीक्षेंतील पहिला नंबर त्यानें चुकविला नाहीं. ओडेसाहून तो निकोलाय गांवीं गेला. हें शहर उद्योगधंदे व व्यापार यांसाठीं मोठें नांवाजलेले होतें. तेथें जहाजें बांधण्याचा धंदा फार मोठ्या प्रमाणावर चालत असे. ट्रॉट्स्कीला ह्या आजूबाजूच्या विविध वातावरणाचा अतिशय फायदा झाला. तेथें त्याचा क्रांतिकारक वाङ्मयाशीं व क्रांतिकारकांशीं परिचय झाला. त्याच्याबरोबर आणखी कांहीं मुलांनीं ह्या वाङ्मयाचा प्रसार करण्यास सुरवात केली. त्यासाठीं त्यानें ' साउथ रशियन वर्कर्स युनियन ' ही संस्था स्थापन केली. या संस्थेच्या चळवळीमुळें ट्रॉट्स्कीसह प्रमुख कार्यकर्त्यांना अटक करण्यांत आली. ही गोष्ट १८९८ च्या जानेवारींत घडली. ट्रॉट्स्कीचें नांव क्रांतिकारक म्हणून ज्या वेळीं प्रसिद्ध झालें त्या वेळीं तो फक्त १८ वर्षांचा होता.

त्याची चौकशी होईपर्यंत त्याला दोन वर्षें खडतर तुरुंगवासांत काढावीं लागलीं. पुढें थोडथा सवलती मिळाल्यावर त्यानें मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचें चांगलें अध्ययन केलें. पुढें त्याची रवानगी

सैबेरियांत झाली. तेथें त्याला चार वर्षें काढावीं लागलीं. त्याची ही हद्दपारी भयंकर हालअपेष्टांनीं व यातनांनीं भरलेली होती. १९०२ मध्यें सैबेरियांतून तो निसटला व त्यानें मोठ्या धाडसाचा प्रयत्न करून लंडन गांठलें.

या वेळीं रशियांत क्रांतिकारक चळवळ बऱ्याच मोठ्या प्रमाणांत फैलावत चालली होती आणि लेनिनचें नांव बरेंच प्रसिद्ध झालें होतें. लंडनला 'इस्क्रा' नांवाचें एक वर्तमानपत्र रशियांतील क्रांतिकारकांच्या कार्याचा प्रचार करण्यासाठीं लेनिन चालवीत होता. लेनिननें मोठ्या प्रेमानें त्याचें स्वागत केलें व त्याला आपल्या येथें एक वर्षभर ठेवून घेतलें. पुढें त्याच्या मतांत फरक पडूं लागला. लंडनमध्यें १९०२ सालीं सोशल डेमोक्रॅटिक पार्टीची सभा होऊन कायमचे दोन तट झाले. लेनिनशीं त्याचा मतभेद झाला. पण त्यामुळें त्याच्या पक्षाच्या लोकांवर अटक होण्याची पाळी आली. ट्रॉट्स्की कसाबसा निसटला व त्यानें फिनलंड गांठलें.

१९०७ ते १९१७ पर्यंत म्हणजे झारशाहीचा निःपात होईपर्यंत तो परागंदा होता. महायुद्धापूर्वी तो व्हिएन्नाला होता, पण आंतरराष्ट्रीय शाश्वत क्रांतीच्या तत्त्वज्ञानामुळें ऑस्ट्रिया, फ्रान्स, जर्मनी, स्पेन इत्यादि देशांतून त्याची हकालपट्टी झाल्यावर तो अमेरिकेंत गेला. तेथेहि त्याचें प्रचारकार्य चालूंच होतें. न्यू यॉर्कला आल्यावर दोन महिन्यांतच झारशाही धुळीस मिळाल्याची बातमी त्याच्या कानांवर आली व तो अनेक संकटांनंतर रशियांत पोंचला.

ट्रॉट्स्कीची आधींच प्रसिद्धि असल्यामुळें तो पेट्रोग्राड सोव्हिएटचा अध्यक्ष झाला व पुढें त्यानें सर्व बोल्शेव्हिक सैन्याचें आधिपत्य स्वीकारलें. २४ ऑक्टोबर रोजीं ट्रॉट्स्कीनें आपल्या

सैन्याच्या सहाय्यानें सर्व सरकारी संस्था आपल्या ताब्यांत घेतल्या व बोल्शेव्हिक राज्य झालें अशी द्वाही फिरविली. या नवीन राज्य-घटनेंत लेनिनला अध्यक्ष निवडलें आणि ट्रॉट्स्की परराष्ट्रमंत्री झाला, पुढें त्यानें सर्व युद्धखातें आपल्या हातीं घेतलें.

१९२४ सालीं लेनिन मृत्यु पावला व त्याच्यामागें ट्रॉट्स्की हाच रशियाचा प्रमुख होणार असें स्पष्ट दिसत होतें; पण लेनिनचा डावा हात जो स्टॉलिन यानें गुप्त व्यूह रचून ट्रॉट्स्कीला हाणून पाडलें व सर्व अधिकार आपल्या हातीं घेतले आणि तेव्हांपासून स्टॉलिन हा रशियाचा प्रमुख सर्वसत्ताधारी आहे व ट्रॉट्स्की दाक्षिण अमेरिकेंत आपले हद्दपारीचे दिवस मोजीत आहे.

---

# ३९: स्टॉलिन

रशियाचा आजचा एकमेव सूत्रचालक व सर्वाधिकारी म्हणून स्टॉलिनची जगभर ख्याति आहे. युरोपांत सर्वाधिकाऱ्यांचें युग सुरू करण्यांत स्टॉलिननें अग्रस्थान मिळविलें असून तो आपल्या अरेरावीपणानें रशियांत सुलतानशाही गाजवीत आहे, असें म्हट-ल्यास मुळींच हरकत नाहीं. स्टॉलिनच्या सध्यांच्या राजवटीमुळें रशियांत आज मजुरांचें राज्य आहे की साम्राज्यशाहीचा अंमल चालू आहे. याचा संशय उत्पन्न झाल्याशिवाय रहात नाहीं. स्टॉलिन अचाट कर्तृत्वशाली आहे ही गोष्ट सर्वमान्य आहे व त्याच दृष्टीनें त्याचें चरित्र मननीय वाटेल.

स्टॉलिनचें स्टॉलिन हें खरें नांव नाहीं. लेनिन व ट्रॉट्स्की व यांच्या



प्रमाणेंच तेंहि टोपणनांव आहे. स्टॉलिनचें खरें नांव जोसेफ विसारिओनोविच जुगाविली आहे. असें म्हणतात कीं, जुगाविली याची लोखंडासारखी देहयष्टि आणि दृढनिश्चयी धाडसी स्वभाव पाहून लेनिननें त्याचें नांव मोठ्या आवडीनें 'स्टॉलिन' असें ठेवलें. रशियन भाषेंत स्टॉलिन शब्दाचा अर्थ पोलाद असा आहे.

लेनिनचा पट्टशिष्य व ट्रॉट्स्कीचा विरोधी गुरुबंधु जोसेफ. स्टॉलिन याचा जन्म इ. स. १८७९ मध्यें कुटेस नांवाच्या प्रांतांत एका शेतकऱ्याच्या कुळांत झाला. लेनिन हा जातीनें स्लाव, ट्रॉट्स्की

ज्यू तसा स्टॉलिन हा अस्सल रशियन नसून जॉर्जियन आहे. स्टॉलिनच्या बापाची इच्छा जोसेफनें धर्मशास्त्र शिकून पाद्री व्हावे अशी होती. पण भवितव्यता कांहीं निराळीच होती.

स्टॉलिनच्या गुरुजींना या मुलामध्यें कांहीं निराळेंच पाणी दिसलें व ते त्याला इतके भ्याले कीं, त्यांनीं स्टॉलिनची चर्चशाळेंतून लवकरच हकालपट्टी करून टाकली. १९०१ सालीं तो क्रांतिकारकांना मिळाला व त्यांच्या लंडन व स्टॉकहोम येथील परिषदांना हजर राहिला. यानंतर झारचे पोलिस त्याच्या मागें लागले. १९०१ सालापासून तों १९१७ सालापर्यंत त्याला १२ वेळ कैद करण्यांत आलें, तुरुंगांत टाकण्यांत आलें व हद्दपारहि करण्यांत आले. पण विशेष हें कीं स्टॉलिन प्रत्येक वेळां तुरुंगांतून पळून जाई. झारच्या पोलिसांना त्यानें वेळोवेळीं अशा तुरी दिल्या कीं त्यांची बुद्धि कुंठित होत असे. अखेरीस १९१७ सालीं तो मिलिटरी रेव्होल्यूशनरी कमिटींत एक प्रमुख अंमलदार झाला. केरेन्स्कीचा पराभव करून क्रेमलीन व पेट्रोग्राड हस्तगत करण्यांत व अखेर बोल्शेविक सत्ता स्थापन करण्यांत लेनिनला ट्रॉट्स्कीइतकीच स्टॉलिनची मदत झाली.

१९१८ ते २२ पर्यंत स्टॉलिन हा कम्यूनिस्ट पक्षांत कोणीच नव्हता. त्याला कोणतेंच महत्वाचें स्थान नव्हतें. पण स्टॉलिनचा क्रांतिकारकांशीं पहिल्यापासून दृढ संबंध असे व तो निग्रही होता म्हणून १९१७ सालीं केरेन्स्की विरुद्ध जे सात जणांचें मंडळ काढण्यांत आले त्यांत त्याला घेतलें होतें. दिलेले हुकूम उत्तम प्रकारें पाळण्यांत त्याचा हातखंडा असल्यामुळें लेनिन त्याला आपला मदतगार समजे. पण स्टॉलिन व इतर बोल्शेविक पुढारी यांच्यांत पहिल्यापासून भिन्नपणा किंबहुना शत्रुत्व असे. हे पुढारी त्याला दुय्यम किंवा तिय्यम दर्जाचे समजत. लेनिननें तर मरतांना याला जनरल

सेक्रेटरीच्या जागेवरून काढून टाका व त्याच्याशीं संबंध ठेवूं नका असें बजावलें होतें.

लेनिनच्या मृत्यूच्या आधीं दोन तीन वर्षें स्टॉलिननें आपले सर्व पुढचे बेत आखून ठेवले होते. त्यानें आपल्या अनुयायांची भरती मध्यवर्ती मंडळींत केली व सभासदांची संख्याही वाढविली. या नंतर त्यानें जी परंपरा सुरू केली ती अशी. लेनिननें न्यू एकॉनॉमिक पॉलिसी ऊर्फ नवी आर्थिक योजना जी काढली होती तिच्यामुळें लोकांना खाजगी व्यापार करण्यास परवानगी मिळाली. त्यामुळें लोक संतुष्ट झाले. पूर्वींपेक्षां ही स्थिति अधिक सुखकारक होती. पण लेनिननें हें धोरण मर्यादित काळापुरतेंच ठेवलें होतें. लोकांनाही या धोरणांत बदल व्हावा असें वाटेना. पण ट्रॉट्स्की हा कडवा तत्त्वनिष्ठ. त्यानें स्टॉलिनला अनेक प्रकारें तत्त्वाची कांस न सोडण्यास सांगितलें. लष्करी वृत्तीचा कम्यूनिझम सुरू केला पाहिजे असें तो म्हणे. स्टॉलिननें तें ऐकलें नाहीं. बहुमत स्टॉलिनचें झालें. कम्युनिस्ट पक्षांत दुफळी झाली व लेनिनच्या मृत्यूनंतर हें भांडण हातघाईवर आलें. या वेळीं स्टॉलिननें आपल्या हिकमतीची कमाल करून ट्रॉट्स्कीची कम्युनिस्ट पक्षांतून हकालपट्टी केली व अखेर त्याला हद्दपार केलें.

स्टॉलिन हा एकाद्या वाफेच्या रूळाप्रमाणें आहे. वाफेचा रूळ ओबडधोबड, मंदगति असा असतो. तो स्थिर, कर्दनकाळाप्रमाणें निष्ठुर आणि त्याच्या खालीं येईल त्याची सपाट दामटी वळाविण्या-इतका भक्कम असतो. स्टॉलिन हा अंगापिंडानें भरगच्च आहे व त्याची शक्ति वाफेच्या रूळाप्रमाणें भक्कम व दडपणारी आहे. स्टॉलिन हा मोठा बुद्धिवान क्रांतिकारक आहे असें नाहीं. तो घुम्या असला तरी अत्यंत युक्तिवान् व कावेबाज आहे. दुसऱ्यांना आपल्या कह्यांत ठेवून अगर आपल्या शत्रूंना नेस्तनाबूद करून आपला बरचष्मा

कसा प्रस्थापित करावा हें स्टॉलिनला पक्कें माहीत आहे आणि म्हणूनच आज त्याच्या हातीं रशियाचीं सर्व सूत्रें आहेत.

रशियांत आज स्टॉलिन म्हणजे अत्यंत प्रबळ अशी शक्ति आहे. आपण अत्यंत हुशार, हिकमती व कारस्थानी आहोंत असें त्यानें सिद्ध केलें आहे. अगदीं सामान्य दर्जापासून तों अगदीं श्रेष्ठ दर्जापर्यंत वर चढत जाणें म्हणजे लहानसहान गोष्ट नाहीं. त्याच्या विरुद्ध पक्षांत अनेक बुद्धिवान लोक होते ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे त्याचें घटनाचातुर्य कळून येतें. ट्रॉट्स्की, झिनोव्हिफ्,कामानीव्ह, बुखारिन्, रॉयकॉफ वगैरे पुढारी बुद्धिमत्तेनें व अनुभवानें त्याच्यापेक्षां फारच श्रेष्ठ दर्जाचे होते. पण ते आपापसांत झगडत राहिले आणि स्टॉलिनने त्याच्या झगडण्याचा फायदा घेऊन उच्च स्थान मिळविलें. स्टॉलिनच्या अंगीं राजकारणांतील डावपेंच खेळण्याची विलक्षण शक्ति आहे आणि तो प्रतिपक्षाचा अत्यंत क्रूरपणें विध्वंस करून टाकतो. या दोन गोष्टींमुळेंच स्टॉलिन आज रशियांत सर्वाधिकारशाही गाजवीत आहे.

---

# ४०: डी व्हॅलेरा

आजच्या लोकसत्ताक आयर्लंडचा लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून डी व्हॅलेरा हे जगभर सुप्रसिद्ध असले तरी धुरंधर मुत्सद्दी व प्रभावशाली पुढारी या नात्यांनीं त्यांनी आपलें नांव चिरस्थायी करून ठेवलें आहे. त्यांच्याच विश्वप्रयत्नांनीं आयर्लंडला आजचा उच्च दर्जा प्राप्त झाला आहे, व त्यांच्याच उज्ज्वल कारकीर्दींत आयर्लंड आज एवढ्या वैभवास चढला आहे. आयर्लंडचा स्वातंत्र्यवीर म्हणून डी व्हॅलेराचा मोठ्या आदरानें सर्वत्र उच्चार केला जाईल यांत शंका नाहीं.

आयर्लंडचा सुप्रसिद्ध देशभक्त व आयरिश फ्रीस्टेटचा आजचा



अध्यक्ष इमॉन डी व्हॅलेरा हा जन्मानें आयरिश नाहीं. हिटलर, केमालपाशा, व स्टॉलिन यांच्याप्रमाणेंच स्वतःच्या देशांत त्याचा जन्म झालेला नाहीं. डी व्हॅलेरा याचा जन्म १४ ऑक्टोबर १८८२ रोजीं अमेरिकेंत न्यू यॉर्क येथें झाला. त्याचे वडील स्पॅनिश होते, पण आई आयरिश होती. त्याच्या वयाच्या दुसरे वर्षींच तो पितृहीन झाला, त्यामुळें त्याच्या आईनें त्याचा सांभाळ करण्यासाठीं आयर्लंडांत आपल्या एका नातेवाइकाकडे त्याला पाठवून दिला. हा नातेवाईक लिमरिक परगण्यांत ब्रुरी या गांवीं रहात असून त्याचें नांव पेट्रिक कॅरोल असें होतें. इमॉन वयांत येईपर्यंत कॅरोलनें त्याचें उत्तम प्रकारें परिपालन केलें. इमॉनचें सर्व बालपण ब्रुरी येथें गेल्यामुळें तो पक्का आयरिश बनला. त्याचें उच्च शिक्षण डब्लिन येथें होऊन १९०१ सालीं त्यानें रॉयल युनिव्हर्सिटींत गणित विषयांत शिष्यवृत्ति संपादन केली. बी. ए. झाल्यावर डब्लिनच्या कॉलेजांत तो कांहीं दिवस गणिताचा अध्यापक होता. १९०४ सालीं बी. एस्सी. झाल्यावर त्यानें शाळाखात्यांत नोकरी मिळवण्याचा प्रयत्न केला. त्यानें नॅशनल स्कूल्स् इन्स्पेक्टरच्या जागेसाठीं अर्ज केला, पण तो फेटाळला गेला.

पुढें पोस्ट ऑफिसांत त्यानें नोकरीसाठीं प्रयत्न केले, पण तेथेंही त्याची डाळ शिजली नाहीं. या वेळीं डी व्हॅलेराच्या मनांत राष्ट्रीय विचारांचीं बीजें उत्पन्न झालीं नव्हतीं. सरकारी खात्यांत बहुमानाची व मोठ्या हुद्द्याची जागा मिळवावी अशीच त्याची महत्त्वाकांक्षा होती.

सरकारी खात्यांत नोकरी मिळत नाहीं, हें पहातांच डी व्हॅलेरा एका शाळेंत गणिताचा शिक्षक बनला. पुढें तो निरनिराळ्या चळवळींत भाग घेऊं लागला. १९१३सालीं आयरिश स्वयंसेवक–दलांत तो दाखल झाला. पण त्याच्या अंगची राष्ट्रीयत्वाची तेजस्वी चमक १९१६ सालच्या ईस्टरमधील बंडाळींतच दिसून आली.

या दिवशीं सकाळीं आयरिश रिपब्लिकन पक्षाचे सूत्रचालक व सिनफेन पुढारी मॅकनील व पिअर्स यांनीं डब्लिन शहरांत आयरिश लोकसत्तेची द्वाही फिरवून बंडाचा इशारा दिला. या बंडांत डी व्हॅलेरा यानें चकमकीच्या अग्रभागीं मोठ्या प्रामुख्यानें भाग घेऊन आपल्या धाडसी वृत्तीची चुणुक दाखविली. या अटीतटीच्या सामन्यांत शेवटीं त्याला हार खावी लागली. पुढें ब्रिटिश लष्करी कोर्टापुढें चौकशी होऊन बंडांत सशस्त्र भाग घेतल्याच्या आरोपावरून त्याला फांशीची शिक्षा फर्मावण्यांत आली. पण तो जन्मानें अमेरिकन असल्याचें कळल्यावरून फांशीच्या शिक्षेचें जन्मठेपेमध्यें रूपांतर करण्यांत आलें. ही शिक्षा भोगण्यासाठीं त्याला इंग्लंडांतील एका तुरुंगांत रवाना केलें. यानंतर लवकरच ब्रिटिश पार्लमेंटांतील एका आयरिश सभासदाचा मृत्यु घडून आला नसता तर डी व्हॅलेराला किती दिवस तुरुंगवासांत आपलें जीवन कंठावें लागलें असतें कोण जाणें ! या सभासदाच्या जागेसाठीं उभे रहाण्याकरितां आयरिश रिपब्लिकन पक्षानें डी व्हॅलेरा याची निवड केली. त्यामुळें ७ जून १९१७ रोजीं सरकारला डी व्हॅलेराला सोडावें लागलें. या निवडणु-

कींत डी व्हॅलेरा प्रचंड बहुमतानें निवडून आला.पण त्यानें पार्लमेंट-मध्यें बसण्याचें नाकारले व यापुढें आपण सिनफेन चळवळीचा प्रसार करणार म्हणून जाहीर केलें. त्यानें आपलें प्रचारकार्य इतक्या जारीनें व धूमधडाक्यानें चालविलें कीं ब्रिटिश सरकारला त्याच्या या चळवळीकडे विशेष लक्ष देणें भाग पडलें.

अखेर सरकारनें त्याला १९१७ सालीं अटक केली. पण अटक होण्यापूर्वी सिनफेन पक्षानें त्याला आयरिश रिपब्लिकन पार्टीचा अध्यक्ष म्हणून निवडले. डी व्हॅलेराला मिळलेला हा मान म्हणजे आयरिश लोकांच्या दृष्टीनें लोकसत्ताक आयर्लंडच्या अध्यक्षपदाच्या मानाइतकाच श्रेष्ठ आहे.

१९१८ च्या मे महिन्यांत डी व्हॅलेरा आपल्या सिनफेन साथीदारांसह पुन्हां पकडला गेला व त्याची रवानगी इंग्लंडमधील लिंकन तुरुंगांत करण्यांत आली. यानंतर थोड्याच दिवसांनीं महा-युद्ध संपलें व लवकरच ब्रिटिश पार्लमेंटच्या निवडणुका झाल्या. यानंतर दोनच महिन्यांनीं लिंकन तुरुंगांत खितपत पडलेले आयरिश देशभक्त व सिनफेन पुढारी तुरुंगांतून फरारी झाले. या फरारी कैद्यांत डी व्हॅलेरा अग्रस्थानीं होता. या भयंकर धाडसी कृत्यामुळें जिकडेतिकडे खूप खळबळ उडाली व त्याला पकडण्यासाठीं सरकारनें कमालीचे प्रयत्न केले,पण त्यांना दाद न देतां डी व्हॅलेरा आयर्लंड-मध्यें येऊन दाखल झाला. पुढें अमेरिकेशीं संगनमत करून ब्रिटिश सरकारला शह देण्यासाठीं जून १९१९ मध्यें त्यानें एकदम अमेरिकेस प्रयाण केलें.त्याला अमेरिकेस जाण्याची मनाई करण्यांत आली होती, पण पासपोर्टशिवाय गुप्त रीतीनें त्यानें अमेरिकेंत पाऊल टाकलें. अमेरिकेंत त्याच्या चळवळीला यश आलें नाहीं,म्हणून १९२० च्या नाताळांत तो गुप्तपणें जसा अमेरिकेस गेला तसाच तो नकळत

१९२१ मध्यें आयर्लंड व इंग्लंड यांच्यामध्यें तहनामा झाल्यावर स्वदेशीं परत आला. त्यानंतर नॅशनल युनिव्हर्सिटीचा चॅन्सेलर म्हणून त्याची निवडणूक झाली. पुन्हां १९२३ च्या ऑगस्टांत त्याच्यावर कारागृहवासाचा प्रसंग आला. पुढील सालीं त्याची मुक्तता झाली न झाली तोंच अल्स्टर सरकारनें त्याला पकडलें. पण त्याची लौकरच सुटका झाली. तेव्हांपासून मात्र आजतागायत त्याच्यावर बंदिवासाचा प्रसंग आला नाहीं. १९२३ ते ३२ पर्यंत आयर्लंडांत बरीच यादवी माजली, पण अखेर १९३२ सालीं डी व्हॅलेराच्या फिएन्ना फेल या पक्षानें आयर्लंडच्या पार्लमेंटमध्यें—डेल आयरेन मध्यें-संख्याबळ मिळविलें व १९३२ सालच्या एप्रिल महिन्यांत तो आयरिश फ्री स्टेटचा अध्यक्ष म्हणून निवडून आला. आणि या उच्च स्थानीं आल्यापासून त्याच्या कारकीर्दीत आयर्लंडचा उत्तरोत्तर उत्कर्षच होत गेला आहे.

डी व्हॅलेरा याचें आयुष्य अद्भुतरम्य प्रसंगांनीं भरलेलें आहे. तो १९३२ सालीं लोकसत्ताक आयर्लंडचा अध्यक्ष म्हणून निवडून आला हीसुद्धां त्याच्या आयुष्यांतील एक अद्भुतरम्य घटनाच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. फांशीची शिक्षा झालेला पण जन्मठेपीवर सुटलेला व चारपांच वेळां तुरुंगाच्या वाऱ्या करून आलेला बंडखोर आयर्लंडचा मूर्धाभिषिक्त अध्यक्ष होतो ही घटना रम्याद्भुत नाहीं काय? गणिताच्या बाबतींत त्याची बुद्धिमत्ता अगदीं वरच्या दर्जाची असून ज्या कार्यांत तो आपलें मन घालतो तें पार पाडण्यासाठीं अटोकाट मेहनत करतो. अखंड कार्यनिष्ठा, निर्भयता व धडाडी हे त्याचे गुण वाखाणण्यासारखे आहेत आणि याच गुणांच्या जोरावर अध्यक्ष झाल्याबरोबर डी व्हॅलेरा यानें ब्रिटिश गव्हर्नर—जनरलची जागा रद्द केली, राज-

निष्ठेची शपथ काढून टाकली व ब्रिटिश सरकारला दर वर्षी देण्यांत येणारी वार्षिक खंडणी बंद करून टाकली. डी व्हॅलेरा यानें केलेलें हें कार्य क्रांतिकारक आहे हें सांगणें नकोच.

## ४१: ना. श्रीनिवासशास्त्री

ना. गोखले यांच्या पुरस्कारानें व स्फूर्तीनें जो राजकीय मतपंथ



प्रस्थापित झाला आहे त्या प्रागतिक पक्षाचे ना. श्रीनिवासशास्त्री हे आज अध्वर्यु आहेत, इतकेंच नव्हे तर त्या पक्षाचे ते प्रमुख आधारस्तंभ आहेत. राजकारणशास्त्राचा सखोल व्यासंग, उच्च ध्येयवाद, बुद्धिप्रधान विचारसरणी व उदात्त चारित्र्य या गुणांचा मूर्तिमंत आदर्श म्हणून ना. शास्त्री यांच्याकडे अंगुलीनिर्देश करावयाला हरकत नाहीं. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या कीर्तीला शोभेसा हा त्यांचा आदर्श अनुयायी आहे.

श्रीनिवासशास्त्री यांचा जन्म २४ सप्टेंबर १८६९ रोजीं उच्च ब्राह्मणकुळांत झाला. म्हणजे महात्मा गांधीपेक्षां ते अवघ्या ८

दिवसांनीं वडील आहेत. लहानपणीं त्यांची प्रकृति बरीच अशक्त होती, पण त्यांची बुद्धिमत्ता पहिल्यापासूनच प्रखर होती. शाळा-कॉलेजांत त्यांनीं जरी प्रत्येक वेळीं पहिला नंबर मिळविला नाहीं तरी बुद्धिमान विद्यार्थ्यांत त्यांची गणना होत होती. बी. ए. झाल्यावर ते शिक्षणखात्यांत शिरले व साध्या मास्तराचे चढत चढत हेड-मास्तर झाले. त्यांच्या नोकरींतलें सर्वोच्च शिखर त्यांनीं गांठलें होतें व ह्या चाकोरींतल्या आयुष्यक्रमाला त्यांनी क्रांतिकारक वळण दिलें नसतें तर हिंदुस्थानाला एका मोठ्या मुत्सद्द्याची प्राप्ति झाली नसती. ना. गोखले यांनीं १९०५ सालीं स्थापन केलेल्या भारत-सेवक समाजाला ते येऊन मिळाले व देशसेवेप्रीत्यर्थ आपलें आयुष्य वहाण्याचा त्यांनी कृतनिश्चय केला.

थोड्याच अवधींत त्यांनीं ना. गोखल्यांच्या तालमींत इतकें उत्कृष्ट कार्य केलें कीं, गोखल्यांच्या मृत्यूनंतर भारतसेवक समाजाचे अध्यक्ष म्हणून त्यांचीच एकमतानें नेमणूक झाली. पुढें ते लेजि-स्लेटिव्ह असेंब्लींत गेले व तेथें त्यांनीं आपल्या परिणामकारक वक्तृत्वानें सर्वांचीं मनें आकर्षण करून घेतलीं. शास्त्री हे उत्कृष्ट वक्ते आहेत. जरूर तेथें सरकारशीं सहकार्य असें त्यांचें धोरण असले तरी रौलाट ॲक्टासंबंधी भाषण करतांना ना. शास्त्री यांनीं सरकारवर इतकी प्रखर टीका केली की शास्त्रीबुवांच्या अंगांतही थोडा जहालपणा आहे याची लोकांना जाणीव झाली. त्यांची टीका सद्बुद्धीची व प्रामाणिकपणाची असल्यामुळे लोकपक्षाप्रमाणें सर-कारलाही त्यांच्याबद्दल आदर वाटतो.

आणि या आदरबुद्धीचें द्योतक म्हणून १९२१ सालीं लंडन येथें भरलेल्या साम्राज्य परिषदेचे प्रतिनिधि म्हणून हिंदुस्थान सरकारनें त्यांची नेमणूक केली. ही परिषद आटोपल्यावर ते पृथ्वीपर्यटणास निघाले. अमेरिकेंत वॉशिंग्टन येथे भरलेल्या परिषदेला ते हिंदु-

स्थानचे प्रतिनिधि म्हणून हजर होते. आफ्रिकेंतील हिंदी लोकांच्या हक्कांसंबंधीं ना. शास्त्री यांनी साम्राज्यपरिषदेंत बरीच जागृति केली व त्याचाच परिणाम म्हणून त्यांना दक्षिण आफ्रिकेचे पहिले एजंट-जनरल होण्याचा बहुमान मिळाला.

त्यापूर्वी त्यांना प्रिव्हि कौन्सिलर नेमण्यांत आलें होतें व तेव्हां-पासून ते ' नेक नामदार ' झाले.

ना. शास्त्री यांच्या आफ्रिकेतील कार्याबद्दल मतभेद असला तरी त्यांनीं तेथे लोकप्रियता संपादन केली होती याबद्दल वाद नाहीं. जोहान्सबर्ग येथील चर्चचे मुख्य धर्माधिकारी यांनीं ना.शास्त्री यांस हिंदुस्थानासंबंधीं व्याख्यान देण्यास मुद्दाम पाचारण केलें होतें व त्यांच्या भाषणाचे वेळीं स्वतः अध्यक्षस्थान स्वीकारले होतें. यावरून हिंदी माणसाला कमी लेखण्याची आफ्रिकेंतील युरोपियन लोकांची जी प्रवृत्ति होती तिला या धर्माधिकाऱ्यानें चांगलाच सणसणीत टोला लगावला, असें म्हटल्यास चालेल. डरबानयेथील तामीळ लोकांत शिक्षणाचा प्रसार करण्याच्या इच्छेनें ना. शास्त्री यांनी जेव्हां त्यांच्यापुढें कॉलेजची कल्पना मांडली तेव्हां हिंदी लोकांनीं ताबडतोब वीस हजार पौंड जमविले व कॉलेज सुरू केलें. नामदार शास्त्री यांच्या सन्मानार्थ त्यांनीं या कॉलेजला ' शास्त्री कॉलेज ' अशी संज्ञा दिली.

ना. शास्त्री हे जगद्विख्यात राजकारणी पुरुष आहेत. शाळामास्तर म्हणून त्यांनी आपला संसार सुरू केला. आणि आज जगांत प्रसिद्ध मुत्सद्द्यांत त्यांची गणना होते. त्यांची ख्याति त्यांच्या वक्तृत्वामुळें झाली आहे. जगांतील उत्कृष्ट वक्ते म्हणून त्यांचा सर्वत्र लौकिक पसरला आहे. इंग्लंडमध्यें साम्राज्य-परिषद भरली असतां परिषदेंत जमलेले मोठमोठे मुत्सद्दी त्यांच्या वक्तृत्वानें दिपून गेले.मुख्य प्रधान

लॉइड जॉर्ज हे तर भान विसरले. जगांतील पांच प्रमुख वक्त्यांत ना. शास्त्री हे एक आहेत अशी लॉर्ड बाल्फर यांनी निःशंक कबुली दिली. ना शास्त्री भाषण करण्यापूर्वी आपल्या विषयाचा अभ्यास करण्यांत कांहीं काळ घालवितात व त्यावर विचार करण्यांत तासचे तास खर्च करतात. भाषणापूर्वी त्यांच्या डोक्यांत कांहीं शब्द व शब्दसमूह असतात; पण बाकीचे बोलतां बोलतां त्यांना सुचतात. त्यांच्या भाषणांत गांभीर्य, नादमाधुरी, विचारांची विशुद्धता आणि निवडक शब्दांची सफाई दिसून येते.

१९३० व ३१ सालीं भरलेल्या पहिल्या दोन गोलमेज परिषदांचे ते प्रतिनिधि होते, पण तिसऱ्या परिषदेला त्यांचें नांव कसें चुकून राहिलें कोण जाणें, त्यांना आमंत्रण आलें नाहीं. महात्मा गांधींचे ते फार मोठे चहाते आहेत. गांधीही त्यांना तसेंच मानतात. कॉंग्रेसबाहेर जरी ते असले तरी सुशिक्षित जनतेंत त्यांच्याबद्दल सर्वत्र आदर आहे. अखिल भारतीय पुढारीपणाचा मान त्यांना मिळाला आहे असें निश्चितपणे म्हणतां येतें. सध्यां ते अन्नमलाई विद्यापीठाचे व्हाइस-चॅन्सेलर झाले असल्यामुळें त्यांना आपल्या विद्याव्यासंगाला व मननचिंतनाला भरपूर वेळ सांपडत असेल अशी आशा आहे. त्यांच्या आयुष्याचें ते अनेक वर्षांचें ईप्सित आहे.

---

# ४२ : ना. आगाखान

हिंदी राजकीय पुढाऱ्यांत जरी ना. आगाखानांची गणना होत असली अगर त्यांच्या नांवामागे ' हिज हायनेस ' हा किताब झळकत असला तरी ते राजकारणी मुत्सद्दी नाहींत अगर संस्थानिकही नाहींत. सुमारें दहा कोटी लोकसंख्या असलेल्या इस्माइली मुसलमानांचे ते धर्मगुरु ऊर्फ शंकराचार्य आहेत. इस्माइली ऊर्फ बोहरा

पंथाच्या मुसलमानांचे ते इमाम आहेत. अगणित संपत्ति, परदेश-



निवास, युरोपियन रहाणी, घोड्याच्या शर्यतींचा अमर्याद शोक, जन्मसिद्ध मोठेपणा इत्यादींमुळें ना. आगाखान यांचें नांव युरोप अमेरिकेंत विख्यात झालें आहे. हिंदुस्थानांतील नामांकित पुढारी व जागतिक राजकारणांत मुरलेला मुत्सद्दी असें त्यांचें एका लेखकानें वर्णन केलें आहे.

ना. आगाखान यांचें संपूर्ण नांव हिज हायनेस दि राइट ऑनरेबल सर सुलतान महंमदशहा असें असून तिसरे आगाखान अगर आगाखान या संक्षिप्त नांवानें ते सुप्रसिद्ध आहेत. हे थेट महंमद पैगंबराचे वंशज असून महंमद पैगंबराची मुलगी जी फातिमा तिच्या वंशांत आगाखान यांचा जन्म झाला आहे. तसेंच फातिमाच्या मुलाच्या लग्नामुळें इराणच्या बादशाही घराण्याशीं या कुळाचा संबंध आल्यामुळें जगांतल्या जुन्या खानदानी राजघराण्यांतलें रक्त ना. आगाखानांच्या शरीरांत खेळत आहे, असें म्हटल्यास चालेल. आगाखानांना संस्थानिकाची पदवी व इतमाम असला तरी संस्थानाशिवाय ते संस्थानाधिपति व राजमुकुटाशिवाय राजे आहेत. हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेर ठिकठिकाणीं पसरलेल्या लाखों इस्माइली मुसलमानांचे ते जन्मसिद्ध

धर्मगुरु असल्यामुळें ते संस्थानिकपेक्षांही संस्थानिक आहेत. कोटथ-वधि संपत्तीचा अभिमान बाळगणाऱ्या कोटयधीशापेक्षां ते कोटथ-धीश आहेत.

आगाखान यांचे आजोबा हसनअली शहा उर्फ पहिले आगाखान हे इराणचे शहा फत्तेअली यांचे जांवई होते. त्यांचें वास्तव्य इराणांतच होतें. पुढें तेथें बंडाळी माजून अराजकता उत्पन्न झाल्यावर ते अफगाणिस्तानांतून कराचीला आले व नंतर मुंबईला स्थायिक झाले. १८५७पूर्वीं ब्रिटिशांना त्यांची अनेकप्रकारें मदत झाल्यामुळें ब्रिटिशांनीं त्यांचा सन्मान करून त्यांना पेन्शन दिलें. त्यांचे चिरंजीव आगा अलीशहा उर्फ दुसरे आगाखान हे विद्वान म्हणून प्रसिद्ध होते. मुंबई कौन्सिलांतही त्यांनीं काम केलें आहे. ते१८८५ सालीं मृत्यु पावले.

ना. आगाखान यांचा जन्म कराची येथे २ नोव्हेंबर १८७७ रोजीं झाला. त्यांची आई इराणच्या राजघराण्यांतील असून इराणचा शहा फत्तेअली यांची नात होय. आगाखानांच्या वयाच्या आठवे वर्षी त्यांचे वडील मृत्यु पावल्यामुळें त्यांच्या संगोपनाचा भार त्यांच्या आईवर येऊन पडला. हिंदुस्थानसरकारनें या परिस्थितींत आगाखान यांना त्यांच्या आजोबांचें पेन्शन सुरू केलें व ‘ हिज हायनेस ’ ही बहुमानाची पदवी बहाल केली. वयाच्या नवव्या वर्षी आगाखानांना हा मान मिळाला. त्यांच्या आईच्या तालमींत त्यांचें सर्व प्रकारचे उच्च शिक्षण झालें. इंग्रजी, पर्शिअन, अरबी इत्यादि भाषांवर त्यांनीं प्रभुत्व मिळविलें व वाङ्मय, इतिहास, गणित, तत्त्वज्ञान, भूगोल, ललितकला इत्यादि विषयांचाही त्यांनीं उत्कृष्ट अभ्यास केला.आगाखान हे तल्लख बुद्धीचे असल्यामुळें थोडयाच अवधींत विद्वान, सुसंस्कृत व सुविद्य झाले.

वयाच्या दहाव्या वर्षीच इमाम म्हणून इमामच्या गादीवर त्यांची प्रतिष्ठापना झाली व हें स्थान त्यांनीं आपल्या कर्तृत्वानें व बुद्धि-

चातुर्यानें उत्कृष्टपणें भूषविलें. आपल्या प्रतिष्ठेला व लौकिकाला शोभेल अशा चळवळींत व कार्यांत त्यांनीं मनःपूर्वक भाग घेतला. १८९७ च्या दुष्काळांत त्यांनी आपद्ग्रस्तांना हरतऱ्हेची आर्थिक मदत केली. अलीगड विद्यापीठाच्या स्थापनेला त्यांचे बरेच परिश्रम कारणीभूत झालेले आहेत. सुरवातीला या विद्यापीठाला ते दर वर्षी ६००० रुपये देत असत. आतां त्यांनीं ह्या वार्षिक देणगीची रक्कम १०००० पर्यंत वाढविली आहे. याशिवाय त्यांनीं इतरही पुष्कळ साहाय्य केलें आहे. मुसलमान समाजाचें पुढारीपण घेऊन त्यांनीं आपल्या समाजांत अनेक सुधारणा घडवून आणण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केले आहेत. त्यांच्या ह्या कार्याबद्दल १९१० सालीं मुंबईतील शिया व सुनी या दोन्ही जमातींनी त्यांना मानपत्र देऊन त्यांचा गौरव केला.

आगाखानांनी देशांत व जगांत शांतता नांदावी म्हणून जे प्रयत्न केले तत्प्रीत्यर्थ त्यांना जागतिक शांततेचे नोबेल पारितोषक देण्यांत यावें असा ठराव कौन्सिल ऑफ स्टेटनें ५ फेब्रुवारी १९२४ रोजीं एकमतानें पास केला होता. १९३०–३१–३२ सालीं भरलेल्या तिन्ही गोलमेज परिषदांत प्रतिनिधि म्हणून त्यांची नेमणूक झाली होती व एकदां तर हिंदी प्रतिनिधींचें पुढारीपण त्यांच्याकडे आलें होतें. १९३८ सालीं राष्ट्रसंघाच्या अध्यक्षपदाचा बहुमान त्यांना मिळाला होता.

त्यांचीं आतांपर्यंत तीन लग्नें झालीं. त्यांपैकीं पहिली पत्नी मुसलमान होती, दुसरी इटालियन होती व सध्यांची फ्रेंच आहे. घोड्याच्या शर्यतींची आगाखानांना इतकी हौस आहे कीं ती त्यांचा जणूं काय व्यवसायच होऊन बसला आहे. ना. आगाखान हे धर्मगुरु असले तरी आज हिंदी राजकारणाच्या क्षेत्रांत त्यांनीं स्वतंत्र स्थान संपादन केलें आहे यांत शंका नाहीं.

# सूची

[चरित्रमालेंत आलेल्या हयात व्यक्तींची वयोमानानुसार सूची]

| व्यक्ति | जन्मसन | आजचें वय |
|---|---|---|
| आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय | १८६१ | ७८ |
| स्टॅन्ले बाल्डविन | १८६७ | ७२ |
| नेव्हिल चेंबरलेन | १८६९ | ७० |
| ना. श्रीनिवास शास्त्री | १८६९ | ७० |
| न. चिं. केळकर | १८७२ | ६७ |
| कृ. प्र. खाडिलकर | १८७२ | ६७ |
| डॉ. तेजबहादर सप्रू | १८७५ | ६४ |
| भुलाभाई देसाई | १८७७ | ६२ |
| ना. आगाखान | १८७७ | ६२ |
| ट्रॉट्स्की | १८७९ | ६० |
| स्टॅलिन | १८७९ | ६० |
| प्रेसिडेंट रूझवेल्ट | १८७९ | ६० |
| डी व्हॅलेरा | १८८२ | ५७ |
| मुसोलिनी | १८८३ | ५६ |
| बॅ. सावरकर | १८८३ | ५६ |
| बाबू राजेंद्रप्रसाद | १८८४ | ५५ |
| राजगोपाळाचार्य | १८८६ | ५३ |
| एडवर्ड दलादियें | १८८६ | ५३ |
| चिआंग-कै-शेक | १८८७ | ५२ |
| डॉ. चंद्रशेखर रामन् | १८८८ | ५१ |

| | | |
|---|---|---|
| डॉ. राधाकृष्णन् | १८८८ | ५१ |
| पं. जवाहरलाल नेहरू | १८८९ | ५० |
| भाई मानवेंद्रनाथ रॉय | १८८९ | ५० |
| हिटलर | १८८९ | ५० |
| खान अब्दुल गफारखान | १८९० | ४९ |
| बाबू सुभाषचंद्र बोस | १८९७ | ४२ |

# थोरांचा परिचय

## ( पुस्तक १ लें )

**लेखक : धोंडो सखाराम कुळकर्णी**

**या पुस्तकांत खालील थोर व्यक्तींचीं चरित्रें आलीं आहेत:—**

राजा राममोहन राय
पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर
स्वामी दयानंद
महर्षि दादाभाई नौरोजी
श्रीरामकृष्ण परमहंस
डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर
जमशेटजी टाटा
न्या. महादेव गोविंद रानडे
सर आदमजी पीरभाई
सर फेरोजशहा मेहता
डॉ. ॲनी बेझंट
सुरेंद्रनाथ बानर्जी
विष्णुशास्त्री चिपळूणकर
स्वामी श्रद्धानंद
गोपाळ गणेश आगरकर
लो. बाळ गंगाधर टिळक
सर जगदीशचंद्र बोस
प्रो. धोंडो केशव कर्वे
पंडित मोतीलाल नेहरू
पंडित मदनमोहन मालवीय
रवींद्रनाथ टागोर
विश्वनाथ काशीनाथ राजवाडे
स्वामी विवेकानंद
लाला लजपतराय
ना. गोपाळ कृष्ण गोखले
महात्मा गांधी
वीर वल्लभभाई पटेल
दे. चित्तरंजन दास
डॉ. मुख्तार अहमद अनसारी
नामदार श्रीनिवासशास्त्री
बाबू अरविंद घोष
स्वामी रामतीर्थ
सरोजिनी नायडू

**किं. ६ आणे.** **—चित्रशाळा, पुणें २.**

श्री. रा. प्र. कानिटकर, एम्. ए.

यांचें

# चरित्र-वाङ्मय

१

प्रो. वामन मल्हार जोशी

पृ. १५०  कि. १२ आणे.

२

पं. मोतीलाल नेहरू

पृ. १२०  कि. ८ आणे.

३

कवींद्र रवींद्रनाथ टागोर

पृ. १३४  कि. ६ आणे.

४

बाबू राजेंद्रप्रसाद

पृ. १२६  कि. ८ आणे.

५

बाबू सुभाषचंद्र बोस

पृ. २०६  कि. १२ आणे.

६

बेनिटो मुसोलिनी

पृ. १६०  कि. १० आणे.

मिळण्याचें ठिकाण—चित्रशाळा प्रेस, पुणें.